
# श्री साईलीला

श्री साईबाबा संस्थान शिर्डीचे अधिकृत मासिक

श्रीसाईबाबांनी अनेक भक्तांना विविध स्वरूपात दर्शन देऊन अक्षरशः थक्क केले आहे! मुंबापुरीचे प्रख्यात डॉक्टर कट्टर रामभक्त होते. मित्रांसह शिरडीला गेल्यावर आपण बाबांना वंदन करणार नाहीं असा निश्चयच त्यांनी केला होता. पण काय चमत्कार! द्वारकामाईत त्यांना साईनाथांच्या जागी साक्षात् अयोध्यापती श्री प्रभू रामचंद्रांचेच दर्शन घडले आणि त्यांनी साष्टांग नमस्कार तिथल्या तिथे घातला. त्यांची मित्र मंडळी हे बघून थक्कच झाली.


नव्हेंबर–डिसेंबर १९८४)

(किंमत २ रुपये



श्री साईनाथ [illegible]

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

नव्हें. डिसें. १९८४

भक्त अनुभव विशेषांक

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. वन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )

**श्रीसाई वाक्सुधा**

वर्ष ६३ वे)   किंमत २ रुपये   (अंक ८ व ९

दूरध्वनी ८८२२५६१

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



## श्रीसाई वाक्सुधा

निवृत्ति ज्ञानदेव मुक्ताबाई ।
नामा जनी गोरा गोणाई ।
तुका नरहरी नरसी भाई ।
सजन कसाई सांवता ॥३५॥
पूर्वी संत होऊनि गेले ।
सांप्रतही ते बरेचि झाले ।
वसुधैव कुटुंबी भले ।
आधार रंजल्या गांजल्यांचे ॥३६॥
रामदास संतप्रवर ।
सोडूनिया गोदातीर ।
प्रकट झाले कृष्णा तटाकावर ।
जगदुद्धारा कारणें ॥३६॥
तैसेचि हे योगेश्वर साई ।
महान शिरडींची पुण्याई ।
जगदुद्धाराचिये पायीं ।
गोदे ठायीं अवतरले ॥३८॥
परीस लोहा दे कनक स्थिति ।
तया परिसा संतां उपमिती ।
संतांची परी अलौकिक कृति ।
निजरूप देती भक्तांतें ॥३९॥
— श्री साईसच्चरित अध्याय ४.

## सुविचार

वदनं प्रसाद सदनं ।
सदयं हृदयं सुधामुचोवाचः ।
करणं परोपकरणं ।
येषां केषां न ते वन्द्याः ॥

ज्यांचे मुख प्रसन्नतेचे घर आहे. ज्यांचे हृदय दयेने भरलेले आहे. ज्यांची वाणी अमृतस्त्राव करणारी आहे, व ज्यांची कृति परोपकार पूर्ण आहे. ते कुणाला बरे वंदनीय वाटणार नाहीत!

# भक्त अनुभव अंकाचे मानकरी १९८४

१) सौ. सुधाताई चैतन्य.
२) श्री. शाम चिटणीस
३) सौ. वसुधा आगाशे
४) कु. अंजना राधाकृष्ण गुप्ता
५) श्री. कृष्णाजी देशमुख.
६) सौ. शारदा घाटवळ.
७) ॲड. जी. बी. वायसे.
८) सौ. निर्मला मालवणकर.
९) सौ. मथुराबाई हिब्बारे.
१०) डॉ. अनील मोरे.
११) श्रीमती शशिकला मरबल्ली.
१२) श्री. लक्ष्मणराव रापतवार.
१३) सौ. सुनंदा इनामदार.
१४) श्री. किसनराव कुलकर्णी.
१५) श्रीमती शुभांगी पाटणकर.
१६) श्री. टी. डब्ल्यू वाणी.
१७) सौ. निर्मला घोडे.
१८) श्री. अनिल रिसबूड.
१९) सौ. एम. एस. सावंत.
२०) श्री. श्रीधर जिनराजकर.
२१) सौ. पुष्पाताई जोशी.
२२) श्री. विजयकुमार चिंदरकर.
२३) सौ. शशिकला पाटील.
२४) श्री. जे. बी. कोष्टी.
२५) कु. स्वाती साळवी.
२६) श्री. लहू रेवाळे.
२७) सौ. उर्मिला बोलेकर.
२८) श्री. एन. एन. कुलकर्णी.
२९) सौ. प्रमिला वडाडे.
३०) श्री. म. प. घोंगे.
३१) सौ. विमल वगळ.
३२) श्री. पु. कृ. धुपकर.
३३) कु. शुभांगी पावसकर.
३४) श्री. व्ही. एल. वर्तक.
३५) सौ. नंदा परदेशी.
३६) श्री. आत्माराम ठाकरे.
३७) सौ. रेखा साळवी.
३८) श्री. पु. अ. साठे.
३९) सौ. सुलभा कदम.
४०) श्री. तुकाराम साटम.
४१) सौ. मालती मालवणकर.
४२) श्री. एन. आर. शहाणे.
४३) कु. सरल खारकर.
४४) श्री. चंद्रकांत गरगटे.
४५) सौ. आसावरी वायकूळ.
४६) श्री. टी. एन. चव्हाण.
४७) सौ. रोहिणी जाधव.
४८) श्री. डी. बी. पोतनीस.
४९) सौ. भावना जेऊरकर.
५०) श्री. गजाननराव निरखे.
५१) हेमलता धारकर.
५२) श्री. मदन चव्हाण.
५३) कु. उषा तावडे.
५४) श्री. एस. एल. रणदिवे.
५५) किरणकुमार नाईक
५६) सौ. प्रिया परब.

५७) सौ. सविता जोशी.
५८) श्री. नारायण पाटील.
५९) सौ. उषा चितांबर.
६०) सौ. वर्षा वि. हजारे.
६१) श्री. पंढरीनाथ परब.
६२) लीलाताई गोलतकर.
६३) सौ. सिंधू फडणीस.
६४) सौ. वसुधरा चोरे.
६५) श्री. महादेव सुर्वे.
६६) सौ. अश्विनी चोपकर.
६७) श्री. भा. ह. मुरांजन.
६८) सौ. तेजल देशपांडे.
६९) श्री. सुनिल मोहिले.
७०) सौ. सीता कुलकर्णी.
७१) श्री. सुर्यकांत चंचे.
७२) सौ. सुनीता निरखे.
७३) श्री. रमेश शेलार.
७४) "निर्मल"
७५) शिरडीवृत्त.

★

**माझा अभिप्राय –**

"श्री साईलीला" हे मासिक आंतरराष्ट्रीय सुकिर्तीचे आणि अध्यात्मिक सन्मार्गाचे एकमेव मासिक आहे.

या मासिकाची रचना, मांडणी, कल्पकताही अतिशय सोज्वळ स्वयंपूर्ण–मार्मिक, हृदयाला भिडणारी भाषाशैली इ. मुळे ते सर्वांग परिपूर्ण असे असून मासिकांतील गद्य–पद्य वाङमय जीवनाला कसर न लागू देणारे आणि जीवन सुगंधीत करणारे केवड्याचे कणीस आहे.

**–चंद्रकांत गरगटे,** सातारा.

# भक्त स्वानुभव विशेषांक

स. न. वि. वि.




प्रिय श्री साईभक्तांनो तुमच्या आवडत्या प्रिय असलेल्या श्रीसाईलीलाचा हा भक्त स्वानुभव विशेषांक तुमच्या उत्सुक असलेल्या हातात देण्यात नेहमीप्रमाणे आताही आम्हांस आनंद वाटत आहे. दरवर्षी आम्ही हा अंक दिवाळी विशेषांक म्हणून प्रसिद्ध करीत आलो आहोत. पण यंदाचे वर्षी दसरा व दिवाळी हे दोन्ही महत्वाचे सण आक्टोबर महिन्यातच आले व ते दोन्हीही महिन्याच्या मधल्याच तारखांना आले. ४ आक्टोबरला दसरा व २४ आक्टोबरला दिवाळी. तेव्हां दरमहा १ तारखेस पोस्टात न चुकता पडणारा तो अंक म्हटला तर ऐन दसरा व म्हटला तर ऐन दिवाळीपूर्वी तुमच्या हाती पडावा म्हणून आम्ही प्रयत्नशील राहिलो व तो अंक आपल्या हाती दिला. त्या अंकात श्रीसाईनाथांच्या ६६ व्या पुण्यतिथी निमित्य काही भक्त लेखकांचे लेख मुद्दाम प्रसिद्ध केलेले होते. तसेच काही भक्तांचे अनुभव लेख व भक्त कवी जनांच्या कविताही प्रसिद्ध केल्या होत्या. एकाच महिन्यात येणाऱ्या या दोन्ही मोठ्या सणाचा फायदा घेऊन दसरा दिवाळी अंक आम्ही भक्त वाचकांच्या हाती दिला व श्रीबाबांच्या वाचकांनी भक्तांनी त्याचे चांगलेच स्वागत केले.

श्री साईलीलाचा हा जोड अंक १२८ पानांचा भक्त स्वानुभव विशेषांक म्हणून दिवाळी नंतर आपल्या हाती पडत आहे. श्री बाबांच्या भक्तांना बाबांची पूजा–अर्चा–प्रार्थना नामस्मरण जप–जाप्य चिंतन–मनन पोथी वाचन इ. करीत असताना व स्वतः काही संकटात आपत्तीत सापडले असतांना बाबांना कळवळून त्यांनी हाक मारली असताना श्री बाबांनी त्यांची संकटे, आपत्या दूर केल्याचे दाखले, अनुभव, उदाहरणे या अंकात दिलेले आहेत हे वाचून श्री बाबांच्या बद्दलचा भक्तिभाव शतपटींने वाढतो.

काही भक्त लेखक आपले अगदीच किरकोळ अनुभव पाठवून देतात. संपादकांना लिहिलेल्या पत्रात लिहितात माझे हे जर अरिष्ट टळले तर मी हा अनुभव साईलीलात देईन असे बाबांना सांगितले म्हणून हा मजकूर पाठवित

आहे. अगदीच किरकोळ सामान्य अनुभव प्रसिद्ध करून ते भक्तांसमोर ठेवणे हे आमचे दृष्टीने तरी योग्य वाटत नाहीं. पण काहींवेळा आम्ही भक्तांचे लाड पुरवतो नाहीं असे नाहीं. पण संपादकांना गळ घालून मजकूर प्रसिद्ध करून घेणे हे तंत्र आम्हांला बरे वाटत नाहीं. लाड पुरविण्यासही काही मर्यादा असतात. भक्तमित्रानों बाबांचे आलेले तुम्हांला अनुभव प्रसिद्ध करण्यासाठीच हे मासिक आहे याची जाणीव ठेवा व आपल्याला आलेले किरकोळ, मामुली अनुभव न पाठवता चांगले वाचनीय, घवघवीत अनुभव पाठवत चला व ते पण अगदी थोडक्यात हं, हे लक्षात असू द्या.

० श्रीसाईलीलाचा हा नव्हेंबर–डिसेंबर जोड अंक असल्याने डिसेंबरचा वेगळा अंक प्रसिध्द होणार नाहीं. आता यानंतर पुढील अंक १ जानेवारी १९८५ रोजी भेटीस येईल.

**श्रीसाईलीला पुढील अंक जानेवारीत**

० श्रीसाईलीला मासिकाचा हा नव्हेंबर–डिसेंबरचा जोड अंक असल्यामुळे डिसेंबरचा वेगळा अंक प्रसिद्ध होणार नाहीं याची भक्तवाचकांनी नोंद घ्यावी. यापुढील अंक जानेवारी १९८५ मध्ये प्रसिद्ध होईल.

— का. संपादक.

ऋगवेदस्य महावाक्यं
प्रज्ञां ब्रम्हः ।१।

यजुर्वेदस्य महावाक्यं
अहं ब्रम्हास्मि ।२।

सामवेदस्य महावाक्यं
तत् त्वमसि ।३।

अथर्ववेदस्य महावाक्यं
अयं आत्मा ब्रम्हः ।४।



मुखी राम अन रहीम ठवूनी
जनी ऐक्याचे नाम घेवूनी
समधर्मांचे सार उजळोनी
तुझ्या लीलांच्या औदार्याला
नसे अंत ना पार । साई तू माझा कैवार.

# श्रीसाईबाबा भक्त स्वानुभव विशेषांक

# जरी हे शरीर गेलो मी टाकून ।
# तरी मी धावेन भक्तांसाठी ॥

–सौ. सुधाताई चैतन्य
१४, राजस्व ग्राम, इंदौर, (म. प्र.)
पिन – ४५२००२.

◦ माझं लहान वयातच लग्न झालेलं होत. पतीसेवा हीच खरी देवपुजा अशी माहेरची शिकवणूक. मुलाला घर आहे, नोकरी आहे, मुलगा होतकरू दिसतो आहे. या करता माझं लग्न जास्त चौकशी न करता वडीलांनी यांच्याशी केलं. लग्ना नंतर यांची नोकरी सुटली. नोकरी लागण्याची पंचाईत. वडीलांनी प्रयत्न केले. पण यांचं शिक्षण मॅट्रीक पर्यंतच होत या करता ते हताश झाले.

हे साईभक्त. पतीची सेवाच मी पूर्णपणे पाळत होते. तुम्ही पुनः मॅट्रीक ला बसा असा मी आग्रह केला· नोकरीत काम जास्त. अभ्यासास वेळ मिळत नव्हता. अशा कठीण अवस्थेत हे पास होतील ही अपेक्षा त्यांनी सोडून दिली होती. मी बाबांचा धावा करीत असे. त्यांचाही बाबांवर विश्वास पण ते म्हणत "अग प्रयत्न केले तर पाहिजेत जर माझ्या हातून होत नाहीं, तर अशा स्थितीत आपणास बाबा कशी मदत करतील. हे शक्य तरी आहे का? देव त्यालाच मदत करतो जो ईश्वरावर भरोसा ठेवून प्रयत्न करतो."

परीक्षेचा दिवस आला. परीक्षा देऊ की नको असं काहूर यांच्या मनात माजल होते. माझं मन मला सांगत होतं की बाबा समर्थ आहेत. माझ्या हाकेला धावून येतील व आपणास मदत करतील व झाले तसेच. बाबांनी चमत्कार केले. जे हे प्रश्न वाचत तेच प्रश्न परीक्षेत येत यामुळे यांना परिक्षेत पास होण्याची आशा वाटू लागली. परंतु गणित हा विषय यांचा फारच कठीण होता. आपण यात पास नाहीं होणार! पण त्याच रात्री एक गृहस्थ यांच्या जवळ आला व म्हणाला अहो मला एवढे गणित समजावून द्या. त्यांनी ते सर्व प्रश्न दोघांनी सोडवून घेतले. जातांना ते गृहस्थ म्हणाले पहा बुवा मला तर सर्व प्रश्न सुटले आहेत तुम्हांस जेथे नसेल समजत तर पुन्हा परीक्षेच्या अगोदर पहा बरं."

हा गृहस्थ कोण? परीक्षावेळी कसा आला हे आम्ही काहींच चौकशी केली नाहीं. काय आश्चर्य दुसऱ्या दिवशी सोडविलेलेच प्रश्न पेपरात होते.

परीक्षेचा निकाल आला व त्यात यांना यश मिळालं. मला असं वाटतं की बाबा म्हणतात ते काहीं खोटे नाहीं की, जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ॥

या कलीयुगामध्ये मुमुक्षूना तरून जाण्याचा एकच मार्ग म्हणजे साई उपासना हाच असून साई उपासनेमुळे दुर्गम निरस कठीण असा वाटणारा भवसिंधु तरून जाता येतो. तेव्हां या उपासनेने मुमुक्षूनीं सायुज्जता भक्ती मिळवून आपला देह पावन करावा अशी सदिच्छा व्यक्त करून उत्कट प्रेमाने व अपार श्रद्धेने हे पुण्य साईनाथांचे चरणी अर्पण करते.

मला चार मुलं. चारी आता पदवीधर आहेत. सर्व चांगल्या नोकरीत काम करीत आहेत. हे सर्व साईभक्तीचं फळ आहे.

**मग जो गाई वेडे बाकुडे । माझे चरित्र माझे पवाडे ।**
**तयाचिया मी मागेपुढे । चोहीकडे उभाचि ॥**

० मी रोज विचार करीत असे की हे (माझे पती) ऑफिसमधून आल्यावर असे उदास असतात कां? त्यांना मी प्रश्न केला तर त्यांच एकच उत्तर, "अग, काम जास्त असतं, ते वेळेवर होत नाहीं, या करता त्याची रूपरेषा पुढील दिवसाची कशी करावी याच्या काळजीत असतो दुसरं काहीं नाहीं."

सकाळ–संध्याकाळ सतत हे चिंताग्रस्त पाहून मनाला बरं वाटत नव्हते. पण माझ्याजवळ या करता काहीं उपाय नव्हता. मनाला वाईट वाटे.

हे नियमाने पोथी (दाभोलकर कृत) वाचित असत. ती वाचत असतांना कैक वेळा त्यांच्या डोळ्यांना पाणी आलेलं मी पाहिलं त्याच कारण विचारात तर त्यावर त्यांचे उत्तर, "अग, बाबांनी कितीकांचे रोगराई, पासून रक्षण केले आहे, ते वाचलं की माझ मन प्रेमाने भरून येते". मी त्यांच्याकडे वेड्या सारखी पहातच राहात असे. त्यांना ऑफिसात काही तरी दुःख आहे व ते कोणास सांगत नाहींत अस माझ पक्क मत झालं. दिवसा मागून दिवस जात होते. पण त्याच कोडमला काहीं उलगडत नव्हत.

एकदा मी हट्ट धरला की "पोथी मी ऐकेन तुम्ही जोराने वाचा". पहिल्यांदा ते या गोष्टी करता तयार झाले नाहींत परंतु हट्ट धरल्यावर ते कबूल झाले. मी रोज नियमाने पोथी ऐकत असे. असा क्रम आमचा चालू झाला होता.

तो दिवस मी कधीही विसरणार नाहीं. त्यांनी म्हटलं, "मग जो गाई वाडे वाकुडे । माझे चरित्र माझे पवाडे । तयाच्या मी मागे पुढे । चोहिकडे उभाचि ॥ व त्यांचे डोळ पाण्याने भरून आले. मी त्यांच्याकडे पहातच राहिले. ते म्हणाले, आजच माझे व वरिष्ठाचे भांडण झाले. त्यावेळेस मला वाटलं की, माझ्या तोंडातून ज शब्द बाहेर पडत आहेत ते स्वतः बाबाच वदवित आहेत असा भास झाला,' मी म्हटलं अगदी खरं आहे कणा कणामध्ये साई रमतात आहे. त्यांचेच शब्द पहा आता ओवीत तुम्ही वाचलेत ना." त्यांनी आपलं मन माझ्यासमोर मोकळ केलं. ते म्हणाले, आज माझी व माझ्या वरिष्ठाची पुष्कळच वादावादी झाली. मला असं वाटलं की मला बोलण्याची शक्ती बाबाच देत आहेत व ते माझ्या जवळ उभे आहेत. सर्वजण तर मला माझ्या वागण्याबद्दल दोष देत आहेत. पहावे काय होतं ते".

त्यांना आपल्या नोकरीच काय होतं याची काळजी, मी धीर दिला व म्हटलं, "ही बाबांचीच लीला आहे. ते सर्व चांगलेच करतील." दोन चार दिवस आम्ही काळजीतच होतो. पण चौथ्या दिवशी यांच्या हातात ऑर्डर पडली व हे बढतीच्या कामावर लवकरच रूजू झाले. ते जेव्हां घरी आले त्यावेळेस मी त्यांना म्हटलं "आहे की नाहीं खरं की मग जो गाई वेडे वाकुडे माझे चरित्र माझे पवाडे। त्यांच्या मी मागेपुढे । चोहिकडे उभाचि ॥.

आता हे रिटायर झाले आहेत. व त्यादिवसापासून ते पुढे वाढतच गेले. ते आता सुखी आहेत.

# रामरक्षा संपली नि ताप उतरला

–सौ. वसुधा वि. आगाशे
बि. नं. ९२।३२११, टिळकनगर,
चेंबूर, मुंबई – ८९.

० आमच्या घरी आम्ही दोघे साईबाबांचे निःस्सीम भक्त आहोत. साईलीला मासिक मी नुकतेच चालू केले. मध्यंतरी मला एकदम बेचैन वाटू लागले. छातीत धडधडू लागले. अंगाला एकदम घाम सुटला. ताबडतोब बाबांचा धावा केला.

रोज संध्याकाळी आरती झाल्यानंतर आम्ही घरातील सर्व बाबांची उदी लावतो. तसेच कुठेही बाहेर जाताना अगदी न चुकता बाबांची उदी लावल्याशिवाय जात नाहीं. माझी मुलगी चि. वैशाली त्यावेळी दोन वर्षाची होती. एकाएकी तिला रात्री खूप ताप भरला. ती आणि मी खूपच बेचैन झालो. तो दिवस दसऱ्याचा होता. माहिमला होणाऱ्या बाबांच्या उत्सवाला हे गेले होते. ते पहाटे तीन वाजता घरी आले. घरात दिवा दिसल्यावर त्यांच्याही मनात शंका उत्पन्न झाली. घरात शिरताच मुलीचा ताप पाहून हे पण घाबरले, व बाबांची उदी हातात घेऊन रामरक्षा म्हणण्यास सुरवात केली. खरोखर रामरक्षा संपत येताच मुलीला थोडा घाम वाटू लागला, आणि औषध दिल्याप्रमाणे अगदी हळूहळू तिचा ताप उतरला. धन्य ते बाबा! आणि धन्य ती साईमाऊली!

आणखी असे बाबांचे नित्यनवे अनुभव आम्ही घेत आहोत. रोज नेमाने त्यांची प्रार्थना व जयजयकार आम्ही करतो. अशीच कृपादृष्टी आमच्यावर त्यांची राहो ही साईचरणी नम्र प्रार्थना!

# बाबा समई मागतात

—श्री. शाम चिटणीस.
द्वारा श्री. कांता चिखलीकर.
लक्ष्मी प्रिंटिंग प्रेस, म्हापसा, बार्देश,
गोवा.

० मी शाम सुंदर चिटणीस म्हापसा येथील म्हणारा. गेली तीन वर्षे मी बाबांकडे जास्त ओढला गेलो. मी नियमितपणे कलंगुटला श्री. प्रल्हाद हुल्याळकर ह्यांच्या घरी साई समर्थांचे दर्शन घेत असतो. कित्येक वर्षे माझी प्रकृती फारच नाजूक होती. मी कोठ गाव सोडून बाहेर जात नसे. कलंगुट—म्हापसा अंतर १२ किलोमीटर आहे. मी जसा कलंगुटला जाऊ लागलो तशी माझ्या प्रकृतीत नकळत सुधारणा झाली. दोन वर्षापूर्वी मी आणि मास्तर आणि इतर मंडळी अचानक भर पावसात ऑगस्टमध्ये टॅक्सी करून शिरडीस गेलो. मला काहींच त्रास झाला नाहीं. त्यानंतर मी डॉक्टरना भेटलोच नाहीं. गेल्या वर्षी १९८३ दसऱ्याच्या दिवशी मला पहाटे बाबांचे दर्शन झाले — त्यांनी सरळ माझ्याकडे समईची मागणी केली — आणि समईची उंची, आकार पण दाखवला. मी सकाळी मार्केटात गेलो तोच स्वप्नातील तीच समई माझ्या दृष्टीस पडली. मी ती लगेच खरेदी केली, आणि कलंगुटच्या बाबांच्या पुढ्यात ठेवली. मी समईची खरेदी म्हापसा दुकान नं. ११३ या दुकानातून केली होती. संध्याकाळी आरती झाली आणि एक मास्तरांचा स्नेही पण आला होता. तो म्हणाला "सर एकच समई तेवढी बरी दिसत नाहीं, दुसरी आणली पाहिजे" मास्तर म्हणाले "सुंदर, माझी ताकद नाहीं, बाबांच्या मनात असेल तर दुसरी उद्या येईलच." त्याच रात्री ११३ दुकानाचे मालक नरेन्द्र तिवरेकर ह्यांच्या स्वप्नी जाऊन बाबांनी समईची मागणी केली. तिवरेकर मला हुडकू लागले. त्यांनी लगेच समई घेतली आणि ते माझ्या मामाला (श्री महेश चिखलीकर) ह्यांना घेऊन कलंगुटला गेले आणि समई बाबांना अर्पण केली. आता मास्तरांच्या घरी साईबाबांपुढे दोन समया मंद प्रकाश देत आहेत. बाबांपुढे उभे राहिले की सर्व चिंता व्याप मिटतात असा माझा आणि पुष्कळ मंडळींचा अनुभव आहे.

# श्रद्धा आणि सबुरी फलदायी

—कु. अंजना राधाकृष्ण गुप्ता.
पाटकर वाडा, भगतसिंग पथ
डोंबिवली (पूर्व), जि. ठाणे, ४२१२०१.

० तीन वर्षापूर्वी मी नोकरीसाठी खूपच प्रयत्न करीत होते. बरेच ठिकाणी अर्ज पाठविले होते, पण नशिब कुठेच साथ देत नव्हते. त्यामुळे माझे मन फारच विचलीत झाले होते. माझे आईवडील साईभक्त आहेत आणि ते बाबांची रोज प्रार्थना करीत असतात. पण माझी कुणावर श्रध्दा नव्हती. माणसाचे जोवरी इच्छानुसार होत नसते किंवा घडत नसते तोवर त्याची कुणावरही श्रध्दा बसत नाहीं. नोकरी लागण्यापूर्वी मी लायब्ररीत तात्पुरती नोकरी करीत होते. माझी आई बाबांना नेहमी माझ्या नोकरी विषयी साकड घालत असे. एकदा आईला दर्शन देऊन बाबा म्हणाले – तिला यापेक्षा चांगल्या पगाराची नोकरी मिळाली तर ती नको कां? हे बाबांचे वाक्य मला कळल्यावर मी बाबांची खूप चेष्टा केली व हसले. असेच काहीं महिने गेल्यानंतर अचानक अशी एक गोष्ट घडली, त्यावर माझा विश्वास बसतच नव्हता. ज्या ठिकाणी मी ट्रेनी क्लार्क म्हणून काम करीत होते. तिथेच मला नोकरीत कायम करण्यात आले. ते ऐकून मला आईने सांगितलेले बाबांचे शब्द आठवू लागले. नोकरीचे कायम पत्र मिळाल्यानंतर माझ्या डोळ्यातुन अश्रू वाहू लागले आणि मी घरी आल्यावर बाबांची माफी मागितली. तेव्हांपासून माझी बाबांवर अढळ श्रध्दा आणि विश्वास बसला. बाबा कृपेमुळे मला आता पगार भरपूर मिळतो व नोकरी कायमची झाली. साईबाबांची लीला अगाध आहे. आता शिरडीला बाबांच्या दर्शनासाठी माझे मन पाखराप्रमाणे सतत उडत असते. बाबांचे हे वचन किती खरे आहे.

**"शरण मज आला आणि वाया गेला ।**
**दाखवा दाखवा ऐसा कोणी ।।**
**जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस ।**
**मागे जे जे त्यास ते ते लाभे ।।"**

# देव तारी त्याला कोण मारी

–श्री. कृष्णाजी भास्कर देशमुख.
३८३, शुक्रवार पेठ,
पालकर वाडा, पुणे २.

० सकाळची घाईची वेळ. ९॥ वाजले. नेहमीप्रमाणे घरातील सर्व कामे उरकून मी ऑफीसला गेलो· सौ. उज्वलाला (माझी पत्नी) मधून मधून फिटस् येत असल्यामुळ आम्ही घरातील सर्व कामे सकाळी ९॥ च्या आत उरकत असू. माझा मुलगा चि. उमेश जेवून १०॥ वाजता शाळत गेला. घरात दुसरे कुणीही नव्हते. सौ. उज्वला पोथ्या वाचण्याची तयारी करु लागली. लहानपणापासून, कीर्तने, प्रवचन, पोथ्या वाचण्याची तिला फार आवड. त्यातल्या त्यात बाबांच्या पोथ्या म्हटले की तिला फार आनंद होई. आजही तिच्या पेटीत २५–३० बाबांच्या पोथ्या आहेत· नेहमीप्रमाणे आजही तिने रांगोळी काढून पाट मांडला. पोथ्या व बाबांचा फोटो त्यावर ठेवून हळद कुंकू, फुले वाहून नमस्कार केला. उदबत्ती लावण्यापेक्षा तिला चिमणी जवळ ठेवणे आवडे त्यावरच ती उदबत्या लावणे पसंत करीत असे. पोथ्या बऱ्याच असल्यामुळे तिला पुष्कळ उदबत्या लागत. ११ वाजता वाचावयास सुरवात झाली. जेमतेम एक तास लोटला असेल. इतक्यात तिला फिटस् आल्या. समोरच ठेवलेल्या चिमणीवर ती पडली. चिमणी पालथी झाली. रॉकेल सांडले व जाळ पसरला. त्या जाळातच सौ. उज्वलाचा चेहरा पडला. डोळयाला असलेला प्लॅस्टिकचा चष्मा जळून खाक झाला. चष्म्याच्या कांचा फक्त जवळ पडल्या होत्या. चष्म्याच्या प्लॅस्टिकच्या काडया कानाजवळील केसात अडकविलेल्या असल्यामुळे थोडया केसाच्या बटा जळाल्या· सर्व चेहरा संपूर्ण भाजून लाल झाला होता. डोळयाच्या पापणीचे केसही जळून गेले होते. पायाच्या मांडीला ४–५ इंच भाजले होते· तेथे मोठा फोड आला होता. १५–२० मिनिटे निघून गेली सौ. उज्वला शुध्दीवर आली व स्वतःच दोन्ही खोल्यांची दारे उघडून बाहेर आली. काय झाले तिला काही कळलेच नाहीं. फीट्स येऊन गेल्या म्हणजे काही कळत नाही व आठवतही नाहीं. चेहऱ्याची आग होत होती. सौ. उज्वला आमच्या शेजारच्या सौ. सरस्वती वामन कुलकर्णी (नेहमी लोकांना मदत करणाऱ्या) यांचेकडे गेली व म्हणाली बघाहो चेहऱ्याची आग होते. काय झालय? बाईंनी चेहरा पाहिला. त्या घाबरल्या व म्हणाल्या

मामी काय झाले? त्यांनी ताबडतोब रिक्षा बोलाविली व तिला वाडीया हॉस्पिटलमध्ये दाखल केले पुढे त्याच बाईंनी मला निरोप पाठविला. चि. उमेशही आला. दवाखान्यात आम्ही पाहिले चेहरा संपूर्ण भाजला होता. इलाज चालू होते पुढे बाबांच्या कृपेने ती वाचली. प्लॅस्टिक सर्जरी करावी लागली. बराच खर्च झाला. विशेष म्हणजे प्लॅस्टिकच्या काडीमुळे पेटलेल्या केसाच्या बटा तिथेच विझल्या. डोक्याचे केस तसेच राहिले. मांडीला चांगलेच भाजले. पण अंगावरील कपडे तसेच राहिले. पेटले नाहीत. केसाच्या बटा पेटल्या असतांना संपूर्ण केस जळाल्याचे मला माहित आहे. अंग भाजले असताना संपूर्ण कपडे पेटून मृत्यू आल्याची उदाहरणे मी पाहिली आहेत मग हे कसे घडले? ही किमया कुणी केली? हा चमत्कार कसा घडला? ह्याचे उत्तर एकच. बाबांनीच तिला वाचविले. देव भक्तांसाठी धावत येतो हेच खरे. सौ. उज्वलाचा बाबांवर फार विश्वास, काही हरवले व ते मिळत नसले तर ती बाबांचा धावा करते आणि आश्चर्य हे कि तिला ती वस्तु ताबडतोब मिळते. जेवतांना अगर कुठलीही वस्तु ग्रहण करताना ती बाबांना नैवेद्य दाखविल्या-शिवाय खात नाही. बाबांची उदी लावावयास ती कधीच विसरत नाही. संकटात ती बाबांचे नाव घतेच पण नेहमीच बाबांची सेवा करण्यात तिला आनंद वाटतो. तिच्या अढळ श्रद्धेमुळे ती वाचली. आज त्या गोष्टीला बारा वर्ष होऊन गेली. पण आजही ती गोष्ट आठवली की मला आश्चर्य वाटते व माझे मस्तक बाबांपुढे नम्र होते, व नकळत माझ्या तोंडून शब्द बाहेर पडतात **अनंत कोटी ब्रम्हांड नायक राजाधिराज योगिराज परब्रम्ह श्री सच्चिदानंद सद्गुरु श्रीसाईनाथ महाराजकी जय**

---

**श्रीसाईलीलाचा अभिप्राय –**

"श्रीसाईलीला अंक नसून श्रीसाईलीला एक अमृतधाराच आहे."

**श्री. विजय आत्माराम परब**
(पालखेवाडी) कवळी चाळ,
नं. ९ डी । ३, के. डी. रोड,
दादर, मुंबई २८.

# यजमान परत आले

–सौ. शारदा घाटवळ.
पाथर्ली रोड, डोंबवली, जि. ठाणे

० बालपणी साईबाबांच्या तसबिरीकडे पाहून मला वेगळ कुतुहल वाटत असे. समजायला लागले तेव्हां साईबाबा परमेश्वराचे अवतार आहेत असे वाटू लागले. कशी कोण जाणे मी साईबाबांच्या भजनी लागले माझ्या संसारातल्या अडीअडचणी त्यांच्या कृपेने निभावल्या· मनातल्या सर्व इच्छा जणू काहीं साईबाबा पुरवू लागले. मी समाधानात होते. आणि कसे कोणजाणे माझ्या समाधानाला ग्रहण लागले. काहीं ना काहीं आर्थिक, मानसिक संकटाची भर पडू लागली. संकटे सोसण्याची माझी वृत्ती जाणून मी साईबाबांना दोष देवू लागले.

त्यातच भर म्हणून माझ्या पतिना व्यसन लागले आणि मग मात्र मी हादरुन गेले.

बाबांचा सबूरीचा सल्ला विसरून मी नको त्या भक्तांकडे जावू लागले. कुठेच यश यत नव्हते. दिवसें दिवस माझ पती मनोरुग्ण होऊन बसले.

दिनांक २१ ऑगस्टला माझ्या वडिलांना हॉस्पिटलमध्ये बघायला गेलेले माझे यजमान परत आलेच नाहींत. दोन दिवस मी स्वतंत्र शोध घेतला. कुठेच पत्ता नाहीं. मग मात्र मी साईबाबांना विनवू लागले. "बाबा त्यांना घरी आणा. माझी लाज राखा" रात्रंदिवस साईनामाचा जप करत होते. बाबांना एवढेच सांगत होते की, बाबा माझे पती गणपतीच्या आत घरी येवू देत नाहींतर मी तुमच्या मंदिरात येवून प्राण सोडीन' अशी २७ ता. ची रात्र उजाडली मी थकून गेले होते. ते गेल्याचे मी आजूबाजूला शेजाऱ्यांना जाणवू दिले नव्हते.

फक्त माझ्या माहेरी माहित होते. माझी लाज श्री साईनाथांच्या हातात होती आणि बाबा माझ्या हांकेला धावले. माझे यजमान सोमवारी २७ ता. तारखेला रात्री ८ वाजता घरी आले, त्यांना काहीच आठवत नाही आपण कसे घरी आलो ते.

पण मला खात्री आहे माझ्या साईबाबांनीच त्यांना घरी आणले. आणि आता साईबाबाच मला तारतील अशी माझी ठाम खात्री आहे.

तेव्हां भक्तांनो कितीही संकटे आली तरी, साईनाम विसरू नका, साईकृपेची शंका घेवू नका· बाबा आपल्या सदैव पाठीशीच आहेत.

श्रीसाईचरणी शतशः प्रणाम !

# साई माऊली सदा कृपेची सावली

—ॲडव्होकेट जी. बी. वायसे
'साई सरस्वती', पौड रस्ता,
कोथरूड पुणे २९.

० साईबाबांनी हयात असतांना सांगितल्याप्रमाणे ते त्यांच्या भक्तांच्या आशा आकांक्षा नेहमीच पूर्ण करीत असतात, व त्याची प्रचिती अनेक मार्गांने साईभक्तांना वेळोवेळी येत असतेच. त्यासाठी भक्तांनी नेहमी श्रद्धा व सबुरी पाळली पाहिजे व साईबाबांच्या वचनांचे नीट पालन केले पाहिजे तरच त्यांना प्रचिती येते. सध्या शिर्डी येथे अलोट गर्दी नेहमीच असते, व यात्रेमध्ये या गर्दीला मर्यादाच नसते. असे असूनही प्रत्येकांचे मनोवांछित जाणून त्याप्रमाणे त्यांना मार्ग दाखविला जातो. इतर ठिकाणच्या क्षेत्राप्रमाणे भक्तजन उदासिन होऊन परतत नाहीत. याला कारण संस्थानमधील व्यवस्थापकांची शिस्त उल्लेखनीय अशी फक्त शिर्डी मध्येच पहावयास मिळते.

मी, नेहमी शिर्डीला जात असतो. असेच या रामनवमीला जाण्याचा प्रयत्न केला. परंतु १० तारखेस मंगळवारी जाता आले नाहीं. कारण शिर्डी येथील तुफान गर्दीमुळे निवास, पूजा, दर्शन व्यवस्थित होणार नाही याची बोचणी मनास लागली होती. तरीपण दिनांक ११–४–८४ ला शिर्डी येथे जाण्याचा योग आला. त्यावेळी निवासाच्या ठिकाणी दोन दिवस अगोदर प्रतिक्षा यादीवर खूप गर्दी होती. त्यामुळे खोली मिळण्याचा योग कमीच होता. त्यातच माझ्या पत्नीची तब्येत बरी नसल्याने मन उदासिन झाले. अशा वेळी लॉकर घेवून त्यामध्ये सामान ठेवले व प्रसादाच्या भोजनासाठी भोजनगृहात गेलो. तब्येत बरी नसल्याने माझी पत्नी सौ. सरस्वती हीची जेवणावर इच्छा नव्हती. परंतु प्रत्यक्ष भोजन झाल्यानंतर त्यांनी सांगितले की, माझ्या मनाप्रमाणे भोजनात भाजी असल्यामुळे भोजन चांगले झाले, याचवेळी आमचे शेजारीच भोजनासाठी मुंबईचे श्री. गुप्ते साईभक्त यांची ओळख झाली व आपणहूनच त्यांनी सांगितले की, तुमची निवासाची सोय झालेली नसणारच. तरी तुम्ही जेवण झालेवर माझ्या खोलीवर या. हे ऐकून साईबाबांच्या लीलेची प्रचिती आली. परंतु बाबांची इच्छा वेगळीच होती. त्यांच्या कृपेमुळे दुपारी ४ वाजता, आम्हास स्वतंत्र खोली मिळाली. खोली घेतल्यानंतर आम्ही साकोरी येथे

गोदावरी मातेच्या दर्शनास गेलो, व त्यावेळी मनात असा विचार आला की, बाबा ह्यात असताना प्रत्येक भक्ताशी जसा वैयक्तिक संपर्क ठेवीत होते तसाच त्यांचे भक्त उपासनी महाराज यांच्या शिष्या सती गोदावरी माता यांनीही भक्तांशी संपर्क ठेवावा. असे मनात आणून आम्ही मुख्य दरवाजातून आत प्रवेश करताना बाहेर प्रवेश द्वाराशी सुविचार लिहिला होता तो असा — परमेश्वराच्या दर्शनास जाताना त्यांची जी कृपादृष्टि भक्तावर पडते तोच मोठा आशिर्वाद आहे. हा सुविचार वाचल्यानंतर त्याप्रमाणे सती श्री गोदावरी मातेचे लांबून दर्शन घेवून त्यांचा कृपाप्रसाद मिळविला. त्यानंतर रात्री आरती झाल्यानंतर दुसरे दिवशी गुरुवारी बाबांना अभिषेक व पूजा करणेची इच्छा उत्पन्न झाली. परंतु यासाठी बुधवारी रात्री १० वाजले पासून भक्तजनांनी नंबर लावून गर्दी केली होती. त्यामुळे आपल्याला गुरुवारी अभिषेक व पूजेचा योग येत नाहीं अशी मनात खंत निर्माण होवून रात्रभर झोप आली नाही. अशाही स्थितीत गुरुवारी सकाळी ५ वाजणेची काकड आरती घेवून अभिषेक व पूजेचे कुपन मिळणेसाठी मन चैन पडू देईना. ही खंत बाबांनी जाणून एका ओळखीच्या भक्ताने पूजेचे कुपन देऊ केले व दुधात साखर या न्यायाने अभिषेकांचीही दोन कुपने मिळाली. मानवाच्या स्वार्थी मनाप्रमाणे माझ्याही मनाने परत पूजेसाठी लवकर नंबर लागल्यास दुपारचे भोजन दीड वाजणेचे आत मिळेल अशी इच्छा बाळगली. कारण माझ्या पूजेचा नंबर १ नंतर होता. अशा स्थितीत आम्ही पती–पत्नी गुरुवारी सकाळी ११ वाजता पूजेसाठी गेलो. यावेळी शेवटचा एक नंबर न आल्यामुळे आमची पूजा मनाप्रमाणे व्यवस्थित पार पडली. परंतु पूजेस दोन पाट न मिळता एकाच पाटावर भागवून घ्यावे लागले. यावरून भक्तांच्या आशा आकांक्षा पूर्ण करण्यास साईमाऊली सदैव तत्पर असते असे दिसून येते. साई सच्चरित्रात म्हटले आहेच की,

**तयास पूर्ण अंतरज्ञान ।। तयास आधीच सर्वांची जाण ।।**
**जयांस जैसे योग्य साधन ।। तयाचे नियमन तैसेच ।। १५५**

**जैसा जयाचा अधिकार ।। तयाचा आधीच करूनी विचार ।।**
**योग्यायोग्यतेनुसार ।। भक्तांचा भार बाबांना ।। १५६**

**तैसेची आम्ही दिसाया थोर ।। परी त्या सिद्ध साईसमोर ।।**
**खरेच आम्ही पोराहूनी पोर ।। विनोदी आतुर सर्वदा ।।**

अध्याय १७, ओवी. १५७.

यानंतर शिर्डीहून घरी आल्यानंतर पहाटे ५ वाजता, मला घरच्या देव घरासमोर डोक्यास लाल रुमाल त्यावर पांढरी अक्षरे व अंगात लाल कफनी अशा बालमूर्तीत चौरंगासमोर बाबा बसलेले दिसले. बाबा काय करतात हे मी डोळे उघडून ५ सेकंद पाहात असताना मूर्ती अंतर्धान पावली. या स्वप्नांचा अर्थबोध साईभक्तांनी केल्यास बरे पडेल. या प्रमाणे साई माऊली ही सदा कृपेची साऊली आहे याची प्रचिती सर्व साई भक्तांना येवो हीच साईचरणी प्रार्थना.

# भाव दे भक्ती दे प्रेमकी प्रचिती दे

–सौ. निर्मला चं. मालवणकर
साईस्मृती, २५, व्हिंसेंट स्क्वेअर,
दादर, मुंबई – १४

० सर्व संतांनी आपल्या भक्तांना एकच शिकवण दिली. तुम्ही भावाने व भक्तिने ईश्वरास भजा प्रेमाची प्रचिती तुम्हांस मिळाल्याशिवाय रहाणार नाहीं.

तशीच प्रचिती गेल्या वर्षी बाबांनी आम्हास दिली. माझी नात चि. वेणोलीला (वय १०) १०२, १०३, डिग्री ताप सतत २,३ दिवस आला व त्यात तिला दम लागला. मला वाटले आता हिला दमाच सुरू होणार. तेव्हां मी तिच्या आईस म्हटले, "हिला जरा स्पेशिआलिस्टला दाखव व हा रोग मूळातून काढून टाक." त्या प्रमाणे तिने डॉक्टरांना दाखविले. त्यांनी फोटो काढावयास सांगितला. फोटोत तिच्या हृदयास भोक असून शुद्ध रक्त अशुद्ध रक्तात जात असल्यामुळे त्यासाठी श्वास घेण्यास त्रास होत आहे. दमा रक्तात जात असल्यामुळे श्वास घेण्यास त्रास होत आहे. (दमा नव्हता).

व त्यासाठी हृदयाचे ऑपरेशन करावे लागेल असे सांगितले. हे ऐकून घरातील सर्वच मंडळी हादरून गेली. तिची आई तर रडूच लागली. प्रथमतः नायर हॉस्पिटलमध्ये हृदयास एक भोक आहे कि जास्त हे बेशुद्ध करून टेस्ट घ्याव-याची होती, व नंतर ऑपरेशन.

मला माझ्या बाबांवर पूर्ण विश्वास. मी ह्यांना म्हटले काहीं झाले तरी हे सर्व होण्यापूर्वी आपण हिला शिर्डीला नेऊन समाधीवर चढवून आणू या. (कारण बाबांचे वचनच आहे "माझ्या समाधीची पायरी जो चढेल, दुःख हे हरेल सर्व त्याचे").

आम्ही पुष्कळ खटपट केली पण शिर्डीस जाण्यास कोठेच तिकीट मिळेना. (कारण ते दिवस दिवाळीच्या सुट्टीचे होते) माझ्या जीवाची अगदी घालमेल झाली मी निराश होऊन दुःखी अंतःकरणाने बसले होते. तेवढ्यात रात्री ९ वाजता जावई आले व म्हणाले उद्या शिर्डीला जाणार कां? मी म्हटले बाबांची इच्छा दिसत नाहीं. माझी भाव–भक्ति अंतःकरणापासून आहे. ते म्हणाले, "अहो तुमची जाण्याची इच्छाच आहे तर सकाळी दादरहून काशी एक्सप्रेस जाते तिने मनमाडला जा व तेथून दर ४० मिनिटाने अथवा अर्ध्या तासाने शिर्डीच्या वाटेने जाणाऱ्या एस्. टी. च्या बस मिळतात." हे ऐकून हे ही म्हणाले, "चला, जाऊयाच बाबा सर्व संभाळून घेतील." लगेच मी जाण्याची तयारी केली. रात्रभर मला झोप नव्हती. पहाटे ५ वाजता आम्ही स्टेशनात गेलो. तिकिटे घेऊन डब्यात बसलो जागा बरी मिळाली. मनमाडला पोहोचलो. तोच समोरून रिकामी मनमाड शिर्डी बस. आम्ही सुखरूप २, २॥ वाजता शिर्डीस पोहचलो.

आमच्या रहाण्याची सोय गुरुस्थानातील जागेत केली गेली· आम्हास सांज–आरती शेज–आरती सर्व कहीं मिळाले. सकाळी अभ्यंगस्नान घातले व अभि-षेकासाठी बसलो. मी माझ्या नातीला पूजेचे एक स्वतंत्र ताट घेऊन दिले व म्हटले, "समाधीवर चढल्यावर बाबांना सांग 'माझ्या पाठीशी तुम्ही उभे रहा" आम्ही समाधीवर चढलो. तिने समाधीवर डोके टेकले (ह्यापूर्वी कुणीतरी समाधीवर नारळ ठेवला होता तिचा नारळ ताटातच होता). तोच समाधी-वरील नारळ तिच्या पायावर पडला. मला तो उचलण्याचा मोह झाला. पण समाधीवर गर्दी नव्हती. दोन पुजारी दोन बाजूस उभे होते. त्यांच्या समोर

तो मला उचलण्यास प्रशस्त वाटले नाहीं. मी तिला मूर्ती पुढे डोके टेकण्यास नेले. तेवढ्यात समाधीवर बरीच मंडळी चढली, व आम्ही उतरताना तोच नारळ इतरांच्या पायाने सरकत सरकत पुन्हां तिच्याचकडे आला. तेव्हां मी तो उचलला. ह्यांनी मला तेवढ्यात हटकलेच कि' आपले नारळ ताटात आहेत. नंतर बाहेर आल्यावर त्यांना मी सर्व सांगितले घरी आल्यावर मी त्याचा प्रसाद करून तिला व इतरांनाहीं दिला.

शिर्डीहून आल्यावर तिची टेस्ट झाली त्यात एकच भोक निघाले ८, १५ दिवसाने ऑपरेशन झाले.

ऑपरेशनच्या दिवशी आम्ही बरीच मंडळी होतो. आम्हास पाहून ती रडू लागली. मी तिला हळूच म्हटले घाबरू नकोस "साईनाथायनमः साईनाथायनमः" म्हण तसेच ती म्हणत, ऑपरेशन रूममध्ये स्ट्रेचर वरून गेली.

डॉ· भट्टाचार्यने विचारले बेबी तू काय बोलतेस तेव्हां ती म्हणाली मी "साईनाथायनमः" "साईनाथायनमः" म्हणते हे ऐकून त्यांना फार आनंद झाला वा! बाबा तुझ्या पाठीशी आहेत. आणि खरोखर ऑपरेशन ४,५ तास चालले. फार चांगले झाले. भोकाला पॅच जोडला. ती अगदी पूर्ण बरी झाली व आता तर फुलपाखरा सारखी वागू लागली. ही सर्व बाबांची कृपाच.

भाव भक्तिची प्रचिती त्यांनी मला दिली माझे बाबांच्या चरणी अनंत कोटी प्रणाम!

# तुळजापूरची भवानी देवी आणि श्रीसाईबाबा

—सौ. मथुराबाई हिव्बारे एम्. ए.
सींगारबाग घ. नं. १—८—२५,
बीदर (कर्नाटक).

० ह्या संघर्षस्य संसाराशी झगडता झगडता मनुष्याच्या नाकीनऊ येतात, व संकटकाळी मनुष्य आपोआपच अज्ञात अशा देवाला हाका मारतो. त्यावेळी त्याला हे माहित रहात नाहीं की देव कुठ आहे, कसा आहे. त्याच्या हाकेला देव पावला तर तो समजतो की देव आहे. त्याची अज्ञात शक्ति ह्या संसाराला सावरीत आहे. देवी देवतांच्या शक्तिबद्दल प्रचिती आली की वाटते देव आहे. आणि अशा उपकार करणाऱ्या देवी—देवतांच्या गोष्टी आपण मनात ठेवून घेणे हे किती आपल्या मनाचा कोतेपणा आहे. उलट त्यांच्या उपकाराचे व मोठे-पणाचे गुणवर्णन करण्यात त्यांचे महत्त्व वाढेलच, घटणार तर कधीच नाहीं. म्हणतात ना एखाद्या हिंस्त्र पशुवर त्याच्या संकटकाळी त्याला जर मनुष्याने मदत केली तर तो देखिल उपकारकर्त्याला कधीच विसरत नाहीं. आपण तर मनुष्य ना! काहींही असो मला वाटते ह्या विश्वाला सांभाळणाऱ्या देवाची शक्ति अपार आहे, आणि सर्वसाधारण मनुष्यावर त्याचा अनुग्रह होणे हे त्याचे भाग्य आहे.

मी एक सर्वसाधारण स्त्री. अध्यात्म काय? देव आहे किंवा नाहीं? ह्या वादविवादात कधीच पडले नाहीं. मात्र एकदा माझी एक मुसलमान मैत्रिण हिंदूलोकांच्या मूर्तिपूजेबद्दल नक्कल करून हसली. तेव्हां मला तिचा भयंकर राग येऊन मी भांडले. पण आम्ही जीवाभावाच्या मैत्रिणी असल्यामुळे माझे मन दुखावले गेल्याच्या जाणिवेने तिने माझी क्षमा मागितली, व आम्हां दोघींत हे ठरले की ह्यापुढे कधीही कोणी कोणाच्या धर्माविषयी बोलू नये. खरे पहाता मला लहानपणापासून मूर्तिपूजेचा कंटाळा होता. आपण देवाचे नामस्मरण करून किंवा गुणगान करून देवाची आराधना करावी असे आहे पण लग्नानंतर घरी देवाची (मूर्तिपूजा) करणे भाग पडले व आता तर श्री साईबाबांच्या मूर्तिविषयी मला जिव्हाळा वाटतो. ती माझ्या देवघरातील देव्हाऱ्यात आहे. त्याची पूजा मी सुंदर रितीने करते. त्या मूर्तिला मी माझ्या हातून शाल विणते, फुलांचे सुंदर सुंदर हार घालते व एक चांदीचे दोन तोळ्याचे मुकुट खडे बसवून करवून घेतले आहे. जणू शिरडीतील श्रीसाई-बाबांच्या दरबारातील मूर्तीच! आणि हे सर्व घडायला कारणही तसेच घडले.

आमच्या घरी तुळजाभवानी ही आमची कुलदेवता. एकदा आम्ही चार वर्षांपूर्वी तुळजापूरला गेलो. अन् तेथे चारपाच दिवस राहून, आपल्या मना-

सारखी भवानीची पुजाअर्चा केली. परतावयाच्या वेळी पुन्हां एकदा भवानी आईचे दर्शन घेऊन पुढे बसस्टॅंडला जावे म्हणून आम्ही देवळात शिरलो. सकाळी साडेदहाच्या सुमाराला देवीचे दर्शन घेताना देवीची मूर्ति अत्यंत सुंदर शांत वाटत होती व देवीच्या दर्शनाने आमची मने उल्हसित झाली होती. मी देवळाच्या बाहेर निघायच्या आधी शेवटच्या पायरीवर थांबून देवीला पुन्हां एकदा मनःपूर्वक प्रार्थना केली. आई भवानी जे काय केले ते तुझ्या कृपेने आता आम्हांला यश देणारी आई तूच'. असे म्हणून नमस्कार करून डोळे उघडले, व आम्ही सारेजण आनंदाने, उत्साहाने देवळा बाहेर पडून कल्लोळ तीर्थाकडे वरच्या भागाला जाणाऱ्या पायऱ्या चढू लागलो. मन देवीच्या दर्शनाने पुलकित बनले होते. त्या धुंदीत मी अगदी खुषीत पायऱ्या बीना आधाराच्या उड्या मारीत चढू लागले. सहाजिकच माझी मान खाली होती. आणखीन शेवटच्या चार पाच पायऱ्या चढावयाच्या असतील, तेवढ्यात हे शब्द माझ्या कानावर पडले. 'हं हे घे!' मी वर पाहिले व आश्चर्याने थक्क झाले. एक सोज्वळ शांत बाई हातात पंचपाळ घेऊन थांबलेली मला कुंकू लावू इच्छित आहे. मी हात जोडून उभी राहिले. माझ्या मनात उलट तिला कुंकू लावावयाचे होते पण मी लावू शकले नाहीं. पण मनाला अजब खुषी मात्र होत होती. पायऱ्या चढून वर आल्यावर लक्षात आले कि ती बाई कोण असावी, ती कुठ गेली, इतक्या पहाटे मला कुंकू लावणारी ती प्रेमळ सोज्वळ, शांत वाटणारी बाई कोण? कारण तेथे कोणाचीच गर्दी नव्हती अथवा दुसऱ्या बायकाही कुणी मला दिसल्या नाहीत. ती व मीच. मला कुंकू लावल्या नंतर ती कुठ गेली हे मला अथवा माझ्या पतीलाही कळले नाहीं. त्याचे आजही राहून राहून आम्हांला आश्चर्य वाटते. माझ्या भोळ्या मनाला वाटते की न जाणो देवीनेच तर मला कुंकू लावले नसेल? काहीं का असेना मला देवीने आपल्या दरबारात कुंकू लावून जणू शुभाशिर्वादच दिला असे मी समजते. कारण पुढे फारच लौकर (ध्यानी–मनी नसताना) आम्हांस शिरडीस जाऊन श्रीसाईबाबांचे दर्शन घ्यावयाची संधी मिळाली! अन् आम्ही बाबांच्या सेवेस लागलो. आज भवानी देवी बरोबर श्रीसाईबाबांच्या तसबिरी व मूर्ती आमच्या देव्हाऱ्यात आहेत. आता आम्ही बाबाला अन्यन्य भावनेने भजतो, व त्यांची प्रचिती तर काहीं औरच आहे. वाचकहो तुम्हीच सांगा अशा उपकार कर्त्या देवी देवतांच्या गोष्टी मनात ठेवाव्याशा वाटतील काय? मला त्यांच्या अनुग्रहाबद्दल धन्यता वाटते. धन्य ती तुळजाभवानी व धन्य ते श्रीसाईबाबा.

ॐ ॐ ॐ

# आणि इथे तर पावसाचा पत्ताही नव्हता !

—डॉ. अनिल एन. मोरे
मु. धनसार (अल्याळी–आंबेवाडी),
ता. – पो. पालघर, जि. — ठाणे.
पिन – ४०१ ४०४.

० माझा छोटा भाऊ ट्रेनिंगसाठी नाशिकला असतो. त्याला भेटायला जायचे मी व माझ्या मोठ्या भावाने ठरवले.

मंगळवारी १२ तारखेला माझा मित्तल मेडिकल कॉलेजमध्ये डेमोंस्ट्रेटरच्या जागेसाठी इंटरव्ह्यू होता. तो आटोपला कि बुधवारी नाशिकला जायचे ठरले· मी साईबाबांना इंटरव्ह्यू ठीक होण्याची प्रार्थना केली, आणि विशेष म्हणजे माझी मुलाखत (इंटरव्ह्यू) व्यवस्थित पार पडली.

ठरल्याप्रमाणे माझा मोठा भाऊ (विनोद) मुंबईत आला. त्याच्या बरोबर सौ. वहिनी व छोटी ८ महिन्याची चिनूही होती. बस! उद्या निघायचे ठरले! बुधवार उजाडला! पण भयंकरच हो! मुंबई अगदी पावसानं ओथंबत होती. धो धो पाऊस कोसळत होता. एवढ्या जोरदार पावसात नाशिक–शिर्डी आणि ८ महिन्याच्या लहान मुलीला घेऊन प्रवास करणे म्हणजे मोठा प्रसंगच!

परंतु ठरल्याप्रमाणे करायचे – त्याला साथ श्री साईंचीच असते हा माझा नेहमीचाच खाक्या बनलाय.

खोलीवरून निघायची जसजशी वेळ होत चालली. तस तसा पाऊस वाढत चालला· मी साईबाबांना नतमस्तक होऊन प्रार्थना केली· बाबा पाऊस थांबवा, मी आपल्या दर्शनासाठी छोटया चिनूला घेऊन येतोय. आम्हांला पावसाचा काहींही त्रास होऊ देऊ नका.

आम्ही दादरला पोहोचलो टॅक्सीने गाडीतही बसण्यास जागा मिळाली. (गाडी १ तास लेट) पाऊस कोसळत होता. साईंना विनवणी चालूच होती.

आम्ही नाशिकला उतरलो तर चक्क सूर्यप्रकाशाने आमचे स्वागत केले! नाशिकला भावाला भेटून आम्ही दुसऱ्या दिवशी शिर्डीत पोहोचलो, आणि

इथे तर पावसाचा पत्ताही नव्हता!" मनसोक्त दर्शन – पालखीच्या भव्य मिरवणुकीच्या सोहोळ्याचे दर्शन, अभिषेक इतकं करूनही काहीं तरी शिल्लक राहिले ह्या अतृप्त भावनेनं (कोण भक्त श्री साईबावांच्या शिर्डीतून परतताना तृप्त होत असेल? नेहमी साईदर्शन हिच तर खरी खुरी तृप्ती!) परतत होतो. अन काय आकांड-तांडव सुरू झालं. नाशिकहून पावसानं जबरदस्त सुरुवात केली. कसारा घाट पाहाणं ह्यावेळी मजेशीर व प्रेक्षणीय होतं, सगळीकडे समुद्राचं स्वरूप होतं.

खर्डी येथे तर मी लघुशंका भर पावसातच केली. आकाश अक्षरशः रडत होतं. पण ह्या अश्रूंना धरणीमाता तरी किती सावरणार! तीहि बिचारी रडत असावी म्हणूनच तर हा पूर दिसत नसावा ना? अहो मी आहे कुठे? मला अजून घरी जायचे आहे. खरी कसोटी मुंबईत गेल्यावर आहे. छोटीला घेऊन उतरावयाचे आहे.

पण पावसाचं काही कमी नाहीं .गाडी मुंबईत शिरू लागली. पाऊस थोडा कमी होत चाललाय. मी मनात म्हटले – अरे, साईबावा आपली काळजी घेण्या स असताना घाबरायचे कशाला?

मुंबईत उतरलो. पाहलो तर नुकतीच मुंबई धुऊन गेली होती. नायगांवला जायचे असल्या कारणाने टॅक्सीवाला येण्यास तयार होईना. लवकर लवकर खोलीवर पोहोचलो. पावसाचा थेंबही नव्हता.

सकाळी उठून दादर स्टेशनवर. कारण पालघरला जायचे होते. वातावरण सर्व पावसाळी. केव्हांही पाऊस कोसळण्याची शक्यता. स्टेशनात येत असतानाच पावसाने गाठले. पण आम्ही रिक्शाने घरी परतत होतो. एव्हांना पाऊस थांबला होता.

आणि ह्या पद्धतीनं आम्ही घरी नाशिक–शिर्डीचा प्रवास भर पावसात ८ महिन्याच्या चिनूला घेऊन – एकही छत्री न घेता मोठ्या आनंदाने पार पाडला होता.

हा लेख लिहितानाही भारंदस्त पाऊस कोसळतोय. १२ वाजले आहेत. पण सगळीकडे काळोख दाटून आला आहे.

बाबांना विनंती केली आमचा प्रवास सुखमय झाला. उलट बसमधून पावसाळ्यातील निसर्गदृष्य पाहताना आलेली मजा काही औरच होती.

पण श्री साई आमच्या बरोबर नसते तर आमचा प्रवास सुखाचा झालाच नसता. ह्या प्रवासात विशेष गोष्ट जाणवली, कि आम्ही गाडीत असतांना किंवा बस मध्ये असतानाच पाऊस पडत होता.

धन्य साईबाबा! एवढा दूरवरचा प्रवास छत्रीविना आम्ही केला होता. श्रीसाईबाबांचे आशिर्वादरूपी छत्र पाठीशी असतांना छत्रीची काय आवश्यकता? हा विचार ही मनात येऊन गेला व चटकन ओळ डोळ्यासमोर तरंगू लागली.

**"जो जो मज भजे' जैसा जैसा भावे ।**
**तैसा तैसा पावे मीही त्यासी !!"**

८ महिन्याच्या चिनूला बदललेलं वातावरण काही पेलवलं नाहीं. हवेचा बदल, पाण्याचा बदल, दुधाचा बदल आणि विशेष म्हणजे धो धो कोसळणाऱ्या पावसाचा ह्या नाजूक कोवळ्या बालकावर परिणाम होणार हे सहजच!

आणि आमचीही चिनू तापानं फणफणू लागली. तिचा उत्साह कुठल्या कुठं गायब झाला.

मीही एवढ सिरियसली घेतलं नाहीं. साईबाबांची उदी लावली, व साईबाबांना प्रार्थना केली. जसजशी रात्र होत चालली तसतशी तिचा आजाराचाही सिरियसपणा जाणवू लागला.

थर्मामिटरनं ताप पाहिला तर – १०३–१०४ बापरे! फारच! मी थोडासा चपापलो.

बाबांना म्हटलेही की तुम्हीच तर म्हणालात कि माझा भक्त कुठेहि असला तरी मी त्यांना ओढून आणिन मग ह्या चिनूंन येऊन आजारी का पडावं? उद्या तर रविवार दवाखानेही बंद.

(मी अजून दवाखाना उघडला नाहीं पण थोड्या प्रमाणातच माझ्याकडे काही औषधे असतात) पण सुदैवानं एका डॉक्टरांचा रविवारी दवाखाना उघडा असतो. तिथून औषध वगैरे आणले. परंतु रात्रीचा ताप काहीं उतरेना.

मी पुन्हां बाबांची उदी तिच्या अंगाला–डोक्याला चोळलीच मात्र सोमवारी नेहमीच्या डॉक्टरांकडून औषध आणले गेले.

आमच्या चिनूचा ताप हटला व ती जिंकली. तरी अजून तिचा उत्साह परत आलेला नाही.

पण तापापासून ती पूर्ण मुक्त झाली.

कारण सतत दोन दिवस ती १०३–१०४ तापाने फणफणत होती तेव्हां तिला सहारा दिला तो फक्त श्री साई उदीनेच!

हीच तर खरीखुरी श्री साईमाया!

# श्री साईप्रभो अगाध किती तव करणी

–श्रीमती शशिकला मरबल्ली.
१, अलहम्ब्रा, ३, कारमायकल रोड,
मुंबई–२६.

० आमच्या कुटुंबात सर्वांची श्री बाबांवर भक्ति व श्रद्धा आहे. दयाळू बाबांच्या कृपेने आमच्या संसारातील वेळोवेळी आलेल्या लहान मोठ्या अडचणी व प्रश्न आपोआप सुटले जातात. प्रथम अतीशय काळजी व मनाला धाकधूक वाटत असते. अशावेळी आम्हांला बाबांचा एकच आधार· मी सतत बाबांचा नामजप व ध्यान करीत असते, आणि मायबाप बाबांच्या कृपेने सर्व काहीं ठीक होऊन मनाला शांतता वाटते. अशावेळी तीव्रतेने वाटते की हे सर्व साईलीलेत द्यावे, पण तसेच राहून जाते. परंतु श्रीबाबांची इच्छा होती म्हणूनच की काय माझ्या मुलीकडे ही खालील घटना घडली.

माझे जावई डॉक्टर आहेत ते अतिशय भाविक आहेत. रोज सकाळी प्रथम देवाची यथोचित पूजा करून मगच सर्व व्यवहारास लागतात. त्यांच्या घराच्या

बाहेरच्या दरवाजावरच बाबांचा एक मोठा फोटो लावलेला आहे. बाहेर जाताना सर्वांस बाबांचे दर्शन होत असते.

माझा नातू, मुलीचा मुलगा, अजित हा रोज रात्री देवाच्या खोलीत एका पलंगावर झोपत असतो. त्याच्या उशाशी दोन फुटावर एक सन्मायकाच्या कपाटासारखा चार फूट उंच व चार फूट रुंद उघडा देव्हारा आहे. त्याला छान नक्षीचे मखर आहे' त्या कपाटावर सर्व धर्मीय देवांचे व संतांचे फोटो ठेवलेले आहेत. त्यात श्री बाबांचा फोटो प्रथम ठेवलेला आहे. देव्हाऱ्यात अभिषेकाचे देव आहेत. त्यातही बाबांची एक पावली एवढ्या चांदीच्या नाण्या वर छापलेली मूर्ति आहे. ह्या देव्हाऱ्याच्यावर दोन फुटांवर एक भले मोठे आठ फूट रुंद व दोन फूट उंचीचे सन्मायकाचे स्लायडिंग दरवाजे असलेले जाडजूड कपाट भिंतीत लावलेले आहे. ह्यांत भरगच्च पुस्तके व काचेचे सामान भरलेले आहे.

गेल्या ६ एप्रिलच्या दिवशी मध्यरात्री भयंकर आवाज झाला व ते वरचे कपाट एकदम कोसळले व त्या देव्हाऱ्यावर अलगद बसले. ते जर खाली पडले असते तर नक्कीच जवळ निजलेल्या अजितच्या डोक्यावर पडले असते. मग काय झाले असते ह्याची कल्पना सुद्धा करवत नाहीं. पण त्या देव्हाऱ्यावर बाबा बसलेले होते. त्यांनी ते अलगद धरून ठेवले, व माझ्या पोराचा जीव वाचविला. इतकेच नव्हे तर त्या कपाटातील काचेचे सामान व देवाचे फोटो, तसेच ते देव्हाऱ्याचे मखर वगैरे सर्व काहीं मोडतोड न होता अगदी जसाचे तसेच व्यवस्थित राहिले होते. हे एवढे मोठे कपाट त्या लहानशा कपाटावर पेलले गेलेच कसे? ही सर्व श्री दयाळू बाबांची अगाध करणी नव्हे कां?'

श्री बाबांच्या कृपेला व उपकाराला तोड नाहीं. अशीच कृपा बाबा सदैव सर्वांवर ठेवोत. बाबांच्या चरणी आम्हां सर्वांचे कोटी कोटी प्रणाम.

# साईबाबांनी माझ्या मुलीवरचे संकट टाळले

—श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार.
किल्ला नांदेड.

० माझ्या तिसऱ्या नंबरच्या जावयाने माझ्या मुलीस बाळंतपणा करिता नांदेड मुक्कामी आणून सोडले. ते खेडयात रहात असल्यामुळे तेथे सोय होणार नाहीं म्हणून माहेरी पाठविले होते. तसे सौ. अरुणास माहेरी (माझ्याघरी) येऊन एक महिना झाला होता. परंतु २० मार्च १९८४ पर्यंत ती बाळंतीण झाली नाहीं. इकडे माझे मुली व मुलाचे ३ मे रोजी लग्न तिथी ठरली होती· आम्हांस वाटत होते की बाळंतपणातून या मुलीची सुटका लवकर झाल्यास बरे होईल.

शेवटी २० मार्च १९८४ रोजी रात्रीचे भोजन आटोपल्यावर तिच्या पोटात कळा येण्यास सुरवात झाली. शेजारीच एक नर्सबाई रहात होती तिला बोलावून दाखविताच तिने तावडतोब रिक्षा आणावयास सांगितले व त्या सिस्टरने स्वतःच तिला येथील प्रख्यात बाळंतपणाचे डॉक्टर भालेराव यांच्याकडे नेले. त्यांनी लगेच कोणास न विचारता ऑपरेशन थिएटरमध्ये नेले व सीजरीन करून बाळास सुखरूप बाहेर काढले. मेजर ऑपरेशन झाले होते. बाळ आडवे होऊन हात बाहेर निघत होता व त्यास काहींच विचारण्यास वेळ नव्हता. बाळ व बाळंतीण दोघानाहीं धोका होण्याचा संभव होता. बाहेर येऊन डॉक्टरने फक्त एवढे विचारले की कुटुंब नियोजनाचेही ऑपरेशन करावयाचे आहे का? मुलीने अगोदर आम्हांस सांगून ठेवले होते की मला दोन मुलगे आहेत जर मुलगी झाली तर ऑपरेशन करून घ्यावयाचे. तिच्या इच्छेनुसार आम्ही होकार दिला व डॉक्टरांनी लगेच ते ही ऑपरेशन करुन टाकले. बेशुद्ध अवस्थेत ग्लुकोजच्या बाटल्या देत रात्र निघून गेली. कोणास काहींच समजले नाहीं.

दुसऱ्या दिवशी सकाळी मात्र तिचे पोट फुगले व श्वासोच्छ्वासास त्रास होत होता. जेवण झाल्या बरोबर ऑपरेशन झाल्यामुळे अन्नाचे गॅसेस झाले. डॉक्टरांनी नाकावाटे रबरी नळी घालून पोटातील पाणी काढणे चालू ठेवले. परंतु तिची ती अवस्था पाहुन डॉक्टर भालेराव व मिसेस भालेराव हेही घाब-

रले, व केस सिरीयस झाली आहे, तिच्या घरच्या मंडळींना बोलावून घ्या म्हणताच आमच्या तोंडाचे पाणी पळाले. एकीकडे लग्नाची तयारी चालू असतांनाच हे विघ्न आल्यामुळे फार चिंता वाटू लागली· लगेच तिच्या घरच्या मंडळींस बोलावून घेतले. पती, सासरा, सासू, नणंद, दीर वगैरे सर्व मंडळी आली व तिची अवस्था पाहून डोळ्यातून अश्रु काढू लागली. मी माझ्या पत्नी जवळ साईबाबांची उदी नेऊन दिली व पोट जे तुडूंब फुगले होते व टाके तुटण्याचीही भिती होती तिथे चोळण्यास किंवा फक्त पोटावर शिंपडण्यास सांगितले व कपाळावर उदीचा टीळा लावण्यासही सांगितले.

दोन दिवसांनंतर ती किंचित शुद्धिवर आली व नानांस बोलवा म्हणाली. मी गेल्यावर लगेच तिने माझ्या गळ्यातील साईबाबांचे लॉकेट देण्यास इशारा केला. मी लॉकेट काढून दिल्यावर तिने ते डोळ्यास, कपाळास व गळ्यास लावून परत दिले. व पुनः तिला झोप लागली. डॉक्टरांच्या चकरा एक सारख्या चालू होत्या. त्या हॉस्पिटलमध्ये दोनशेच्यावर खाटा आहेत ते म्हणाले की, आमचे सर्व लक्ष ह्या पेशंटकडे केन्द्रित झाले आहे. मिस्टर भालेरावने लिहून दिलेले इंजेक्शन परत करून दुसरे इंजेक्शन मिसेस भालेरावने आणावयास लावले. दोघांनी आपसात विचार विनिमय करूनच उपचार केला होता. जेव्हां माझी मुलगी साईबाबांच्या लॉकेटाच्या दर्शना नंतर जागी झाली व डॉक्टर तपासावयास आले तेव्हां त्यांनी स्वतः होऊनच सांगितले की आता संकट टळले काहीं काळजी करू नका.

तिच्या सासऱ्यास, सासूस व नवऱ्यास व इतर त्यांच्या घरच्या मंडळींस आनंद वाटला. परंतु मला तर त्याचवेळी खात्री पटली होती ज्यावेळी तिने माझ्या गळ्यातील लॉकेट घेऊन कपाळी लावले होते की आता ती निश्चित बरी होणार.

असो एकंदरीत तिला वीस दिवस हॉस्पिटलमध्ये ग्लूकोजवर रहावे लागले. नंतर तिला मोशन्स झाले व पोटातील सर्व व्याधी निघून जाऊन तिचे पोट पूर्ववत सपाट झाले. तिला भूक लागू लागली. परंतु डॉक्टरांनी सध्या फक्त चहा व कॉफीच द्या नंतर हळू हळू-पातळ शिरा वगैरे देण्यास सांगितले. ती बरी होऊन दवाखान्यातून घरी आली तेव्हां सर्वांनाच आनंद झाला.

आता दोन लग्नाच्या तयारीस (जी ठप्प पडली होती) पंधरा दिवसांचाच अवधि शिल्लक राहिला होता. सुरवात झाली. तेव्हां एप्रिल महिन्याचा साई-

लीला" अंक (रामनवमी विशेषांक) हाती पडला त्याच्यावर साईबाबा श्याम-सुंदर घोड्यावर धावत येऊन माझ्या घरीच उतरले व घोड्याच्याच टेक्याने उभे राहिलेले पाहून माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू निघाले. जणू बाबा म्हणत होते, "बेटा मैं हवासेभी तेज रफ्तार से घोडेपर सवार होकर तेरी मदद को आया हूं."

मला समाधान वाटले आता निश्चितच सर्व काहीं ठीक होईल अशी माझी खात्री झाली व काय आश्चर्य दोन्ही लग्नाचा सोहळा ३ मे १९८४ रोजी अक्षय तृतीयेस गुरुवारी मोठ्या थाटामाटात साजरा झाला. भोजनाचे पंक्तीस एकच्या सुमारास आरंभ झाला तेव्हांचे दृश्य असे होते जसे शिर्डीतील भोजनालयातच भक्तगण भोजनास बसले आहेत. एक हजार स्त्रियांची ती पंगत, वाढपी कोठून आले, अन्नाचा तुटवडा न पडता उलट अन्न शिल्लक कसे राहिले याचे इतरांना नवल वाटले असेल. परंतु ही सर्व किमया साई बाबांचीच आहे हे मला माहित होते.

※ ※ ※

# नित्य घ्या प्रचिती....

—सौ. सुनंदा सा. इनामदार.
निरलॉन सोसायटी,
गोरेगाव (प.) मुंबई ६२.

• मी व माझे यजमान आम्ही दोघेही बाबांचे भक्त आहोत जवळ जवळ ३०–३५ वर्षे (लग्नाच्या आधीपासून) मी बाबांच्या दर्शनास जात आहे. व गेली १८ वर्षे आम्ही दोघेही न चुकता गुरुपौर्णिमेला जात आहोत.

कोणत्याही बाबतीत बाबांनी आम्हांला कसलीही कमतरता केली नाहीं. विशेष म्हणजे रहाण्याची जागासुद्धा पैसा न खर्च करता मिळाली व अशा काही गोष्टी घडल्या की स्वप्नातसुद्धा त्या गोष्टींची कल्पना नव्हती.

आमच्यावर खूप मोठी दुखणी आली परंतु त्याच्यातूनच श्री बाबांनी आम्हांला व्यवस्थित उभे केले.

श्री बाबा हेच आमचे आई बाप भाऊ आहेत असे म्हटले तर काहीं बाधक होणार नाहीं.

म्हणूनच आज मी माझा एक अनुभव सांगणार आहे. गेल्या वर्षी माझ्या यजमानांनी आपल्या गळ्यातील दीड तोळ्याची साखळी आपल्या बुशकोटमध्ये ठेवली व त्याबद्दल मला ते काहींही बोलले पण नाहींत. मी तो बुशकोट घेतला व इतर कपड्यांबरोबर मी तो धुवावयास नेला व व्यवस्थित धुवून मी तो बाहेर झटकून गॅलरीत तारेवर वाळत घातला. थोड्यावेळाने माझ्या यजमानांच्या लक्षात आले की मी गळ्यातील साखळी बुशकोटच्या खिशात ठेवली होती. म्हणून ते मला सांगावयास आले तोपर्यंत मी कपडे धुवून बाकीचे पाणी फेकून दिले.

मला वाटले साखळी पाण्याबरोबर पाईप लाईन मधून गेली, व ती फोडून बघायची म्हणजे खूपच खर्च आला असता. म्हणून साखळी गेली तर जाऊ दे असे माझे यजमान मला म्हणाले. मला खूपच वाईट वाटले.

परत एकदा खात्री करण्यासाठी माझ्या यजमानांनी बुशकोट तपासला परंतु त्यांना साखळी मिळाली नाहीं.

मी पहायला गेली तर बुशकोट उलटा तारेवर वाळत घातला होता व खिशाचे तोंड खाली होते म्हणजे साखळी खाली रस्त्यावर पडली असेल व ती आता मिळणे शक्य नाहीं म्हणून मी पण निराश झाले व त्याच परिस्थितीत आमच्या देव्हाऱ्यातील बाबांच्या फोटो समोर उभे राहून श्री बाबांना सांगितले की आज मला तुमची प्रचिती बघायची आहे.

तुमचे जर खरे प्रेम असेल तर साखळी मिळालीच पाहिजे असे बोलून मी परत गॅलरीत आले व बुशकोटच्या खिशात हात घातला तर काय आश्चर्य! खिशाच्या एका भोकशात साखळी अडकून राहिली होती. ती साखळी पाहताच माझे डोळे पाण्याने भरले व तशीच बाबांच्या फोटोपुढे उभे राहून बाबांना शतशः प्रणाम केले.

अशीच आमच्यावर कृपादृष्टी ठेवा हीच आमची उभयतांची श्री बाबांच्याकडे मागणी.

**नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य ॥**
**नित्य घ्या प्रचिती अनुभवे ॥**

# श्रीसाईकृपा

—श्री. किसनराव कुलकर्णी.
श्री साईकृपा, १६१ कैलासनगर,
आदिलाबाद (आं. प्र.) ५०४००२

० १९७२ हे वर्ष आमच्या कुटुंबियांना सुस्मरणीय आणि भाग्याचे वाटते. कारण ह्याच वर्षी आम्हांस श्रीक्षेत्र शिर्डीस जाऊन करुणामय बाबांच्या समाधिचे दर्शन घेण्याचा योग आला.

१९७५ साली आम्ही दर वर्षाप्रमाणे श्रींच्या दर्शनासाठी श्रीक्षेत्र शिर्डीस गेलो. माझ्या सौभाग्यवतीने समाधी मंदिरात बाबांपुढे स्वतःचे घर पाहिजे म्हणून हट्ट धरला व त्या दयामय पित्याने हट्ट पुरविण्यास सुरुवात केली. आम्ही परत येताच दारात सोसायटीचा लेख सापडला त्यास आम्हांस प्लॉट नं. १६१ दिला गेल्याचे कळविले होते. घरात आनंदी आनंद झाला.

**नवसासी माझ्या पावेल समाधी**
**धरा दृढ बुद्धि माझ्या ठायी**

१९८० साली बचतीच्या पैशातून घराचा पाया बांधून घेतला व काम पूर्ण होताच आम्ही सर्व शिर्डीस जाऊन आलो. सिमेंटच्या टंचाईमुळे बांधकाम स्थगित करावे लागले. अशातच मला पोट दुखीचा आजार झाला. कितीही औषधोपचार केला तरीही काहींच फायदा होत नव्हता. नांदेड, औरंगाबाद, हैद्राबादला जाऊन स्पेशालिस्ट डॉक्टर्सना दाखवून घेतले तरी रोगाचे निदान होत नव्हते. घरात काळजीचे वातावरण, मुलांचे अभ्यासात लक्ष लागत नव्हते. बाबांची पुजा, आरती व धावा मात्र सारखा चालू होता. १९८१ साली अशा परिस्थितीतही शिर्डी यात्रा झाली. परत येताच घरातील दागिने विकून बांध-कामास सुरवात केली. आक्टोबर मध्ये भिंतीचे बांधकाम पूर्ण झाले.

१-११-१९८० रोजी मला दवाखान्यात दाखल व्हावे लागले. जवळचा सर्व पैसा संपलेला, दागिने पण गेले, रजेवर असल्यामुळे पगार नाहीं व अशा परिस्थितीत दवाखान्याचा वाढता खर्च, फार बिकट परिस्थिती. सर्व आप्तेष्टां-

कडून निराशा व मित्रांकडूनही काहींच अपेक्षा राहिली नाहीं. फक्त बाबांचा धावा करण्या पलिकडे आमच्या हाती काहींच उरले नाहीं.

दि. २५–११–१९८१ रोजी गुरुवारी मला घरी पाठवण्यात आले व आमचे अधिकारी श्री. जे. बालाजी ह्यांच्या सौजन्याने रजेचा पगारही मिळाला. जरा समाधान वाटले. शेजारती करण्यास श्री बाबांच्या फोटो समोर उभा राहिलो आणि प्रथमच अंतःकरणापासून बाबांना विचारले, 'माझी इतकी हाल अपेष्टा करावयाची होती तर घर बांधण्याची बुद्धि व प्रेरणा का दिलीत?' झोपण्यास अंथरूण गाठले तर दारावर हाक आली' दाराबाहेर एक म्हातारा जर्जर झालेला भिकारी होता. घरातून भाकर आणून दिली तो म्हणाला, "भुकेल्यास भाकर मिळाली तरी आनंद वाटतो." ह्या सूचकतेच्या उद्गारात मला बाबांचे उत्तर मिळाले.

दुसरे दिवशी नोकरीवर रूजू झालो. एक तारखेस पगार मिळताच सर्व मित्रांनी प्रत्येकी (३०० रु.) जमा करून लकी नंबर लागेल त्यास एकत्र केलेले रु. ३०००।– द्यावयाचे ठरविले. त्या प्रमाणे श्रींचे स्मरण करून पैसे भरले व पहिला लकी नंबर माझाच लागला. आता फक्त (२००० रु.) जमल्यास घराचा स्लॅब टाकण्यास लागणारे साहित्य घेऊ शकत होतो. श्री. बाबांच्या प्रेरणेने आमच्या अधिकाऱ्यांनी मदत केली व दि. ९–१२–१९८२ रोजी घराचा स्लॅब टाकून झाला. तेव्हां पासून खंड न पडता घराचे काम झाले व २५–११–१९८३ रोजी गृहप्रवेश पण केला.

घराचे नाव "श्री साईकृपा" प्रवेश दाराच्या डाव्या बाजूस मार्बल स्टोन वरील बाबांचे चित्र, घरात प्रत्येक दारावर असलेले बाबांचे फोटो, प्रवेश करताच दर्शन घडणारे बाबांच्या मोठ्या फोटोकडे पाहून आमचे अधिकारी म्हणाले हे तर साई मंदिरच आहे. त्यांना काय माहित की जे अशक्य होते ते बाबांच्या कृपेनेच शक्य झाले आहे. व आज आम्ही "श्री साईकृपा" च्या छत्र छायेत रहात आहोत.

**जाणा येथे आहे सहाय सर्वांस**
**मागे जे जे त्यास ते ते लाभे**

☆

# मला व मुलीला पण बरे वाटले

—श्रीमती शुभांगी प्रभाकर पाटणकर.
३५०, गोलनजी हिल,
परळ व्हीलेज, मुंबई नं. ४०००१२.

० गेल्या वर्षी म्हणजे १० जुलै १९८३ रोजी माझे पती श्री. प्रभाकर नारायण पाटणकर यांचे हृदयविकाराच्या झटक्याने अकस्मात् निधन झाले. त्या आधी जवळ जवळ दोन महिने मला मासिकपाळीचा त्रास होत होता. ओटीपोटात खूप दुखे, व रग पण लागत असे. अधून मधून ब्लीडिंगचा पण त्रास होत होता. म्हणून मी आमचे फॅमिली डॉक्टर नेने यांच्याकडे गेले. त्यांनी मला तपासून सांगितले पण तत्पूर्वीच एकाएकी माझ्या पतींचे अकस्मात् निधन झाले व माझ्यावर आभाळच कोसळले.

एके दिवशी दुपारी माझी मुलगी स्वाती शेजारी गेली असता तिला श्रीसाईलीला मासिकाचा अंक त्यांच्याकडे दिसला व तिने तो अंक घरी आणला आम्ही दोघींनी साईलीलेतले लेख वाचले व माझे अंग शहारले. खरचं केवढी अगाध लीला ही!

थोड्या दिवसानी मला अचानक खूप त्रास होऊ लागला माझ्या मुलीच्या मनात आले की आपणही साईबाबांना का साकडं घालू नये? योगायोगाने तो वार गुरुवार होता. झालं, ती साईबाबांच्या फोटोपुढे बसली, उदबत्ती लावली व साईबाबांना विनवू लागली माझ्या आईचे दुखणे लवकर बरे होऊ दे, आणि काही दिवसांनी मी बरी झाले. आता माझी तब्येत ठीक आहे. केवळ साई-बाबांच्याच कृपेने हं!

माझा दुसरा अनुभव म्हणजे माझी सर्वात धाकटी मुलगी सीमा हिला ३१ जानेवारी १९८४ पासून ताप, उलटचा व जुलाब सुरू झाले. आमच्या फॅमिली डॉक्टरकडून दोन दिवस औषधोपचार केले, उलटया, जुलाब थांबले पण ३ फेब्रुवारीला संध्याकाळी अचानक तिला श्वासोच्छ्वासाचा त्रास होऊ लागला. डॉक्टरांना टायफॉईडची शंका आल्याने त्यांनी तिला कस्तुरबा हॉस्पि-टलमध्ये ठेवण्यास सांगितले. त्याप्रमाणे आम्ही लगेच तिला दाखल केले.

योगायोगाची गोष्ट म्हणजे ज्या वॉर्डमध्ये ठेवले होते त्याच वॉर्डमध्ये साईबाबांचा फोटो होता. माझे अचानक फोटोकडे लक्ष गेले व मी मनोमन त्यांना वंदन केले. दुसरे दिवशी पहाटे साडेचार पाचच्या सुमारास तिचा डावा खांदा दुखू लागला व श्वासोच्छ्वासाचा जास्त त्रास होऊ लागला. मी सिस्टरना सांगून डॉक्टरांना ताबडतोब बोलावण्यास सांगितले. तोपर्यंत मी तिला साईबाबांची उदी लावली, डाव्या खांद्याला पण चोळली व मनातल्या मनात साईबाबांचा धावा सुरू केला व विनवले की माझ्या मुलीची तब्येत लवकर बरी होऊ दे आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिचा खांदा दुखायचा थांबला व पुढे आठच दिवसांनी तिला डिसचार्ज मिळाला.

# आगळे वेगळे नामस्मरण

–श्री. टी. डब्ल्यू वाणी.
मेलओव्हरसिअर,
(पोस्टल डिपार्टमेंट)
जळगाव

पहिले वंदन श्रीसाईबाबांना ।
दुसरे वंदन श्रीसाईलीला संपादकांना ॥
तिसरे वंदन श्री साईभक्तांना ॥

० दि. ११–५–८४ ला सकाळी ९ च्या दरम्यान "श्रीसाईलीला" उदी विशेषांक" वाचन करित असता उदीचे महत्त्व समजले त्यावरून, माझ्या डावा पाय ६ महिन्यापासून तळपायाजवळ सारखा दुखत होता. तो इतका दुखत होता की अनवाणी चालणे त्रासाचे होत होते. नेहमी पादत्राणे वापरत

होतो. त्यावर उठून लगेच देवपाटावर ठेवलेली साईउदी डबीतून पांचवेळा सारखी लावली तर पंधरा मिनिटातच पाय बरा झाला.

साईलीला मासिकाचा मी नविनच वर्गणीदार आहे. पहिला अंक नोव्हेंबर डिसेंबर ८३ मिळून अंक हाती पडताच त्यावर असलेले मुखपृष्ठावर बैठकदार बाबांचा फोटो तसबीर तयार करून "श्रीसाईलीला" अक्षरे तशीच ठेऊन तयार केलेला फ्रेमफोटो देवपाटात लावला. पुजा करू लागलो. त्याच आठवड्यात शिरडी येथून माझ्या मित्राने साईची पितळी मूर्ती आणून दिली होती. तिची पुजा करू लागलो काय आश्चर्य कथन करू मी! ज्यावेळी श्रीसाईलीला मासिक वर्गणीदार झालो. त्यावेळी भाडोत्री घरात रहात होतो. व आज मी स्वमालकीच्या विकत घेतलेल्या जागेत, उदी विशेषांक वाचन करू लागलो. केवढी कृपा बाबांची व साईलीलाची!!

वाचकांनो व माझ्या साईभक्तांनो मी काहीं विधीपूर्वक पुजा वगैरे करीत नाहीं फक्त करतो आगळे वेगळे साई नामस्मरण" ते असे की नाकातून श्वास सोडताना सा व घेताना ई असे शब्द मनातल्या मनात म्हणत श्वासो-श्वास करतो म्हणजे अनायासे साई नामस्मरण होते.

श्रद्धा सबूरी भाव ।
तेथे माझा साईदेव ।।

बाबांना भक्तांना नमस्कार करून लेख संपवितो.

# संकटसमयी धावे भक्तांसाठी

—सौ. निर्मला नामदेव घोडे.
कुरार व्हिलेज, मालाड (पूर्व),
दप्तरी रोड, मुंबई ४०००६४.

० जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव. साईबाबांनी आम्हांला अनेकदा लहान मोठे अनुभव दिले आहेत· जेव्हां जेव्हां आमच्यावर संकटे आली, त्या त्या वेळेला साईनाथ आमच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिलेले आहेत. महिन्या पूर्वीची गोष्ट· नणंदेचे लग्न चांगल्या प्रकारे होऊ दे म्हणून मी साईबाबांना प्रार्थना केली. पैशाची अडचण होतीच. तरी पण चारही नणंदा तील ही शेवटची नणंद म्हणून हिचे लग्न चांगल्याप्रकारे करावयाचे ठरवून आम्ही गावी गेलो. लग्नाच्या तीन–चार दिवस अगोदर माझे मिस्टर, सासरे व मोठे दीर नणंदेच्या गावी टिळयानिमित्त जात असताना फलटण तालुक्यामध्ये हे उतरले व आपल्या मावशीकडे गेले. अचानक तेथे माझ्यापेक्षा लहान दिराचे लग्न ठरले. प्रश्न पडला नणंदेचे लग्न तीन दिवसांवर व त्या लग्नामध्ये हे दुसरे लग्न? कसे शक्य आहे. परंतु मी साईबाबांची मनांमध्ये प्रार्थना केली व म्हणाले बाबा आमची दोन्ही लग्ने व्यवस्थित पार पाडा मी आपणास विसर-णार नाही. असे म्हणून आम्ही दोन्ही लग्नाच्या तयारीला लागलो. तेवढयाच पैशात मी लग्ने करावयाची ठरविले. प्रश्न होता तो जेवणाचा कारण मी जे बजेट काढले होते तेवढयात बजेटमध्ये आमची दोन्ही लग्नांची माणसे व्यवस्थित जेऊन थोडे जेवण शिल्लक राहिले. त्याचप्रमाणे घेऊन गेलेल्या पैशातून हजार रुपये शिल्लक राहिले· मला आश्चर्य वाटले. मला वाटत होते की लग्नात पैसे कमी पडतील. पैसे देण्यासारखे एकही नातेवाईक नव्हते, उलट खेळ पाहून हसणारे होते· परंतु एका लग्नामध्ये दुसरे लग्न करुन सुद्धा पैसे शिल्लक राहिले होते. मला फार फार आनंद झाला हे सर्व साईकृपेमुळेच सफल झाले होते अशा प्रकारे साईनाथ संकटाच्यावेळी धावून आले. अशीच साईचीकृपा आमच्यावर सदैव राहो हीच साईचरणी प्रार्थना आहे.

# सहज गंमत म्हणून बोललो आणि....

***********************

–श्री. अनिल नारायण रिलबूड.
द्वारा श्रीमती मनोरमा र. भागवत,
२२३, नवी अमृतवाडी, दि. प. रोड,
गिरगाव, मुंबई – ४०० ००४.

० आमच्या सर्वसाधारण विमा कंपनीचे महामंडळ व सरकार ह्यांच्यावर आमच्या सर्व युनियन्सनी एकत्रितपणे नव्या वेतनश्रेणी पद्धतीबद्धल सुप्रीम कोर्टात केस दाखल केली होती. ती केस जवळ जवळ तीन–चार वर्षे चालली होती. सहा–सात महिन्यांपूर्वीच त्या केसचा निकाल आमच्या युनियन्सच्या बाजूने लागला· सुप्रीम कोर्टाने नविन वेतनश्रेणी पद्धत रद्दबातल ठरवून १९७४ ची वेतन श्रेणीपद्धत, दुसरी नवीन वेतनश्रेणी पद्धत अंमलात येईपर्यंत चालू ठेवावी. तसेच महागाईभत्ता व अन्य जे फायदे आहेत ते कर्मचाऱ्यांना ताबडतोब देऊन टाकावेत असा आदेश सुप्रिम कोर्टाने दिला. परंतु ह्या गोष्टी ला सहा–सात महिने होऊनही सर्वसाधारण विमा महामंडळ व सरकार काहीच दाद देईनात. आमच्या युनियन्सनी एक–एक तासाचा दोन वेळा संपही करून पाहिला. तरीसुद्धा काहींच उपयोग झाला नाहीं. आमचा महागाईभत्ता जवळ जवळ अठरा महिन्यांचा देण्याचा बाकी होता. ती थकबाकी पुष्कळच होती. किमान रु. १२०००!– तर कमाल रु. पांच ते सहा हजारापर्यंत इतकी थकबाकी मिळणार होती व पगारातही त्यामुळे रु. दिडशे ते रु. तिनशे पर्यंत वाढ होणार असल्यामुळे सर्वांचे डोळे महागाई भत्त्याबद्दल आदेश कधी येतो ह्याकडे लागले होते. परंतु इतके महिने होऊनही काहींच हालचाल होत नसल्यामुळे सर्वजण निराश झाले होते.

असाच एके दिवशी ऑफिसला जाण्यासाठी मी बोरिवलीला गाडीत बसलो. गाडीत बसल्या बसल्या श्रीसाईबाबांचे नामस्मरण चालले होते. डोक्यात दुसरे काहीं विचारही चालले होते. एकाएकी आमच्या महागाई भत्त्या बद्दलचा विचार माझ्या डोक्यात आला व सहजच एक गंमत म्हणून मी श्रीसाईबाबांची मूर्ती डोळ्यासमोर आणून पुढीलप्रमाणे प्रार्थना केली.

"बाबा, केसचा निकाल आमच्या बाजूने लागला आहे. सत्याचा विजय होऊन देखिल व्यवस्थापक मंडळ अजून काहींच कशी कृती करीत नाहीं?

आमच्या महामंडळाकडून महागाईभत्ता देण्याबद्दलचा आदेश लवकरात लवकर येऊ दे. तसा आदेश लवकर आला तर मी तुम्हांला शाल अर्पण करीन व श्रीसाईश्रममध्ये तुम्हांला (फुलांची) वाडी भरीन" इतके बोलून नंतर मी माझे हे विचार गाडीतल्या वातावरणात विसरूनही गेलो. परंतु विजेचे बटन दाबताच तत्परतेने दिवा अथवा पंखा सुरू व्हावा, त्याच्या कितीतरी पट तत्परतेने माझी प्रार्थना ऐकल्यावर बाबा धावून आले. मी गाडीत प्रार्थना करीत होतो तेव्हां साडेनऊ ते पावणे दहाची वेळ होती व त्याचवेळी आमच्या ऑफिसमध्ये टेलेक्सद्वारा महागाईभत्ता देण्याबद्दलचा आदेश येऊन थडकला होता. म्हणजेच मी करीत असलेली प्रार्थना व टेलेक्सद्वारा आलेला आदेश ह्या दोन्हीही गोष्टी एकाच क्षणाला घडल्या होत्या.

चर्चगेटला गाडीतून उतरल्यावर ऑफिसला जाण्यासाठी निघालो. आमचे ऑफिस चर्चगेट समोरच असल्यामुळे दोनच मिनिटांत ऑफिसच्या इमारतीमध्ये आलो. ऑफिस पाचव्या मजल्यावर असल्यामुळे लिफ्टसाठी रांगेत उभा राहिलो होतो. इतक्यात लिफ्ट वरून खाली आली. लिफ्टमधून आमच्याच ऑफिसमधली एक ओळखीची व्यक्ति बाहेर पडली व मला म्हणाली, "अरे अनिल, आपला महागाईभत्ता देण्याबद्दलचा आदेश टेलेक्सद्वारा आला आहे." मी त्याला म्हटले, 'सकाळी सकाळीच काय थापा मारतोस?' तेव्हां तो म्हणाला 'देवाशपथ खरेच सांगतो आहे" एवढे बोलून तो निघून गेला व मी लिफ्टमध्ये शिरलो. तावडतोब मला माझे गाडीतील शब्द आठवले व विचार करू लागलो की, खरोखरीच ही गोष्ट जर खरी असेल तर बाबांनी माझी प्रार्थना नक्कीच ऐकली असली पाहिजे· ऑफिसमध्ये प्रवेश केल्यावर ती गोष्ट खरी असल्याचा प्रत्यय आला. सगळीकडे आनंदाचे वातावरण पसरले होते. प्रत्येकजण खुषीमध्ये दिमत होता. माझ्या टेबलावर असलेल्या श्रीसाईबाबांच्या फोटोला कृतज्ञतेने हात जोडले व म्हटले' बाबा, खरोखरीच तुमची लीला अगाध आहे. इतक्या तत्परतेने तुम्ही माझ्या हाकेला धावून आलात. धन्य तुमची, बाबा, माझे तुम्हांला शतशः प्रणाम!" मी सहज गंमत म्हणून प्रार्थना करतो आणि श्रीसाईबाबा तितक्याच तत्परतेने धावून येतात ह्याचे मुख्य कारण म्हणजे माझी श्रीसाईबाबांवर असलेली श्रद्धा हेच होय.

कारण श्रद्धेचे सामर्थ्य अमर्याद आहे. जो कुणी श्रद्धेवर विश्वास ठेवील त्याला ह्या जगात अशक्य अशी कोणतीही गोष्ट नाहीं. परंतु ही श्रद्धा विवेकी असावी, अविवेकी असू नये हेच खरे.

❖ ❖ ❖

# जाणा येथे आहे सहाय्य सर्वांस
# मागे जे जे त्यास ते ते लाभे

—सौ. एम. एस. सामंत.
गावठाण बोडे, विरार (प.)
ता. वसई, जि. ठाणे.

० आमच्या संसाराला जवळ जवळ १५ वर्षे झाली. लग्नाच्या आधी पासून माझे मिस्टर कधी कधी म्हणजे पार्टी वगैरेच्या वेळी मद्य प्राशन करीत होते. पण लग्नानंतर काही वर्षांनी ह्या मद्य प्राशनाचे रुपांतर व्यसनात होऊ लागले. ते दिवसेंदिवस तंद्रीत राहू लागले. मध्यंतरीच्या काळात तर त्यांच्या व्यसनाने अगदी कहर झाला. सहाजिकच ह्या गोष्टीचा परिणाम आम्हां घरातील माणसांवर झाला. तसे पहायला गेल्यास माझ्या संसारात कशाचीच उणीव नाहीं. परन्तु मनाचे स्वास्थ पार ढासळले होते, मुले कावरी बावरी होऊन घरात वावरत होती. माझे मन कशातच रमत नव्हते. सारखे वाटायचे एवढा चांगला माणूस केवळ मद्यापायी आपला संसार उध्वस्त करतोय, आपल्या मुलांच्या भवितव्या बद्दल सुद्धा याला काहींच कसे वाटत नाहीं. पहिल्या पासून माझा नामस्मरणावर फार विश्वास. दिवसेंदिवस माझे नामस्मरण वाढत होते. तरीही घरातील वातावरणामुळे माझे मन एकाग्र होत नव्हते. अशा द्विधा अवस्थेतच मी बाबांना हाक मारीत होते, आणि अखेर तो दिवस उजाडला.

**मग जो गाई वाडेकोडे । माझे चरित्र माझे पवाडे । तयाचिया मी मागे पुढे । चोहीकडे उभाच ॥१२॥** अ. ३,

ह्या बाबांच्या वाकसुधेचा अनुभव मला आला त्या दिवशी अगदी वेड्यापिश्या अगतिक अवस्थेतच मी बाबांच्या तसबिरी समोर उभी राहून प्रार्थना केली. बाबा माझ्या मिस्टरांना व्यसनातून मुक्त करा व अध्यात्मिक मार्गाला लावा, आणि लगेच साईसच्चरित सप्ताह मांडला. सप्ताहानंतर काही दिवसांतच बाबांनी ह्यांना इतकी जबरदस्त प्रचिती देऊन अखेर ह्यांच्याकडून मी मद्य कधीही प्राशन करणार नाहीं असे वचन घेऊन ते आजतागायत कृतीत आणायला तर लावित आहेतच इतकेच नव्हे तर ह्यांच्याकडून बाबा आपली जास्तीत जास्त सेवा करुन घेऊन त्यांचे मन आपल्याच चरणकमली रमवून ठेवीत आहेत. माझ्यावरील बाबांचे अनंत उपकार सात जन्मांतही मी फेडू शकणार नाहीं.

खरोखरच! साईलीला अगाध आहे. अशा या दैवताला माझा साष्टांग नमस्कार.

* * *

# हरी ओम् साई

—श्री. श्रीधर जिनराजकर.
भारत होमिओ फार्मसी,
१२०१ टिळक चौक, बेळगाव.

० मी बेळगावचा रहिवासी असून, बेळगावच्या टिळकवाडीत असलेल्या श्री साईबाबांच्या मंदीरात मी न चुकता दर मंगळवारी व गुरुवारी जात असतो. एका गुरुवारी गेलो असता तिथे एक बोर्ड वाचला. श्री साईबाबांच्या मंदीरालगतच 'उदीगृह' बांधण्याचे संकल्प असून याकामी मदत करावी! त्याच क्षणी माझ्या मनात आले की आपणही काहीं मदत करावी. मनात एकशे एक रुपयाचा चेक देण्याचे ठरविले. पुढे मंगळवारी आल्या नंतर तो द्यावा असे ठरविले पण त्या दिवशी मला जाणे जमले नाहीं.

इतक्यात मला सहकुटुंब गुरुवारी सकाळी भुसावळला माझ्या बहिणीकडे जावे लागले. त्यामुळे माझ्या मनातील संकल्प तिथेच राहिला. मला सुद्धा मनाला कसे तरी वाटले. आम्ही शुक्रवारी भुसावळला पोहचलो, व रविवारी शेगावला श्री गजानन महाराजांच्या मंदिराला जाण्याचे ठरविले. परंतु शनिवारी मला जरा बरे वाटेनासे झाले. सर्दी ताप चढला. मला चिंता वाटू लागली की उद्या सकाळी जायचे कसे? झोप अजिबात नाहीं. रात्रीचे दोन वाजले असतील त्यावेळी मला किमान तीन ताप असेल इतक्या तापात पहाटे पाचला उठून आंघोळ करून कसे जायचे असे वाटू लागले.

हे विचार करीत असतानाच मला जरा झोप लागली. झोपेत एक स्वप्न पाहिले. त्यात मी श्री साईबाबांना हात जोडून प्रार्थना करीत होतो की, "ए साई माझा ताप उतरू दे! मला शेगावला जाण्यासारखे कर, माझे उदी गृहाला मदत देण्याचे राहून गेले आहे. गुरुवारी परत जाताच अवश्य देईन! मला क्षमा कर."

वाचकहो, पण काय आश्चर्य! पाच दहा मिनीटातच मला जाग आली असेल, पाहतो तर माझे अंग घामाने भिजून गेले आहे. ताप होता की नव्हता ते कळेचना. स्वप्न पडून अवघे दहा मिनिटातील चमत्कार पाहून माझे मलाच आश्चर्य वाटले. मनात श्री साईचे आभार मानले कारण मी शेगावला चाललो होतो.

असा आहे साई चमत्कार! ※

# नित्य मी जीवंत जाणा हेचि सत्य
# नित्य घ्या प्रचिती अनुभवे ॥

—सौ. पुष्पाताई मुकुंदराव जोशी.
महाराष्ट्र हौसिंग कॉलनी,
ब्लॉक नं. १२, खोली नं. २२३,
मातारारोड.

० या संसाराच्या रथचक्रात चैनी करायला, फिरावयास हाती पैसे येत नाहीत. देणी–घेणी, आजारपण, मुलांचे शिक्षण कपडे–लत्ते वगैरे गोष्टींमुळे पैसे पुरत नाहीत. आज बरोबर सहा ते सात वर्षे झाली माझा भाऊ श्री साईबाबांची सेवा करतो, भक्ती करतो, त्याचप्रमाणे "श्री साईलीला" मासिकाचा लेखक–कवी आहे. त्याच्यामुळे मीही साईभक्तीला लागले.

श्री साईचरित्राचीही बरीच पारायणे केली त्यामुळे मला लहान–मोठे अनुभव आले आणि अजूनही येत आहेतच. शिरडीला जाऊन साईबाबांचे दर्शन घेऊन यावे ही मनापासूनची तीव्र तळमळ दिवसेंदिवस वाढतच चाललेली होती. माझी इच्छा पूर्ण होण्याचे दिवस जवळ आले. दहावे लेखक–कवी संमेलन दि. २९ व ३० जानेवारी १९८४ रोजी होते. या संमेलनास माझा भाऊ जाणार होताच. तो म्हणाला, "तू माझ्या बरोबर संमेलनास शिरडीला येशील का?" मी म्हणाले, पैशाचे जमले तर मी अवश्य येईनच. भाऊ म्हणाला, "तू श्रद्धेने, अंत:करणापासून बाबांना हाक मारून सांग की, मला शिरडीला येण्याची व आपणांस भेटण्याची, दर्शन घेण्याची खूप इच्छा आहे. माझी तळमळ, आस पूर्ण व्हावी त्याप्रमाणे मी देखील श्री साईचरणी प्रार्थना केली व माझ्या हाकेला बाबांनी साद दिली.

मी माझ्या मालकांना सांगितले की, मला शिरडीला जाण्याची खूप इच्छा झालेली आहे. तेव्हां मला उसने कां होईना पैसे काढून द्या. मी शिरडीला जाणारच. मी एकटी जाईन. मुलांना तुमच्याजवळ ठेवीन. माझ्या इच्छेप्रमाणे मालकांनी उसने पैसे आणून रात्री माझ्याजवळ ठेवण्यास दिले. आमच्या देवघरापाशी उदीचा डबा असतो त्या डब्यामध्ये मी पैसे ठेवले. मी माझ्या आसपासच्या मैत्रिणींना सांगितले की, मला शिरडीला जावयास पैसे मिळाले. मी दि. २८ रोजी शिरडीला जाणार.

दुसऱ्या दिवशी म्हणजे गुरुवारी मी मालकांना म्हणाले शिरडीला जावयास अजून आठ ते दहा दिवस अवकाश आहे घरात पैसे ठवले तर खर्च होतील तेव्हां हे पैसे बँकेत ठेवा. त्याप्रमाणे पैसे बँकेत ठेवण्यासाठी देण्याकरिता मी डबा उघडून पहाते तर' डब्यात पैसे कुठे आहेत? ... त्या डब्यामध्ये पैसे नव्हते. मला वेडयासारखेच झाले. काही सुचेनासे झाले. दोघांनी घरामध्ये सर्वत्र शोधून पाहिले. परंतु कुठेही पैसे मिळाले नाहीत. मी बाबांची प्रार्थना केली. बाबा! आज माझा गुरुवार आहे, उपवास आहे, आज मी तोंडामध्ये पाण्याचा थेंबसुद्धा घेणार नाहीं. आज तुम्हीच तुमच्या लीलेची प्रचिती दाखवा. त्याशिवाय मी उपवास सोडणार नाहीं. ही सर्व घटना गुरुवारी सकाळी घडली.

आमच्या शेजारीच काहीं अंतरावर एक कुटुंब रहाते. त्या कुटुंबात एक लहान मुलगी रहात असे. ती मुलगी आमच्याकडे रोज येत जात असे. त्या दिवशी ही घटना घडण्याअगोदर ती येऊन गेलेली होती. त्या मुलीने ते पैसे चोरून नेलेले होते असे नंतर समजले.

ती घटना अशी घडली की, ती लहान मुलगी शंभर रुपयाची नोट घेऊन दुकानामध्ये गेली व दुकानदारास मला दहा पैशाच्या गोळ्या द्या असे म्हणू लागली. दुकानदार प्रामाणिक होता. त्याला शंका आली की एवढ्याशा चिमुरड्या मुलीपाशी शंभर रुपयाची नोट कशी काय दिली? दुकानदार त्या मुलीला म्हणाला, ह्या गोळ्या घर. परंतु ती मुलगी गोळ्या न घेता पळून जावला लागली. दुकानदार व काहीं माणसे त्या मुलीचा पाठलाग करून ती मुलगी कुठे जाते हे ते पाहू लागले. त्या मुलीला त्या माणसांनी रस्त्यातच विचारले, हे पैसे तू कोठून आणलेस? ती म्हणाली मला रस्त्यात सापडले. शंभराच्या नोटा काय रस्त्यावर सापडतात कां? दुकानदार म्हणाला.

तेवढ्यात ही घटना मला समजलीच. मी लगेच त्या ठिकाणी गेले. मला माहिती मिळाल्याप्रमाणे मी त्या मुलीच्या आईस शंभर रुपये घरातून गेल्याची घटना सांगितली परंतु खेडेगावातील लोक अर्धवट त्यांना काय सांगावे.

तो दुकानदार प्रामाणिक. खरोखरच त्याच्या रूपाने श्री साईबाबाच माझ्या हाकेला धावत आले. मी त्या दुकानदाराला सांगितले की, मी हे पैसे शिरडीला जाण्याकरिता उसने आणलेत. माझी शिरडीला जाण्याची खूप इच्छा आहे आणि तशातच ही घटना घडली. तेव्हां त्या दुकानदाराने ती शंभर रुपयाची नोट

माझ्या हातावर ठेवली व म्हणाला, "ताई! आपले मनोरथ पूर्ण होतील. आपण कसलीही चिंता करू नका. परमेश्वर हा सदैव भक्ताच्या पाठीशी उभा असतो त्याकरिता त्याच्यावर श्रद्धा ठेवा, विश्वास ठेवा, तो तुमच्या हाकेला सदैव धावत येतो. पण थोडी सबुरी सुद्धा धरली पाहिजे."

त्यानंतर त्या दुकानदारास मी दुध पिण्यास दिले. श्री साईबाबांची अंतःकरणापासून प्रार्थना केली. त्यांचे आभार मानले. पैसे गेल्यानंतर मला वाटू लागले की, आता आपल्याला शिरडीस जाता येणार नाहीं. परंतु श्री साईबाबांनी आपले सत्व ढळू दिले नाहीं. मला गुरुवारी दुपारी १२ वाजण्याच्या आत पैसे परत मिळवून दिले. मी सायंकाळी ७ वाजता सर्व लोकांना बोलावून आरती केली, पेढ्याचा नैवेद्य दाखविला व तो प्रसाद म्हणून वाटला.

श्री साईबाबांना पुन्हा पुन्हा नमस्कार केला आणि प्रार्थना केली की, अशीच तुमची माझ्यावर व सर्व साईभक्तांवर निरंतर कृपादृष्टि राहू द्या.

दुसरी घटना म्हणजे माझा मुलगा चि. शैलेश हा शाळेत जात नव्हता. तो फार खोडकर, अभ्यास नको, नुसते खेळायला हवे. परंतु तो देखिल आता व्यवस्थितपणे अभ्यास करतो श्री साईबाबांची आरती करतो.

माझ्या थोरल्या भावाच्या लग्नाला दहा वर्षे झाली. त्याला मुलबाळ नव्हते. वरील दोन्ही कारणासाठी मी नवस बोलले होते. माझ्या दोन्ही गोष्टींची इच्छा पूर्ण करा मी माझ्या ऐपतीप्रमाणे पेढ्याचा हार घालीन.

माझ्या इच्छेप्रमाणे दोन्हींही गोष्टींची पूर्तता झाली. मुलगा शाळेमध्ये व्यवस्थितपणे जातो. अभ्यास करतो व भावजय गरोदर आहे.

ज्याप्रमाणे बाबांनी माझी इच्छा पूर्ण केली त्याप्रमाणे सर्व भक्तांच्या इच्छा पूर्ण होवोत हीच श्री साईचरणी प्रार्थना!

# श्री साईकृपा

★★★卐★★★★☆★★★

—श्री. विजयकुमार जयदेव चिंदरकर.
श्री सत्य साई भवन, मु. पो. ता.
कणकवली, जि. सिंधुदुर्ग.

० ह्या कलीयुगात नवसालाच काय पण साध्यासुध्या गोष्टीसाठीसुद्धा पावणारा देव (परमेश्वर) म्हणजेच साईबाबा होत! आपण जर साईबाबांचे सतत नामस्मरण केले व मनात साईबाबांना साठवित राहिलो तर आपल्याला नवस करायची गरजसुद्धा नाहीं. आपल्या मनात असलेली गोष्ट श्री साईबाबा पुरी करतात असा माझा तरी अनुभव आहे.

**जया मनी जैसा भाव ।**
**तया तैसा अनुभव ॥**

मला पुष्कळदा वाटायच् की, आपल्या आवडत्या परमेश्वराच्या (श्री साईबाबांच्या) श्री साईलीला अंकात आपला स्वतःचा असा एक तरी लेख छापून यावा. दिपावली अंकात लेख छापून यायचा म्हणजे तो अलभ्य लाभच म्हणावा लागेल! श्रीसाईबाबांच्या कृपेने माझा पहिला-वहिला लेख श्री साई-लीलाच्या नोव्हेंबर–डिसेंबर (८३) ह्या दिपावली जोड अंकात छापून आला. माझा तो लेख वाचून बऱ्याचशा साई बांधवांची मला पत्रे आली. त्या सर्वांनी मी स्नेहपूर्वक उत्तरें पाठविली आहेत! साईबाबा ह्या नावातच जादू भरलेली असल्यामुळे निरनिराळ्या गावच्या साईबांधवांचा व माझा पत्र परिचय झाला.

ह्याच दिपावली जोड अंकातील माझा दुसरा अनुभव असा की, कणकवली गावात सोळा एम. एम. च्या पडद्यावर प्रोजेक्टरद्वारा चित्रपट दाखविणाऱ्या तीन–चार वितरक कंपन्या आहेत. त्यापैकी एका चित्रपट वितरकांकडे परमपूज्य श्री साईबाबांवर आधारीत "शिरडीचे श्री साईबाबा" नावाचा मराठी चित्रपट आहे. त्या चित्रपटाचे त्यांच्याकडे साईबाबा द्वारकामाईत बसले आहेत अन् पुढ्यात पुजेचे साहित्य आहे, अशा प्रकारचे मोठे पोस्टर्स भिंतीवर लावलेले आहेत. त्या पोस्टर्सकडे जेव्हां जेव्हां माझे लक्ष जायचे तेव्हां तेव्हा साईबाबांचा तो फोटो आपल्याला मिळावा, असा विचार माझ्या मनात वारंवार यायचा.

त्या चित्रपट वितरकांशी माझा परिचय नसल्यामुळे मी ते पोस्टर त्यांच्याकडे मागू शकलो नाहीं. एक दिवस पोस्टाने मला श्री साईलीला मासिकाचा अंक आला. पाकीटातील तो अंक मी बाहेर काढला मात्र ... माझा माझ्या डोळ्यांवर विश्वासच बसेना! कारण त्या अंकाच्या मुखपृष्ठावर माझ्या मनात भरलेला तोच श्री साईबाबांचा रंगीत फोटो छापलेला होता. ज्या नोव्हेंबर-डिसेंबर ८३ च्या दिवाळी जोड अंकामध्ये माझा लेख छापून आला, त्याच श्री साईलीला अंकाच्या मुखपृष्ठावर मला हवा असलेला श्री साईबाबांचा फोटो छापून आला. अशा प्रकारे साईबाबांकडे न मागताही श्री साईबाबांनी माझ्या मनातील दोन इच्छा एकदम पुऱ्या केल्या.

आपल्या भक्तांच्या मनातील इच्छा पूर्ण करणाऱ्या ह्या साई-देवाचा भक्तगण दिनप्रतिदिन वाढतोच आहे.

★

# श्रीसाईंची अगाध लीला

—सौ. शशिकला पुंडलिक पाटील
प्लॉट नं. ३१, वसंतनगर, नांदेड.

० माझे यजमान सरकारी नोकरीत असून त्यांची बदली खूप लांबच्या ठिकाणावर झाली आणि त्यात भर म्हणूनच की काय त्यांच्या डोक्यात भयंकर रोग होवून, डोके नासून गेले. अंगावरून रक्ताच्या धारा वाहू लागल्या. अधिकारी वर्ग हलगर्जीपणे याकडे दुर्लक्ष करून त्यांना रजा देत नव्हते. मी अक्षरशः घाबरून गेले. आता काय होणार? श्रीसाईंना खूप सांकडे घातले. त्यांचा धावा करू लागले.

औषधाचा वर्षभर परिणाम होत नाहीं म्हणून डॉक्टरांनी तपासणीसाठी डोक्याचा भाग कापून घ्यावा लागेल असे सांगितले. मी तर सुन्न झाले होते. मला काहींच सुचत नव्हते. मी त्यांना काहीं दिवस थांबण्यास सांगितले. उदी

लावली डोक्याला आणि श्रीसाईंची मंदिरात होत असलेल्या चार वेळा होणाऱ्या आरत्याप्रमाणे आरत्या सुरु केल्या आणि प्रसाद वाटू लागले.

आणि साईबाबांनी माझी हाक ऐकली. माझ्या यजमानांच्या डोक्यातील फोड कमी होऊ लागले, व ऑपरेशनही टळले. आणि त्यानंतर काही दिवसातच त्यांची बदली जवळच्या ठिकाणावर झाली. बदलीची ऑर्डर घेताना त्यांनी शिर्डीला जाऊन साईबाबांचे दर्शन घेतले. घरात आनंदीआनंद झाला. माझी मुले देखील साईची भक्ती करतात. आम्ही सर्व शिर्डीला भेट देण्यास उत्सुक आहोत. दुःखात साथ देणारे श्रीसाई खरोखरच महान आहेत. त्यांच्या कृपेने आमच्या घरात आज सोन्याचा दिवस पहावयास मिळाला, आणि म्हणूनच सर्व साईभक्तीच्या मार्गाला लागोत आणि जीवनात आनंद निर्माण होवो म्हणून साईचरणी प्रार्थना करते. त्यांना माझे अनंत कोटी प्रणाम! म्हणूनच त्यांनी वचन दिले आहे व आजही ते सार्थ आहे. –

**जरी हे शरीर गेलो मी सोडून**
**तरी मी धावेन भक्तांसाठी ॥**

# प्रवासातील अनुभव

**–श्री. ज. ब. कोष्टी**
मु. पो. ता. मुरबाड (ठाणे)

० मागील आक्टोबरची १ तारीख. मी दोन दिवसांची रजा काढून घरी गेलो होतो. आईवडील वृद्ध म्हणून त्यांना आणण्याचे ठरले होते. मी घरून सुमारे ३०० रु. पर्यंत रक्कम घेतली होती. निघण्याच्या आदल्या दिवशी आम्ही भुसावळला आमच्या एका नातेवाईकाकडे मुक्काम केला. सकाळची भुसावळ पॅसेंजर धरली. घरून निघतानाच वडिलांनी त्यांचे जवळचे रु. पांचशे माझे जवळ देऊन ठेवले होते. अशा प्रकारे तिकीटे वगैरे काढून मी आठशे

रुपयांचे शंभराच्या नोटांचे पुडके सुटाच्या चोरकप्यात ठेवले. गाडीत बसलो. गाडीत जागा मिळाली. परंतु आईवडिलांना कधी पाणी आण तर कधी फराळाला आण अशा कामासाठी मला गाडी थांबल्यावर खालीवर चढावे लागे. गाडी चाळीसगावला थांबली. फराळाचे पदार्थ घेण्यासाठी मी गाडीच्या खाली उतरलो. फेरीवाल्यास पैसे दिले व तसाच एका हातात पुडी व दुसऱ्या हातात पाण्याची बॅग घेऊन मी गाडीत चढलो. इतक्यात गाडी सुरू झाली. फराळ-पाणी झाल्यावर मी सहज खिशाकडे हात घातला. पैसे व तिकीटे सुरक्षित आहेत ना? खिसा चाचपून पाहिला. खिसा रिकामा आहे असे वाटू लागले. पुन्हा उभा राहून खिशात हात घातला. तर खिशात पैसेही नाहींत व तिकीटेही नाहींत. माझी तर पाचावर धारण बसली. मी गाडीत आल्या मार्गात पैसे पडले का ते पाहू लागलो. परंतु व्यर्थ! पैसे, तिकिटे मार्गात पडलेली नव्हती. मी माझ्या साई माऊलीस मनोभावे प्रार्थना केली. बाबा आता हे संकट कसे टळणार? माझ्या बरोबर माझे वृद्ध आईवडील आहेत. पैसेही गेले व तिकिटेही गेली आता आमचे कसे होणार? मी मनात मनोभावे साईबाबांस प्रार्थना केली. मी माझा सदरा वर केला मात्र आणि इतक्यात सदऱ्यातून नोटा व तिकीटे पाहावयास मिळाली. मला जो आनंद झाला तो काय वर्णन करावा. मी मनोभावे साईबाबांना लाख लाख प्रणाम केले. मला संकटातून बाबांनी सोडविले माझी पूर्ण श्रद्धा झाली आहे की दुःखाचा भार बाबांवर टाकल्यावर बाबा त्यातून सुटका करतात.

जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरी मी धावेन भक्तांसाठी
नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य
नित्य घ्या प्रचिती अनुभवे ॥

# श्रीबाबांनी मला यश दिले

—कु. स्वाती आ. साळवी.
'उजाला' डोंबिवली (पूर्व)
जि. – ठाणे.

० मी स्वत: गेली तीन वर्षे श्री बाबांची अनन्य भावे भक्ती करीत आले आहे. दरम्यान शिरडीससुद्धा जात आले. मी व्यवसायाने महाविद्यालयीन विद्यार्थिनी आहे. गेली दोन वर्षे मी वाणिज्य शाखेतील सततच्या अपयशाने पार खचून गेले होते. एकाद्या विषयात थोडक्यात कमी गुण पडून अपयश पदरी पडले. अभ्यास व्यवस्थित करूनसुद्धा असे घडल्याने माझा आत्मविश्वास खचत चालला· त्यामुळे मन खिन्न झाले. परंतु माझ्या आईने 'श्री साईबाबांना हाक मार, तेच तुला यशाचा मार्ग दाखवतील' असे सांगितले यावर्षी परीक्षेला जाण्यापूर्वी बाबांची उदी लाऊन नामस्मरण केले व एक लहान पुडी सोबत नेली. नेहमीप्रमाणे पेपर्स उत्तम लिहिले परतु दोन वेळच्या कटु अनुभवांनी मन दोलायमान झाले होते. रात्रंदिवस निकालाकडे डोळे लाऊन होते.

शेवटी ... फेब्रुवारीत निकाल प्रसिद्ध झाला व मी उत्तीर्ण झाले. अतिशय आनंद झाला· बाबांच्या तसबिरीला हार घातला, दिवाबत्ती केली नि म्हटले, 'बाबा! ही सारी तुमची कृपा!' तुमच्या नामस्मरणाचा महिमा काय आहे हे कळून चुकले. तुमचे स्तोत्र किती गावे याला सीमा नाहीं. असाच तुमचा आशिर्वाद माझ्या पाठीशी निरंतर राहो एवढेच मागणे.'

'जय साई! जय श्री बाबा!'

# साई–प्रसाद

–श्री. लहू रामभाऊ रोवाळे.
२१–२२५ कन्नमवार नगर २,
ट्रँझिस्ट कँप, विक्रोळी, मुंबई ८३.

० मी व आमच्या घरातील सर्व मंडळी श्री बाबांचे भक्त आहोत. एके दिवशी श्री बाबा माझ्या स्वप्नामध्ये आले. तो दिवस म्हणजे गुरुवार पहाटेची वेळ. मी आमच्या घरातील श्री साईबाबांच्या फोटोचा अभिषेक करुन अन्नदान केले आहे. अशा प्रकारचे स्वप्न पडत होते. इतक्यात घड्याळामध्ये चारचा अलार्म झाला व मी झटकन डोळे उघडले. पहातो तर काय काहीच नाहीं व म्हणून मी माझ्या मनाशी ठरविले की येत्या १० तारखेला रामनवमीच्या निमित्याने घरी श्री बाबांच्या फोटोला अभिषेक करून अन्नदान करावयाचे.

त्याप्रमाणे रामनवमीच्या दिवशी सकाळपासून लाऊडस्पीकरच्या आवाजाने श्री बाबांच्या उत्सवाला सुरूवात झाली. सायंकाळी ६॥ च्या सुमारास आम्ही सामुदायिक अभिषेक संपवून ब्राम्हणदान केले. त्यानंतर आम्ही सर्व साईभक्तांनी श्री बाबांची धुपारती केली. बघता बघता साईभक्तांची दर्शनासाठी रांग लागली. प्रत्येक साईभक्तांनी दर्शन घेतल्यानंतर साईप्रसाद (जेवण) घेतले.

रात्री ९ ते १० बाबांच्या पुढे भजन झाले. रात्री १० वाजता बाबांची शेजारती झाली. शेजारती झाल्यानंतर आम्ही ठेवलेल्या श्री शिर्डीचे साईबाबा हा मनोजकुमारचा हिंदी सिनेमा सुरू झाला. सिनेमा संपल्यानंतर सर्व साई-भक्तांनी पहाटे निरोप घेतला. निरोप घेत घेत व मुखी गुणगुणत

**"कपाळी केशरी गंध बाबा तुझा मला छंद."**

असे म्हणत म्हणत सर्व साई भक्तांनी निरोप घेतला.

ह्या सर्व कार्याला श्री बाबांनी कोणत्याही गोष्टीची अडचण भासू दिली नाहीं किंवा काही कमी पडू दिले नाहीं. ह्या सर्व कार्यामध्ये श्री बाबा सामिल असल्यामुळे आम्हांला कोणत्याही गोष्टीची कमतरता भासली नाहीं, व त्याप्रमाणे श्री साईबाबांनी दाखवलेले स्वप्न मी आनंदाने पार पाडू शकलो. तसेच सर्व चाळीतील सर्व साईभक्तांनी या कार्यात भाग मोठ्या आनंदाने घेतला. अशीच आम्हां सर्व कुटुंबावर व सर्व साई भक्तांवर कृपा असू द्या. अशी साई चरणी प्रार्थना करतो. ॐ ॐ

# विभूती दिव्यऔषधी

—सौ. उर्मिला आ. घोलेकर.
श्रीमती सुंदराबाई सामंत नगर,
चाळ नं. ४।४९ मु. घाटकोपर
मुंबई ४०० ०७५

० जुलै १९८२ मध्ये माझी प्रकृति ठीक नव्हती. त्यामुळे आम्हां उभयता-मध्ये बरीच वादावाद झाली. त्यावेळी मी मनात बाबांना म्हणाले तुम्हीच आता मला पुढचा मार्ग दाखवा. खर सांगायच म्हणजे त्यांच्या कृपेने मला दोन मुले आहेत, आणि तिसऱ्याचा सुगावा लागला होता. पण? त्यांना दोनच मुले पुरे होती. त्यामुळे मी द्विधा मनःस्थितीत होते. माझा सर्व भार मी श्री बाबांवरच टाकला होता.

त्याच रात्री बाबांनी स्वप्नात येवून मला दृष्टांत दिला. बाबा मला एका पडक्या वाड्यात घेऊन गेले व मला म्हणाले पोरी तू मुळीच घाबरू नको. मी तुझ्या पाठीशी आहे. त्याच दिवसापासून माझ्या मनातील भिती पार नष्ट झाली मन धीट बनले. आमच्या दोघांच्याही मनातील पूर्वीचे विचार नष्ट झाले. काहीं दिवसांनी मला श्री बाबांच्या कृपेने पुत्ररत्न झाले. तेही गुरुवारीच. ह्या पूर्वीच्या माझ्या दोन्ही मुलांचे जन्मवार गुरुवारच आहेत ही सर्व त्यांचीच कृपा होय.

दुसरा अनुभव असा. बरेच दिवस गावावरून माझ्या वडिलांचे पत्र नाहीं. म्हणन माझ्या मनात काळजी निर्माण झाली. तोच गावावरून निरोप आला की पायाला सूज येऊन ते आजारी आहेत व बोटाला फोड येवून त्यातून रक्त व पू वहात आहे मला फार काळजी लागली. जवळ जवळ तीन ते चार महिने पाय बरा होत नव्हता. एकवेळ ऑपरेशन झाले तरीसुद्धा जखम बरी होत नव्हती. शेवटी मी बाबांजवळ याचना केली सर्व उपाय थकले आता तुम्हीच हे संकट टाळून माझ्या वडिलांना गुण द्या, आणि मी बाबांची उदी पत्रातून गावी पाठविली. पत्रात लिहिल्याप्रमाणे माझ्या वडिलांनी त्या उदीचा योग्य प्रकारे उपयोग केला. व त्यानंतर त्यांच्या पायाला आराम पडून जखम

पूर्ण बरी होऊन पायाची सूज कमी झाली. अशा प्रकारे आनंदाचे पत्र गावावरून मला आले. त्यामुळे मला फारच आनंद झाला. मी दोन्ही हात जोडले व हे बाबांना म्हणाले, बाबा, तुम्ही असेच आमच्या हाकेला धावून या व तुमचा कृपा हस्त आमच्या सदैव शिरी असावा. ही तुमच्या चरणी प्रार्थना.

हे साईनाथा सद्गुरु । तूच माझा कल्पतरू ।।
भवाब्धिचे भव्य तारू ? तू असशी निश्चये ।।

# कोडाचा डाग बरा झाला

–श्री. एन्. एन्. कुलकर्णी.
द्वारा श्री. मुजुमदारांचा वाडा,
श्रद्धानंद पेठ, नागपूर ४४००१०

० श्री साईबाबा हे भक्ताच्या हाकेला त्वरीत धावून येतात व त्यांची मनकामना पुरी करतात असा माझा आज ३० वर्षाचा अनुभव आहे. मी प्रथम १९५० साली शिरडीला गेलो त्यावेळी श्री साईमंदिरात प्रवेश करताच मला अशी भावना झाली की मी आपल्या घरीच आलो. त्यानंतर दोन तीन वर्षांनी माझे डावे पायावर एक रुपया एवढा पांढरा डाग – कोड दिसू लागला. त्याला अत्यंत खाज सुटत असे, व दिवसें दिवस तो मोठा होऊ लागला. येथील मेडीकल कॉलेज स्पेशालिस्टनी दोन तीन वर्षे बरेच उपचार केले. परंतु उपयोग झाला नाहीं त्यावेळी मी पुन्हा दर वर्षीप्रमाणे शिरडीस गेलो. श्रीसाईंच्या मूर्तीसमोर माझ्या पायाच्या कोडाकडे त्यांचे लक्ष अत्यंत करूण प्रार्थना करून वेधले, व त्यांना तो बरा करणेस विनविले. येथे परत आल्यावर दररोज स्नान झालेवर श्री साईची उदी पाण्यात कालवून मी नित्य नियमाने लावू लागलो आणि खरोखरच अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हणजे दररोज त्या डागाचा रंग पालटू लागला व १ महिन्याचे आत पायाचा डाग पूर्ण नाहीसा होऊन पायाची कातडी पूर्ववत झाली. अशी ही श्री साईंच्या उदीची कृपा आहे. त्यानंतर अगदी अलिकडे एके दिवशी रात्री माझे छातीत दुखू लागले. लगेच मी श्री साईचे चरणास उदी लावली व ती भक्षण केली थोड्याच वेळात माझी छाती दुखणे थांबून मला बरे वाटले. श्री साईकृपा अशीच सर्व भक्तांवर राहो ही विनंती.

# कैवारी दीनांचा, साईनाथ माझा

—सौ. प्रमिला लीलाधर धडाडे
एन्. आय्. टी. क्वार्टर नं. २१।बी
अशोकनगर नागपूर १७.

० आमच्या घराण्यात लहानपणापासून "दादाजी धुनीवाले" ह्यांची भक्ति असल्यामुळे दुसऱ्या संतांवर विश्वास ठेवणे जरा कठीणच काम. पण मी २–३ साईलीला वाचल्या. आणि माझ्या मनात आपोआपच 'साईबाबा' विषयी श्रद्धा निर्माण झाली, आणि ती दृढ होण्याला एक दिवस मला त्यांच्या लीलेची प्रचिती आली.

दि. २४–६–८३ शुक्रवारला 'वटपौर्णिमेचा' मला उपवास होता. दुसऱ्या दिवशी सकाळची शाळा असल्यामुळे मी लवकरच स्वयंपाक वगैरे करून व थोडे जेवण करून मी शाळेत गेले. तोपर्यंत मला अगदी बरे वाटत होते. शाळेत गेल्यानंतर वर्ग ९ मध्ये व्याकरण शिकवित असताना माझे एकाएकी पाय दुखायला लागले, व शरीरात देखील उष्णता जाणवायला लागली. सुटी झाल्यानंतर मी कशीतरी घरी आले. खाट टाकून झोपले, तेव्हां शरीरात अधिकच उष्णता जाणवत होती, व हातपाय देखील जास्त दुखायला लागले. घरी कोणीच नाहीं. दोन लहान मुली. त्यांना काय कळणार? माझे पती शाळेत गेलेले. त्यांना माझ्या प्रकृति विषयी काहींच कल्पना नव्हती. माझा ताप व हातपाय दुखणे सारखे वाढतच होते. त्यामुळे मी घाबरले व साई-बाबांच्या फोटोकडे पाहून म्हटले, माझी प्रकृति बिघडली आहे. हे त्यांना माहित नाहीं. ते ४–५ वाजल्या शिवाय घरी येणार नाहींत, व माझे दुखणे तर वाढतच आहे. तेव्हां त्यांना आता निरोप कुणाच्या हस्ते व कसा द्यायचा? कारण त्यांची शाळा तर लांब.

माझे दुखणे वाढत असल्यामुळे मला सारखे रडायला यायचे. मी रडत असलेली पाहून माझ्या दोन्ही लहान मुली पण रडायच्या. काहींच सुचत नव्हते. तेव्हां साईबाबांची उदी मी तोंडात टाकली व साईबाबांना विनंती केली. "साईबाबा ह्यांना कसेही करून घरी येऊ द्या." इतक्यात १०—१५ मिनिटांनी ह्यांचे दोन मित्र घरी आले व हे घरी आलेत काय? म्हणून चौकशी केली. तेव्हां त्यांच्या मित्रांना सर्व परिस्थिती कथन केली व त्यांच्या शाळेत जाऊन त्यांना निरोप द्यायला सांगितले ते स्कूटरवरून शाळेत गेले.

त्यावेळी माझ्या मिस्टरांच्या शाळेत मिटिंग सुरू होती निरोप कळल्याबरोबर मिटिंग अर्ध्यातच सोडून ते घरी आले. त्यांना पाहिल्याबरोबर मला धीर आला. त्यांनी नंतर मला दवाखान्यात नेले. दवाखान्यात गेल्यानंतर मला औषधानी आराम पडला. अशा प्रकारे त्यांचे दोन मित्र म्हणजे दोन देवदूतच साईबाबांनी पाठविले, व त्या कठीण काळात साईबाबांनीच माझ्यावर कृपा केली. असे आहेत आपले दीन–दुःखिताचे कैवारी साईबाबा! धन्य बाबा!

अशीच आनली आमच्यावर सदोदित कृपा असू द्यावी हीच आपल्या चरणांजवळ विनंती.

# लाभला आशिर्वाद साईचा

–श्री. म. प. घोंगे.
२३६ । ९२२४ स्वधाम को. हौ. सोसायटी, कन्नमवार नगर,
विक्रोळी (पूर्व), मुंबई ८३.

० बालपणापासून साई माझे आराध्य दैवत. 'ओम् श्रीसाई समर्थ' हा महामंत्र जपत जावा अहोरात्र त्यानेच आपुले चरित्र परमपवित्र होईल! हा दिव्य उपदेश मला 'साईचरित्र' ग्रंथातून मिळाला. मी ह्या महामंत्राचा गुरु-मंत्र म्हणून स्वीकार केला व वयाच्या १३ व्या वर्षापासून मी हा मंत्र नित्य-नेमाने दररोज २५ वेळा लिहित आलो. मानसिक जप तर चालू होताच. विशेष म्हणजे माझ्या वाढदिवसाला मी ह्या मंत्राचा लेखनिक जप नवीन वहीत लिहिण्यास सुरू करीत असे.

२३ डिसेंबर १९८२. माझा वाढदिवस. विशेष लक्षात राहाणारा. त्याच-दिवशी माझे ऑफिसमधील मित्र श्री· सुधाकर सावंत यांनी शिरडीहून आण-लेला प्रसाद मला दिला. तो प्रसाद वर्तमान पत्राच्या कागदात बांधलेला होता. मी प्रसादाची पुडी उघडली तर आतील बाजूस 'नूतन वर्ष अभिनंदन' असे

ठळक शब्दात छापलेले होते. वरच तो शुभ संदेश श्रीसाईबाबांनी माझ्या वाढदिवसा निमित्ताने मला प्रसादासोबत अशारितीने पाठविलेला होता. आतापर्यंत माझ्या वाढदिवसाला असा शुभसंदेश कुणीही पाठविलेला नव्हता. पण ह्या वाढदिवसाची दखल प्रत्यक्ष श्री साईबाबांनी घेतलेली पाहून माझे हृदय भक्तिभावाने ओथंबून गेलं.

त्यानंतर त्या वाढदिवसाच्या शुभ संदेशाची प्रचिती साईंनी त्या वर्षात आलेल्या दसऱ्याला अनुभवास आणून दाखविली. दसरा म्हणजे श्रीसाई पुण्यतिथीचा शुभदिन. त्याच दिवशी मला पुत्रलाभ झाला. पूर्णिमा – माझी पहिली मुलगी. ती आता ५ वर्षाची आहे. कन्येनंतर पुत्रप्राप्ति व्हावी म्हणून श्रीसाईला मी प्रार्थना केली की मला पुत्रलाभ झाल्यास तो तुझा आशिर्वाद समजून त्याचे नाव आशिश' ठेवीन. माझी पूर्ण श्रद्धा होती की साईबाबा माझ्या प्रार्थनेला इच्छिलेले फळ देणारच. पण पत्नी (सौ. स्मिता) मात्र गर्भवती राहिल्यानंतर काळजी करीत वसे. डॉक्टरने दिलेली तारीख जवळ येऊ लागली तशी पत्नीच्या मनांत पुत्र होईल की कन्या होईल या विचाराचे द्वंद्व जोरात सुरू झाले. तिला दिलासा देण्यासाठी मी साईबाबांच्या फोटोसमोर चिठ्ठ्या टाकून कौल मागितला. पुत्र की कन्या याबद्दल चिठ्ठ्या टाकल्या. त्याचे उत्तर पुत्र होईल असे आले. त्यानंतर प्रसूतीच्या दिवसाबद्दल चिठ्ठ्या टाकल्या. १६ आक्टोबर ८३, दसरा (मनात इच्छिलेली) की ३१ आक्टोबर ८३ (डॉक्टरने दिलेली तारीख) यावेळी दसरा हे उत्तर मिळाले. आणि खरोखरच कौल दिल्याप्रमाणे दसऱ्याला पत्नी प्रसूत होऊन पुत्रलाभ झाला. नवसासी माझी पावेल समाधी' धरा दृढ बुद्धि माझे ठायी' ह्या साई वचनाची आम्हांला पूर्ण प्रचिती आली. पुत्ररूपाने चैतन्यमय श्रीसाईच आमच्या घरी अवतरले. दिवाळीच्या पाडव्याला नामकरण समारंभ करून बालकाचे नाव श्रीसाईला दिलेल्या वचनानुसार आशिश' ठेवले.

अशा रितीने नूतनवर्ष अभिनंदन, ह्या दैवी संदेशाची श्रीसाईबाबांनी प्रचिती दाखवून दिली.

# साईबाबा संकटाचे निवारण करतात

—सौ. विमल य. वगळ.
४अ।१६७ भक्तियोग सोसायटी.
वझिरा नाका, बोरीवली (प.)
मुंबई – ४०० ०९२.

० माझ्या मुलीची एम. ए. ची परीक्षा आणि नातवंडांची परीक्षा असल्यामुळे दैनंदिन व्यवहारात तिला मदत करण्याकरिता आम्ही उभयता पुणे येथे तिच्या घरी पंधरा दिवसांकरिता गेलो होतो. ता. ४–४–८४ रोजी देवाची पूजा करणे असल्यामुळे देव्हारा साफ करीत असताना देवीच्या हातातील चांदीची काठी फुलांबरोबर स्मरण हरपून बाहेरील परिसरात फेकली गेली. देवांचे पुजन करीत असताना, काठीची आठवण झाली व शोध करू लागले. परंतु सापडेना. काठी पुरातन काळातील असल्यामुळे, व आपल्यावर काठी हरविल्याचा दोष येईल यामुळ मन दुःखीत झाले व साईबाबांचा धावा सुरू केला व काठी जर सापडली तर मुंबईस गेल्यावर घरातील तसबिरीला हार घालीन असे सांगितले. मुलीच्या नोकराणीकडून परिसर स्वच्छ करून घेतला परंतु व्यर्थ! साईबाबांचा जप मनामध्ये चालू होताच, इतक्यात गोळा केलेल्या कचऱ्याच्या ढिगाऱ्याच्या बाजूला लक्ष्य गेले, व ती चांदीची काठी उभी दिसली व आनंद गगनात मावेनासा झाला. वाचकहो! माझ्या अनुभवावरून तुमची खात्री होईल की साईबाबा भक्तांच्या हाकेला धावत येतात व संकटाचे निवारण करतात.



# श्री बाबांनी दिलेला धक्का

—श्री. पु. कृ. धुपकर.
२१७।६ जवाहर नगर,
गोरेगाव, मुंबई ४०००६२.

० एप्रिल १९८२ चे सुरवातीस मेव्हण्याचे नागपूरहून पत्र आले. १९ मे बुधवार चि. विश्वासचे लग्न असून आपण सर्वांनी लग्नास अवश्य यावे. उन्हाळा, रजा वगैरेची सबब चालायची नाहीं. सर्वांनी अवश्य आलेच पाहिजे. त्याप्रमाणे चि. अरुण यास फोन करुन कळवले. मोठा मुलगा, सून, व मोठा नातू हे येत नव्हते. कसे जाणे होईल ह्या विचारात होतो. कारण सौ. ला २३ जून ८१ ला अर्धांग वायुचा लहानसा झटका आला होता. त्यामुळे तिला चालताना खूप त्रास होत होता. डावा हात व पाय कमजोर झाले होते. ता. १६ ला आम्ही निघालो. आमचेकडे ५६ साली घेतलेली श्री बाबांची मूर्ती आहे. तिला रोज विष्णुसहस्त्र नामाचा अभिषेक असतो. पुजा झाल्यावर प्रार्थना केली व सांगितले "बाबा आजपासून १५ दिवस अभिषेक नाहीं व तुमचे दर्शन नाहीं. चि. अशोक पुजा करेल तशी गोड मानून घ्या व आपला आशिर्वाद असू द्या.

आम्ही ठरल्याप्रमाणे ता. १६ ला दुपारी निघालो. भुसावळ सोडल्यानंतर गार वारे व शेगाव ते वर्ध्यापर्यंत पाऊस असल्यामुळे काहींच उन्हाचा त्रास झाला नव्हता. लग्नघर पी. अँड टी. कॉलनीत, व हॉल दोन फर्लांगावर होता. मंगळवारी रात्री श्रीमंत पुजन झाले. बुधवारी सकाळचे ६॥ चे लग्न होते (तेथे उन्हाळ्यात सकाळचेच मुहूर्त असतात असे वाटते) लग्न, सप्तपदी, होम वगैरे झाल्यावर मी कॉलनीत येण्यास निघालो. घरी जातांना कोणीतरी डाव्या खांद्याला जोराने धक्का दिला. जणू काहीं मागे खेचले कोणीतरी. मागे बघतो तर तेथे कोणीच नव्हते. विचार करू लागलो, कां बरं असं व्हाव! तब्येत तर चांगली आहे. चक्कर येत नाहीं' मग एकदम पडल्यासारखे कां व्हावे? मागे बघत विचार केला' काय बरं असावं येथे, बघतो तर मोठा विटांचा ढीग होता. पुढे बेलाचे झाड दिसले, व तेथेच पोलीस चौकी (लाकडी असते तशी) सारखे काहीं दिसले, म्हणून तेथे गेलो तर काय सांगू भक्तांनो १ १।२ दीड वीतीची श्रीसाईबाबांची आरसपानी मुर्ती. जणू काहीं माझेकडे बघून हसत आहे.

माझ्या डोळ्यातून आनंदाश्रु वाहू लागले. महादेव मामांनी वगैरे देव पितळी होते ते मला मागत आहे मी तेथे असताना पुढ कुठे जाल म्हणून तुला मागे घेतले. मग रोज सकाळी स्नान करून पेढा नैवेद्य विष्णुसहस्त्र नामाचा पाठ व पारायण सुरू केले. असे सतत १५ दिवस कुठलाही त्रास न होता दर्शन सुरू जिवंत. श्री सद्गुरू साईनाथ । तुझ चरणी आश्रय नाही. सुतनी ॥

तुजविण शिला कोठे । ठाव ना या महीवरी ।
सर्वत्र तू साईनाथा । सर्वांच्या हृदयांतरी ॥

★

# चमत्काराशिवाय नमस्कार नाही

–कु. शुभांगी प्रभाकर पावसकर.
एफ २–२१ दक्षता कॉलनी,
भाभा हॉस्पिटल समोर,
बांद्रा मुंबई नं. ५०.

० साईचरणी श्रद्धा ठेवल्यावर काय किमया घडते हे सर्व साईभक्तांना माहित आहे. प्रत्यक्ष माझेच उदाहरण देत आहे –

मी व माझी मोठी बहिण आम्ही दोघी एकाच कचेरीमध्ये नोकरीला आहोत. आमची ड्यूटी सकाळी ७ ते ३ अशी आहे. पण आम्ही दोघीही कधीच वेळेवर म्हणजे ७ वाजता जात नाही. कधी १० मि. १५ मि., ३० मि. आम्ही उशिरा जातो. परंतु साईबाबांच्या कृपेमुळे आम्हांला कुणीच काही बोलत नाही. एके दिवशी आमच्या कचेरीतील मुलं रात्रपाळी करून आम्हांला चर्चगेट स्टेशन जवळ भेटली. व म्हणाली की कार्ल मेहता म्हणजे आमचे मॅनेजिंग डायरेक्टर आले आहेत. प्रथम आम्हांला त्या मुलांची थट्टा वाटली. परंतु थोडे पुढे म्हणजे सेंट्रल पोस्टाजवळ आल्यावर दुसरी मुलं भेटली. ती पण तेच म्हणाली. मग मात्र माझे काळीजच कापायला लागले कारण आम्हांला अर्धा तास उशीर झाला होता. एक दिवस उशीर ठीक आहे परंतु आम्ही रोजच उशिरा जातो.

आणि त्यात तो कार्ल मेहता म्हणजे जणू काय वाघच. वाघात आणि त्याच्यात काहीच फरक नाहीं. तो तेथे असेल आणि आमच्यावर वाघाची डरकाळी फोडेल या विचारात मी असतानाच मला माझ्या बाबांची आठवण आली व मी माझ्या बहिणीला म्हणाले की, आपल्याला काही घाबरायच कारण नाहीं. माझे बाबा सगळं काहीं व्यवस्थित करतील आणि तसाच चमत्कार घडला की. आम्ही दोघी कचेरीची पायरी चढतो तोच आमचा वॉचमन म्हणाला की, घाई करू नका. हळू जा आताच मेहता घरी गेला. मी माझ्या बहिणीला म्हटले बघ माझ्या बाबांनीच त्याला घरी जाण्याची बुद्धि दिली आणि आम्हांला त्या कठीण प्रसंगातून वाचवल, व पुन्हा तो अर्ध्या दिवसाने परत आला. म्हणजे आमची सुटका होण्यासाठी बाबांनी त्याला घरी जाण्यास हुकूम केला.

माझ्या भक्ताचा आर्तस्वर ऐकून मी त्यांचे दुःख निवारण करण्याकरिता धावून आल्याशिवाय कदापि रहाणार नाहीं.

माझी सकाळी ७ ची ड्यूटी असल्यामुळे घरातून निदान आम्हाला ६ ला तरी बाहेर पडावे लागते. एवढ्या पहाटे म्हणजे रस्त्याला गर्दी, रहदारी कमी असते व त्यात थंडीचे दिवस म्हटल्यावर ६॥ पर्यंत काळोख असतो म्हणून मला थोडी भिती वाटायची त्यात बांद्र्याला रहातो व स्टेशनजवळ मुसलमान वस्ती. एकदा असेच मी व माझी बहिण आम्ही दोघी ६ वाजता ऑफिसला जायला निघालो. मी थोडी भित्रीच आहे. एकदा तिकडच्या मुलांनी आमची भंकस केली. मी खूप घाबरले. म्हटलं आपण येथून रोज जाणार व ह्योनी रोज आपली चेष्टा केली तर कसं चालेल मग मी माझ्या बाबांना सांगितलं की, बाबा आमची कोणी रस्त्यात चेष्टा करू नये व कुणी पाठी लागू नये. तुमच्यावरच हा भार मी टाकीत आहे. व तसेच झाले. मी सर्व्हिस करून तीन वर्ष झाली पण आम्हांला आता कुणाचाच त्रास नाहीं. मी रोज सकाळी संध्याकाळी बाबांची उदी पाण्यातूण घेते व पावडर न लावता पावडर म्हणून तोंडाला उदीच लावून मी कामावर जाते व आता मी रस्त्यातून न भिता खुशाल जाते. कारण माझ्या पाठी माझ्या बाबांची छाया आहे.

अशा प्रकारे माझ्या हाकेला सदैव ओ देणाऱ्या कृपाळू साईमाऊलीला माझे शतशः कोटी कोटी प्रणाम!

# माझा खोकला बंद

–श्री. व्ही. एल. वर्तक.
काणेकर वाडा, प्रभु आळी,
पेण – कुलाबा.

० मी तसा मूळचा साईंचा उपासक नाहीं. आमचे मूळ दैवत श्री भवानी माता तिचा मी उपासक. आयुष्यातल्या अनंत खडतर अडचणींत श्री भवानी मातेवर भार घालून आजपर्यंत आहे. मूळचा स्वभाव धार्मिक. परंतु धार्मिक भावनेचे प्रदर्शन होऊ नये असे वाटते. माझे पेण मधील मित्रांच्या घरी श्री साईंची पूजा–अर्चा चालते योगायोगाने गुरुवारी मी कधी कधी आरतीला वगैरे हजर असायचा. त्या मित्रांनी मला ८–१० वर्षापूर्वी एक साईबाबांचा फोटो फ्रेम करुन दिला. तेव्हां पासून त्या फोटोची देवीच्या इतर फोटोंबरोबर पूजा होते. रोज सकाळ संध्याकाळी स्वत: देवाला उदबत्ती दाखवतो व नमस्कार करतो. सर्व देवांजवळ पहिल्यांदा मला माझ्या कुटुंबियांना सद्बुद्धि द्या अशी प्रार्थना करतो व सर्वांना सुखी ठेवण्याची विनंती करतो. श्री साईबाबांजवळ काहीं खास मागणे आजपर्यंत केले नव्हते. गेल्या २८–२–८४ किंवा १–३–८४ च्या रात्री सुमारे ११–३० वाजता श्री साईबाबांना अंत:पूर्वक साद घातली व बाबांनी माझी अडचणीतुन सुटका केली.

त्याचे असे झाले की, मला जानेवारीच्या पहिल्या आठवड्यात सर्दी व फ्ल्यू झाला ताप अगदी कमी होता व तो फक्त २ ते ३ दिवसच होता. परंतु खोकला मात्र आला तो मागे राहिला. आठवडा गेला. पधरा दिवस महिना झाला तरी खोकला कायम. साधी औषधे, अँटिबायॉटिक, इंजेक्शन्स खोकल्याची सायरपे सतत चालू होती. सर्व तऱ्हेचे रिपोर्टस् झाले. मग मुंबईच्या तज्ञांकडे गेलो. २४–२–८४ ते २६–२–८४ पर्यंत सर्व रिपोर्टस परत एकदा घेतले. तज्ञांनी दिलासा दिला की ४ दिवसात खोकला जाईल. घरी परत आलो तोंपर्यंत खोकला खूप कमी झाला होता. परंतु एका रात्री २८–२–८४ किंवा १–३–८४ सुमारे ९–३० वाजतां रात्री खोकला सुरु झाला तो ११–३० वाजेपर्यंत रात्रौ खोकला थांबेचना. सतत खोकला. तोंड मिटलेले नाहीं, बरगड्या पोट, घसा दुखून दुखून जीव जायची वेळ आली. जीव हवालदील. रिपोर्टमध्ये कुठलाही गंभीर आजार नाहीं. मग असे कां? बसल्या बसल्या श्री साईबाबांच्या तसबिरीवर लक्ष गेले. झटकन उठलो. बाबांच्या पुढ्यात डोकं टेकलं की बाबा माझा खोकला आता थांबला तर तुझी ही कृपा मी श्रीसाईलीला मासिकात प्रसिद्ध करण्याकरिता पाठविन. माझा खोकला श्री बाबांच्या आशीर्वादाने ५ मिनिटात थांबला. मी बाबांचा ऋणी आहे.

# मला आलेला उदीचा अनुभव

—सौ. नंदा हरबलसिंग परदेशी
शेतकरी संघाजवळ, परदेशी पुरा,
नंदुरबार, डि. धुळे.

"नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य ।
नित्य घ्या प्रचित अनुभवे!"

० गेल्या जूनच्या ३० तारखेला घडलेली गोष्ट. माझा भाऊ हा माझ्या बहिणीच्या गावी ८ दिवसापासून तिला पोहचविण्यासाठी गेला होता बहिणीकडे ३-४ दिवस राहून तो माझ्याकडे नंदुरबारला येण्यास निघाला पुसद ते अकोला व भुसावळ या मार्गाने तो माझ्याकडे येणार होता. भुसावळ स्टेशनवर उतरून तो नंदुरबारला येण्यास बसला प्रवासाच्या थकव्याने व रात्र असल्याने त्याची झोप त्याला आवरता आली नाहीं त्याच्याजवळ एक बॅग व पिशवी होती. बॅगेत त्याची सर्व सर्टीफिकेट तसेच दोन जोड कपड्याचे होते.

नरडाणे ते शिंदखेडा या दरम्यान त्याला झोप लागली त्याला दोंडाईच्या स्टेशनावर अचानक जाग आली झोपेतून उठल्यावर त्याने आपली बॅग व पिशवी पाहिली पण त्याला दोन्ही वस्तू जागेवर आढळल्या नाहींत त्याने डब्यातील शेजारी असलेल्या माणसांनाही विचारले व इतरांनाही विचारले पण त्याबद्दल त्यास कोणीही उत्तर दिले नाहीं तो खूपच हिरमुसला झाला.

तो नंदुरबार स्टेशनावर उतरला घडलेली सर्व हकिगत त्याने पोलिसांना सांगितली आणि तो माझ्या घरी आल्याचे पाहून मलाही आश्चर्य वाटले. मी त्यास विचारले अरे तू आलास, तर तुझ्या जवळ तर काहीच सामान नाही. तुझी बॅग किंवा पिशवी नाहीं का? त्याने अगदी हिरमुसले होऊन व डोळ्यात पाणी आणून सांगितले की "माझी बॅग व पिशवी येतांना मला झोप लागली असता रेल्वेच्या डब्यातून कोणी चोरून नेली."

मी व माझी आई तसेच त्याचे मेहुणेही त्यास रागावून बोलले. नोकरी लागण्यास साधे सर्टिफिकेट सुद्धा आता राहिले नाहीं. आता पुढे कसे होईल अशी चर्चा चालली.

मी त्यास उठवले व सांगितले की 'अरे उठ' तोंड धु, अंघोळ कर, आणि देवाजवळ बस, आणि देव्हाऱ्यात बाबांची उदी आहे. त्या उदीस उदबत्ती लावून नंतर बाबांची उदी लाव, आणि असे म्हण– बाबा माझी बॅग व पिशवी हरवली आहे मला फक्त माझे सर्टिफिकेट मिळू देत त्यान तसे केले. त्याच्यासह मी ही बोलले की, बाबा तुम्हीच सर्व गोष्टींचा निर्णय लावा असे म्हणून उदी हातात घेतली व श्री साईबाबांचे स्मरण करुन सांगितले 'बाबा आज गुरुवार आहे. आपला महिमा अपरंपार आहे. माझ्या भावाचे सर्टिफिकेट आठ दिवसाच्या आत मिळवून द्यावे. असे म्हणून मी 'श्री हरी ओम्' बाबा असे पाच वेळा उदी कपाळावर लावली. असे मी पाच दिवसांपर्यंत केले तसे मी रोज पुजा केल्यानंतर व रात्री झोपतानाही उदी लावते. आमच्या घरात सर्वांनाच बाबांची आवड फार आहे मुलेसुद्धा अधूनमधून श्री साईबाबांची उदी लावतात.

बरोबर ८ दिवसांनी आम्हांला (भावाला) एका माणसाचे जळगावहून पत्र आले की आम्हांस तुमचे स.टिफिकेट मिळाली आहेत. आपण जळगावी येऊन आपली सर्टिफिकेट घेऊन जावित. माझा भाऊ जळगावला गेला. त्या इसमास भेटला. त्याने भावाला त्याची सर्व सर्टिफिकेटे दिली. या कार्यात श्री साईबाबांनी आमच्या हाकेला होकार दिला.

अशा ह्या महान साईबाबांच्या चरणी आम्ही सर्व सेवक नतमस्तक आहोत.

## जया मनी जैसा भाव तैसा पावे साई त्याशी !

–श्री. आत्माराम र. ठाकरे.
चाळ सुपरिटेंडेंट क्वार्टर,
बी. आय. टी चाळ कंपाऊंड,
चंदनवाडी, मुंबई, ४०० ००२.

० आठ ते नऊ महिन्यापूर्वी माझ्या डोक्यावरील केस वस्तऱ्यान काढतात त्याप्रमाणे जाऊ लागले. प्रथम पावलीच्या आकाराचा, अधेलीच्या आकाराचा नंतर रुपयाच्या आकाराचा चक्ता पडू लागला' मला फारच चिंता वाटू लागली. मी माझ्या न्हाव्याला दाखविले. त्याने जे औषध सांगितले ते लावून पाहिले, पण काहींच उपयोग होईना. श्री बाबांची प्रार्थना चालूच होती. औषध चालू

होते. प्रत्येक संकटाच्यावेळी बाबा नेहमी पावलात मग ह्याचवेळी का बरं माझी परीक्षा घेत आहेत, असा विचार माझ्या मनीं आला. मग मी साईधाम वाडीतील बाबांच्या मंदिरात जाऊन श्रींची प्रार्थना केली. व त्यांच्यासमोर दोन अश्रू ढाळले. थोडा मनाला आधार आला. बाबांसारखा पाठीराखा असता आपण कशाला चिंता करावी? घरी आलो तेव्हां 'साईलीला' मासिक घरी आले होते. ते वाचत बसलो. सर्वांनी बाबा आपल्याला कसे पावले व आपण संकटमुक्त कसे झालो, अशा प्रकारचे अनुभव दिले होते.

आता आपल्याला बाबा पावणार ह्या भावनेने पायधूनी येथील बऱ्याच औषधी विक्रत्यांकडे जाऊन औषध मागू लागलो. पण व्यर्थ! आता काय करावे? एक विक्रेता तर म्हणाला, 'साहेब या कपड्यात व हातात बॅग घेऊन आपणास औषध कोणीच देणार नाहीं. सदरा–लेंगा घालून या.', ह्या त्याच्या टोमण्याने तर मी अर्धमेला झालो. काय करावे? जो औषध देत होता तो तर एकच छोटी बी आणून देत होता. आणि नंतर तर त्याने ती देण्याचेही नाकारले.

श्रींची प्रार्थना मनोमन चालूच होती. मग मी त्या भागातील ओळख काढण्याचे प्रयत्न करु लागलो. त्या भागात फिरत असतानाच मला माझा मित्र भेटला. त्याने मला ज्या औषध विक्रेत्याने टिंगल केली होती त्याच दुकानात नेले आणि त्या गृहस्थाने आपल्या अनुभवी नोकराकडून औषध कसे लावावे वगैरे दाखविले, आणि त्या दिवसापासून मी ते औषध काळजीपूर्वक गेलेल्या केसांच्या चट्ट्यावर लावू लागलो. नंतर पंधरा दिवसात त्याने सांगितल्याप्रमाणे प्रथम पांढरे केस व नंतर काळे केस येऊ लागले. प्रत्येक महिन्यात हे येणारे केस वस्ताऱ्याने काढून टाकले. असे तीन महिने केले. आणि आता माझे केस पूर्ववत झाले आहेत. ही श्री साईबाबांचीच कृपा आहे.

,**'जया मनी जैसा भाव तैसा पावे साई त्याशी,"** हे बाबांचे वचन सार्थ (खरे) ठरले.

जय साईनाथ!

*

# साईंची लीला अगाध

—सौ. रेखा दत्तात्रय साळवी.
लालबाग, मुंबई – १२.

० मी पहिल्यापासून काही साईभक्त नव्हते. कुठं पू. बाबांची तसबीर दिसली तर आपला नमस्कार करणं एवढंच ठाऊक. पण अशा काही घटना माझ्या अनुभवास आल्या की. पू. बाबांच्या मूर्तीचं दर्शन घेतल्याशिवाय एक दिवसही जात नाहीं. घरातील देवांची पूजा झाली की केव्हा एकदा बाबांच्या मूर्तीच दर्शन घडत असं होत याला कारण बाबांची लीला –

माझी आई गेल्याचा फोन आला. मी घरात एकटी. यजमान व मुले ही परगावी. अशावेळी जो धक्का बसला त्यामुळे मी फार आजारी झाले, इतकी की मला चालण्याचही त्राण राहिल नाहीं. डॉक्टरांचं औषध चालू केलं. रोज इंजेक्शनला जावं लागे. अशावेळी माझा मानलेला भाऊ (जो सच्चा साईभक्त) त्याने फार श्रम घेतले. त्यानेच नुकतीच शिर्डीहून आलेली उदी व प्रसाद खायला सांगितलं, व दर गुरुवारी दादरला साईनिकेतनमध्ये घेऊन जाई. पण एके दिवशी डॉक्टरकडे जाताना माझ्याबरोबर कोणीच नाहीं. मला तर रडायला यायला लागलं शेवटी घरात एक बाबांच कॅलेंडर होतं. त्यापुढे उभी राहिले व म्हटलं की आता डॉक्टरकडे जाताना तुम्ही व माझे गुरु पू. गजानन महाराज पट्टेकर या दोघांनी सोबत करा. आणि खरच आश्चर्याची गोष्ट की बिल्डिंगचा जीना उतरल्यावर दोघांनी माझे दोन हात धरले व डॉक्टरकडे नेले. तिथं डॉक्टरनीही विचारल आज तू एकटी व अशी धीट होऊन कशी आलीस. कारण रोज जाताना खाली नजर लावूनच जात असे. भीती वाटायची वाटेत आपण पडणार तर नाहीं. परत येतांनासुद्धा दवाखान्यांची पायरी उतरल्यावर ही जोडी उभीच. परत घरी आणून पोचवलं. मी मागे पाहिलं तर दोघंही गायब. त्यावेळी माझ्या मनाची स्थिती काय झाली असेल ते बाबाच व गुरुदेव जाणोत!

तसाच दुसरा अनुभव ताजा आलेला –

माझी ८ महिन्याची नात फार आजारी झाली तिला हॉस्पिटलमध्ये ठवल्याचा फोन कोल्हापूरहून आला. मुलाच हे पहिलच मूल. त्या दोघा नवराबायकोला मुलांचा अनुभव नसल्यामुळे ती घाबरलेली असणार अशावेळी त्यांच्या

कडे जायच म्हटलं तरी दुसरा दिवस उजाडणार आता काय करायचं मन सारख बाबांचा धावा करीत होतं. त्यावेळी बाबांना सांकड घातलं, बाबा, मी तुमची उदी काही मुलीला जावून लावू शकत नाहीं. पण आता इथं घरात तिच्या नावानें उदी भिंतीला लावते ती तिला पोंचू दे व रात्री ९ पर्यंत बरी होऊन घरी येऊ दे आणि काय आश्चर्य! रात्री ९ ला मुलाचा फोन आला की, मुलीची तब्येत आता चांगली आहे व तिला घरी आणली आता ती खेळत आहे. त्यावेळी माझ्या डोळ्यातून आनंदाश्रू वाहू लागले, व तशीच रात्री बाबांच्या देवळात जाऊन त्यांच्या पायांवर डोक ठेवलं तेव्हां कुठे समाधान झालं.

खरंच पुन्हां एकदा साईचमत्कार अनुभवास झाला.

असेच सर्व भक्तांच्या संकटसमयी साईबाबा धावून यावेत हीच साईचरणी प्रार्थना!

# संप असतानाही वाहनांची सोय झाली

—श्री. पु. अ. साठे,
१०७७ अ ४ शिवाजीनगर,
पुणे – ४११ ०१६.

० माझे श्वशुर श्री. चिंतामण वामन खाडिलकर अगोदर बसचे रिझर्वेशन करून शिर्डीला जाण्यास निघाले. पुण्याहून सुटणारी पहाटेची बस, शिवाजी-नगरला गाठण्यासाठी बाहेर पडले तेव्हां रस्त्यावर एकहि ऑटोरिक्षा नव्हती. पुढे मिळेल म्हणून पुढे शिवाजीनगरकडे चालत राहिले. बसची वेळ होत आलेली, पायी पोचण्यास वेळहि अपुरा होता. बस चुकणार की काय असे वाटून मनोमन श्री साईंचा धावा केला. वाटेत त्या दिवशीचे वृत्तपत्र मिळाले त्यावरून ऑटो-रिक्षांचा संप असल्याचे कळले. तेवढ्यात एक मोटरकार त्यांचेजवळ थांबली. आतील गृहस्थांनी "शिर्डीला चाललात ना, चला बसा." म्हटले, ते गाडीत

बसले. शिवाजीनगर स्टँडला पोचले, बस सुटण्याआधी केवळ पांच मिनिटे पोचल्याने बस मिळाली. ती मोटारगाडी कोणाची त्यात आपल्याला बोलावून वेळेत पोचवणारे सद्गृहस्थ कोण, व आपण शिर्डीलाच चालतो हे त्यांना कळले कसे, या साऱ्या गोष्टी विचारण्याचे भानही त्यांना नव्हते! त्यांनी मनोमन ओळखले कीं, भक्तांच्या हाकेला श्री साईच धावले.

ꕤ ꕤ ꕤ

# जो जो मज भजे जैसा जैसा भावे।
# तैसा तैसा पावे मीहि त्यासी ॥

—सौ. सुलभा सो. कदम.
दिन बिल्डिंग, ना. म. जोशी मार्ग,
मुंबई नं. ११.

० मनुष्य जीवन हे संकटमयी आहे. परंतु जीवनाचा मार्ग सुलभ करावयाचा असेल तर त्याला भक्तीशिवाय दुसरे अन्य कोणतेही साधन नाहीं. परंतु भक्ती ही निरपेक्ष असावी तरच संसाररूपी नौका, तुम्ही समुद्रपार करू शकाल याकरिता बाबांनी तुम्हां आम्हां भाविक भक्तांना मुंगीच्या पावलाप्रमाणे नकळत आपणाकडे ओढून आणले आहे. म्हणून भक्तांनी बाबांची ११ वचने ज्याच्या मुखी असतील त्यांच्या जीवनी कधी काळाचे भय उरणार नाहीं. याकरिता भक्तीही अंतःकरणपूर्वक असावी. वरील बाबांच्या वचनानुसार बाबांनी माझ्या जीवनांत साफल्य मिळवून दिलेले आहे आणि देत आहेत. असेच बाबांचे कृपाछत्र तुम्हां आम्हांच्या कुटुंबियांवर सदोदित राहो हीच प्रार्थना. बाबांच्याकडे जी इच्छा करावी ती बाबांनी पूर्ण करावी यानुसार बाबांनी माझ्या दोन्ही मुलींच्या १० वी व १२ वी च्या निकालात घवघवीत यश संपादन करून दिलेले आहे. ही यशाची पायरी बाबांच्या आशिर्वादाचे फळ आहे. याकरिता मुलांनी भाविक भक्तांनी बाबांच्या नामाच्या जपाची वात जीवनात तेवत ठेवा, हीच वात तुमच्या जीवनाचे साफल्य मिळवून देईल, अशा ह्या बाबांच्या चरणी माझे कोटी कोटी प्रणाम!

※ ※ ※

# नित्य मी जिवंत जाणा हेची सत्य।
# नित्य घ्या प्रचिती अनुभवे॥

—श्री. तुकाराम कृष्णा सावंत.
लक्ष्मीबाई साळुंखे चाळ, खो. ६,
भांडुप, भट्टीपाडा, मुंबई – ७८.

० आमच्या घरी एक अॅल्युमिनियमचा देव्हारा आहे तो माझा मित्र प्रभाकर वापर्डेकर याने बनविला. अशा वस्तु बनविण्याचा त्याचा धंदा नसून फावल्या वेळात त्याला जमेल तसे तो बनवितो. माझा एक मोठा भाऊ परेलला रहातो. तो केव्हांही आमच्याकडे आला म्हणज आमच्या देव्हाऱ्याकडे पाहून नेहमी म्हणतो, मला पण असला एक बनविण्यास सांग, मी म्हणालो ठीक. तुला कसा पाहिजे व केवढा पाहिजे त्याची मापे मला सांग, मी त्याला विनंती करून सांगतो. त्याप्रमाणे त्याने मापे सांगितली व निघून गेला. त्यांचे काही दुकान किंवा धंदा नसल्याकारणाने त्याला सर्व सामानाचे पैसे अगोदर देण भाग होते व त्या अगोदर तो बनवितो किंवा नाही हे महत्त्वाचे होते. मला भावाने एक महिन्याची मुदत दिली होती. तेव्हां प्रथम पैशाची व्यवस्था माझा एक मित्र रमेश पाटील याजकडून केली व नंतर त्याला भेटलो, व त्यास देव्हारा बनविण्यास सांगितले. तेव्हां तो म्हणाला सध्या मला वेळ मिळणार नाहीं. कारण कालपासूनच आमच्याकडे ओव्हरटाईम सुरू झाला आहे, व अशी संधी केव्हातरी येते. तेव्हां मी तुला आताच वचन देत नाहीं. मी म्हणालो मला एवढ्या लौकर नको आहे. एक महिना वेळ आहे. सावकाश बनव, तेव्हां त्याने सांगितले की पाहू या मी प्रयत्न करतो व त्याने मी दिलेले पैसे घेतले.

असे करता करता महिना होत आला तरी त्याने देव्हाऱ्याचे काम चालू केले नव्हते. खरोखर पहाता त्याला वेळ मिळत नव्हता. कारण तो सकाळी जावून रात्री यायचा. परंतु त्याने त्याबद्दल काहींच हालचाल केली नव्हती. त्यामुळे मला फारच धास्ती वाटत होती. व महिना तर होत आला होता व त्याची तर साधी भेटसुद्धा होत नव्हती असे करता करता फक्त तीनच दिवस उरले. घरी पत्नीने सारखी किटकिट लावली होती की जर तुम्हांला वेळेवर

मिळणार नव्हता तर लोकांना शब्द का दिलात. जीव अगदी वैतागून गेला होता. काय करू अन् काय नको असे झाले होते काहींच सुचत नव्हते.

माझी तिसरी पाळी होती. मी कंपनीत असाच विचारात बसलो होतो. त्याचवेळी मला काय सुचले कोण जाणे, माझ्या हातात मला एका मित्रान दिलेली बाबांची अंगठी आहे. ती डोक्याला लावली व मनोमन परन्तु जरा वैतागूनच श्री साईबाबांच्या चरणी प्रार्थना केली की बाबा आता माझ्या इज्जतीचा प्रश्न आहे. व अजून कामाचा काहींच श्री गणेशा सुद्धा नव्हता परंतु आशा ती तुमच्या आशिर्वादाची. तेव्हां कसेही करून ह्या दोन दिवसात आमचे काम झाले पाहिजे असा आशिर्वाद द्या. आम्ही तिघेही तुमचे भक्त आहोत व शिरडीस तुमचे दर्शन घेवून आलेलो आहोत.

दुसऱ्या दिवशी सकाळी कामावरून घरी जाण्याअगोदर मी आमच्या नेहमीच्या ठिकाणी गेलो. तो माझा मित्र तेथे कामावर जाण्याच्या तयारीने आला होता, मी त्याला विचारले काय बंड्याभाऊ (आम्ही त्याला बंड्या ह्या टोपण नावाने हाक मारतो) कसे काय? त्याबरोबर तो चटकन म्हणाला अरे हां बरी आठवण केलीत आजपासूनच आमचा ओव्हरटाईम बंद. प्रथम तुमचे काम. मी दिलेली रक्कम त्याने त्याचे मित्राजवळ ठवायला दिली होती. ते पैसे घेतले व कामावरून येताना सर्व सामान आणले व दोन दिवस सारखे चिकाटीने काम करून तो देव्हारा बनविला व मी ठरलेल्या दिवसा अगोदर एक दिवस त्याला नेऊन दिला. ही सर्व बाबांची किमया.

तेव्हां बाबांच्या चरणी चांगल्या भावनेने व निष्पाप मनाने केलेली प्रार्थना विनवणी केव्हांच वाया जाणार नाहीं.

# साईबाबांच्या लीलेचे असंख्य अनुभव

—सौ. मालती ज. गालवणकर.
१११ । ११ बी श्री शैल्य,
प्रभात रोड, पुणे ४११ ००४.

० आमच्याकडे श्री साईबाबांची भक्ती बरेच वर्षापासून चालू आहे. किंबहुना श्री साईबाबाच आमचं दैवत बनलं आहे. प्रत्येक साईभक्ताच्या पदरी साईबाबांच्या लीलेचे असंख्य अनुभव असतात. भक्ताच्या प्रत्येक अडीअडचणीत श्री साईबाबा भक्तांना आधार देऊन आपले अस्तित्व दाखवत असतात. म्हणूनच शिर्डीत आलेला एक साधा फकीर आज साऱ्या जगताचा सुखकर्ता झालेला आहे. श्री साईबाबांचे भक्त केवळ भारतातच नव्हे तर साऱ्या जगभर पसरले आहेत. स्वत:ला असंख्य अनुभव आल्यामुळ तसेच इतरांचे अनुभव ऐकल्यामुळे साईबाबांचा भक्तगण वाढतच गेला आहे.

श्रद्धापूर्वक अंत:करणांनी कोठूनही मारलेली हाक साईबाबांपर्यंत जाऊन पोहचते. परंतु आपल्याला फळ मिळेपर्यंत सबुरी ही धरावीच लागते, आणि फळ मिळाल्यावरही साईबाबांना विसरून चालत नाही.

माझ्या मोठ्या मुलीचे पहिल्यावेळी तीन महिन्यात गर्भपात झाले होते. नंतरच्या वेळी मला सारखी काळजी वाटून राहिली होती. ती बाळंत होईपर्यंत मला भीतीच वाटायची. मग मी साईबाबांना मनोमन प्रार्थना केली आणि आश्चर्य म्हणजे माझी मुलगी सुखरूप बाळंत झाली. तिची नॉर्मल डिलीव्हरी झाली आणि तिला मुलगा झाला. दोघही आता मजेत आहेत. हा अनुभव मी मुद्दाम येथे देत आहे.

श्री साईनाथांची उदी तर फारच प्रभावी. शिर्डीच्या द्वारकामाईतील धुनी-तील उदी अनेक भक्तांना जीवदान ठरली आहे. छोटयामोठ्या व्याधीमधून सुटण्याचा तो एक उत्तम खात्रीशीर इलाज आहे. साईबाबा म्हणजे 'वैद्यांचे वैद्यराज' आहेत. मोठमोठे वैद्यलोक जेथे हात टेकतात तेथे साईबाबांची उदी आपला प्रभाव दाखवते.

कोणत्याही नवभक्ताला साईबाबांची भक्ती सुरू करण्यास काहीच हरकत नाहीं कारण साईबाबांच्या भक्तीला जातपातीचे बंधन नाहीं. हिंदु, मुस्लीम, ख्रिश्चन, महार, चांभार, कुष्ठरोगी, इंग्रजी माणूस असे सर्वजण साईभक्त होऊ शकतात. शुद्ध आणि श्रद्धापूर्वक अंतःकरणांनी कोणीही केव्हांही साईबाबांची भक्ती सुरू करावी आणि फळाची अपेक्षा असल्यास त्याची वाट पहावी.

तेव्हां साईबाबा जातपात मानत नसत. साईबाबांचे हिंदुही भक्त आहेत, आणि मुसलमानही! कोणत्याही जातीच्या भक्ताला ते सारखाच अनुभव देतात. आणि त्याला दुःखमुक्त करतात. असे असताना आपण तरी जातीजातीत भेद करून सुखी आयुष्य चिंतामय का बरं करायचे!

# साई कृपेचा अनुभव

—श्री. एन. आर. शहाणे.
पाटणकर बाजार, लष्कर,
ग्वाल्हेर, ४७४००१ म. प्र.

० मी स्वतः व माझे घरातील सर्वजण साईभक्त आहोत. कोणतेही काम करताना व घरातून बाहेर जाताना फोटोला नमस्कार व उदी लावून जाण्याची संवय सर्वांनाच आहे. साई कृपेनेच सर्व काहीं व्यवस्थित चालले असून साई कृपेचा अनुभवही अनेकदा मला आला आहे.

१९८३ मार्च महिन्याची गोष्ट. माझा नातू चि. आशीश हल्ली वय सुमारे १७ वर्षे, हायर सेकंडरी स्कूलच्या परीक्षेस बसला होता. मुलगा अभ्यासू वृत्तीचा असल्याने सुरवातीपासून प्रत्येक वर्गात प्रथम श्रेणींत उत्तीर्ण होत आला असल्याने ह्या फायनल परीक्षेतही प्रथम श्रेणी घेण्याच्या उमेदीने अभ्यासाला

सुरवात केली होती. परंतु मध्यंतरी त्याच्या आईच्या आजारपणांत जवळ जवळ चार महिने त्याचा अभ्यास नियमित होऊ शकला नाही. आईची तब्येत सुधारल्यावर तो पुन: अभ्यासाला लागला व परीक्षेस बसला. परीक्षेला जाताना फोटोला नमस्कार व उदी लावून जात असे. पहिले दोन पेपर्सही चांगले गेले. तिसरे दिवशी पदार्थविज्ञान शास्त्राचा पेपर होता. रोजच्या सवयीप्रमाणे फोटोला नमस्कार व उदी लावून तो गेला होता. प्रश्नपत्र पहाताच तो एकदम नर्व्हस झाला काहीं सुचेनासे झाले. थोड्या वेळानंतर तो सावरला थोडी हुशारी वाटू लागली. अर्ध्याहून अधिक पेपर त्याने सोडवला व घरी परत आला. घरी आल्यावर त्याने पुढच्या पेपर्समध्ये न बसण्याचे व ड्रॉप घेण्याचे सांगितले. घरात सर्वांनी त्याला समजावले परंतु तो तयार होईना. शेवटी मीही त्याला समजावले. मला त्याने काहींच उत्तर दिले नाहीं. जेथे आम्ही बोलत बसलो होतो तेथे वरचे बाजूस श्रीबाबांचा फोटो लागला होता. मी बाबांना अत्यंत मनोभावे प्रार्थना केली की, भगवन ह्याला परीक्षेस बसण्याची सुबुद्धि दे व त्याला अपेक्षित यश मिळू दे. आश्चर्य असे की संध्याकाळचे सुमारास तो पुन: अभ्यासाला लागला व त्याने सबंध परीक्षा दिली. प्रथमश्रेणी मिळण्याची उमेद त्याला स्वत:ला व आम्हांलाही कमीच होती. पेपर्स त्याचे सर्व चांगले गेले होते. परीक्षेचा निकाल ज्यावेळी लागला त्या दिवशी आम्ही निकाल पहाण्याचे अगोदरच त्याचे मित्राने तो प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्याची खुशखबरी सुनावली. आम्ही निकाल बघितल्यावर श्रीबाबांना नमस्कार केला व प्रसाद वाटला. अंकसूची मिळाल्यावर त्याचे ६५.२ टक्केवारी पडल्याचे दिसून आले.

श्री साईबाबांची कृपा सर्वांवर व आमचे पाठीशी सदैव राहो अशी मन:-पूर्वक प्रार्थना करतो.

# जया मनी जैसा भाव तया तैसा अनुभव

—कु. सरल प. खारकर.
'साई–निवास' सायन हौ. सोसायटी,
रोड नं. २, स्कीम नं. ६.
प्लॉट नं. २६, ए. (पूर्व)रूम नं. ४,
१ ला माळा, शीव मुं. २२,

० माझी वडील बहीण बायजी माझे सतत काम करून थकत चालली होती व शेवटी एक दिवस ती खूपच आजारी झाली. उठून उभे रहाण्याची शक्ती गेली. बसत बसत काम करायला लागली. रात्री भाऊ घरी आल्यावर त्याला संबंध दिवसात तिची झालेली अवस्था सांगितली. त्याच्या देखतच ती दोनदा पटकन खाली बसली. मी तर अपंग. आपल्या आत दुःख कोंडत होते. दुसऱ्या दिवशी सकाळी पहाते तर ती बिछाना न करताच तशीच झोपलेली व नंतर जागी होताच असंबद्ध बोलायला लागली. भाऊ व मी घाबरले परंतु मी भावाला उदीचा करंडा आण व तिला लाव. उदी लावली आणि काय आश्चर्य! माझी बहीण व्यवस्थित बोलू लागली. श्री साईबाबांची उदी म्हणजे संजीवनी. नंतर डॉ. ना आणले त्यांनी तिच्या अंगातील रक्त कमी झाले आहे. त्यांनी इंजेक्शने, औषध सुरू केले. श्री साईबाबांनीच डॉ. ना मार्गदर्शन केले म्हणूनच त्यांच्या हाताला यश आले. ही घटना ता. १७–४–१९८४ रोजी घडली. आता बहीण उभी राहू लागून कामही करू लागली ही सर्व कृपा श्री साईबाबांची.

**श्री साईबाबांनी मला पैसे वाटले –**

० मी साईलीला मासिकात लेख मधून मधून लिहिते व मला साई प्रसादाचे पैसे येतात ते पुरस्कार म्हणून दिले जातात हे मला माहित नव्हते. मी सही करून बहीणीजवळ मनी ऑर्डरचा फॉर्म देत असे. पैशाला हात लावून नमस्कार करून बहिणीजवळ देते. जानेवारी ८४ च्या महिन्यात मला सकाळी स्वप्न पडले. श्री साईबाबा माझ्याजवळ बसले व पैसे वाटू लागले. बहीण जशी माझी जवळ बसते तसेच बसले. तेजस्वी अंगकांती, मी बाबांना म्हटले

बाबा तुम्ही आम्हाला पैसे देता. हो हे तुला, हे तुला व हे तुला. मला जाग आली. दुपारी १ वाजण्याच्या सुमारास पोस्टमन मनीऑर्डर घेऊन आले. हे गृहस्थ नवीन होते त्यांनी मी सरलताईंना पाहिल्या खेरीज तुमच्याजवळ (बहिणी) पैसे कसे देऊ? मी आत येऊ कां?,' बहिणीने त्यांना आतमध्ये बोलावले ते बसले माझी अशी अवस्था पाहून त्यांनी सही करावयास पत्रक दिले. मी सही केली व सहज खाली पत्रकावर पाहिले तर नोव्हें. डिसें. ८३ साहित्याबद्दल साईप्रसाद आठ रुपये. मी पत्रक दिले व त्यांचे आभार मानले. बहिणीने मला पैसे दिले. ते पाहिल्यावर मला स्वप्नाची आठवण झाली. कारण त्यात नोटा व त्यावर एक रुपयाचे नाणे असेच मला श्री साईबाबांनी स्वप्नात दिले. मी बहिणीला स्वप्न सांगितले.

**श्री बाबांची लीला अगाध –**

० पावसाळ्याचे दिवस. एक छोटी पाल रोज दरवाजावर येत असे. एक दिवस माझ्या जवळच्या भिंतीवर कीटक खाण्यासाठी ती आली. खाली खाली येऊ लागली. मला भीती वाटली मी बहिणीला श्री साईबाबांना सांगण्यास सांगितले. त्याप्रमाणे ती म्हणाली बाबा पालीला सांगा तिच्याजवळ जाऊ नकोस तू आपल्या घरी जा. तिने करुणा भाकली. मी डोळे घट्ट मिटून घेतले होते. थोड्यावेळाने बहिणीला विचारले तर ती म्हणाली ती कुठे गेली ते मला समजले नाहीं. आम्ही दोघींनी श्री साईबाबांना नमस्कार केला. हा अनुभव गेल्या वर्षी माझा हात दुखावयास लागला त्यामुळे लिहू शकले नाहीं. असो. श्री साईबाबा आमूचे आधार । आम्हां भावंडांचे त्यांना कोटी कोटी नमस्कार.



# यत्न मानवी सरती जेव्हा ।
# तारिल सद्गुरु एकचि तेव्हा ॥

–श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे.
३९९, गुरुवार पेठ,
सातारा – ४१५ ००२.

० "यत्न मानवी सरती जेव्हां । तारिल सद्गुरु एकचि तेव्हां ॥" वरील ओवी ही खरोखरच अर्थपूर्ण आहे. ज्यावेळी मानवी प्रयत्न संपुष्टात येतात त्यासमयी परमेश्वरी शक्तीच कार्य करीत असते. "प्रयत्नांती परमेश्वर" म्हणतात. ही उक्ती त्रिकालबाधित सत्य आहे.

माझे थोरले बंधु श्री. विजयकुमार गरगटे यांचे लग्न होऊन दहा वर्षे झाली परंतु पत्नीपोटी मूलबाळ नसल्यामुळे त्यांच्या मनाला समाधान नव्हते. डॉक्टरी उपाय चालूच होते. आमचे कुलदैवत खंडोबा. परंतु आमचे सर्वस्व म्हणजे साईबाबा. कोणतेही काम सुरू करताना "प्रथम हाती साईंची उदी नंतरच कार्यसिद्धि" हे तत्त्व आमच्या कुटुंबामध्ये सर्वांच्या हृदयामध्ये रूजले गेले आहे.

दि. १५ जुलै १९८४ रोजी दुपारी आमच्या बंधुपत्नी फॅमिली डॉक्टरांच्याकडे तपासणीकरिता गेल्या. त्यांच्या पोटात वेदना होत होत्याच. फॅमिली डॉक्टर जवळ जवळ दोन तास तपासणी करीत होते. दोन तासानंतर त्यांनी भितीदायक तसेच धक्कादायक घटना सांगितली –

ते म्हणाले, तुमची डिलीव्हरीची तारीख होऊन गेलेली आहे. होणाऱ्या बालकाची हालचाल देखील बंद झालेली आहे. ठोके देखील पडत नाहींत तेव्हां होणाऱ्या अपत्यापेक्षा तुमचा जीव वाचवायचा असेल तर तुमचे सिझरीन करणे हाच एक उपाय होय.

ही घटना कुटुंबियांना समजताच सर्वजण घाबरून गेले. आता काय करायचे? हा प्रश्न सर्वांच्या नजरेसमोर लटकत्या तलवारीसारखा उभा राहिलेला होता. डॉक्टरांनी दुपारी तीन वाजता निर्णय दिला की, आज सायंकाळपर्यंत कसल्याही परिस्थितीत सिझरीन झालेच पाहिजे.

आमच्या घरामध्ये आमच्या संपूर्ण घराण्याचा वंशाचा दिवा म्हणजेच हे होणारे मूल परंतु डॉक्टरांनी तर आणखी धक्कादायक घटना सांगितली. मूल काय कोणास नको आहे कां? परंतु संचितामध्ये प्राक्तनांमध्ये जे लिहिले असेल ते कधीच चुकत नाहीं.

आम्ही सर्वजण साईबाबांची प्रार्थना आत्मियतेने तळमळतेने करू लागलो. आणि काय आश्चर्य? ... शिरडीहून एक साईभक्त माझे स्नेही श्री. दिक्षीत नुकतेच दि. १२ ला गुरुपौर्णिमेस बाबांचे दर्शन घेऊन साईप्रसाद व उदी देण्याकरिता घरी येऊन गेले. खरोखरच त्यांना बाबांनीच दि. १५ रोजी दुपारी घरी पाठविले होते.

साईबाबांच्या प्रतिमेसमोर तुपाचा दिवा लावला व अगरबत्ती (उदबत्ती) लावली, आणि एका पेल्यात थोडे पाणी घेऊन त्यामध्ये नुकतीच शिरडीहून आलेली उदी एकत्र करून साईच्या प्रतिमेसमोर ठेवून घरातील सर्वांनी बाबांना करुणा भाकली. आर्जवे केली. तीर्थ व प्रसाद आमच्या वहिनींना दिला आणि काय आश्चर्य ...!!!

रात्री ठीक दहा वाजता वहिनींना ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले. घरातील सर्वजण ऑपरेशन थिएटर बाहेर साईबाबांची प्रार्थना करीत, उदी बाबांचे नाव घेऊन थिएटरच्या दिशेने फुंकीत होते.

थोड्याच वेळात एका नुकत्याच जन्मलेल्या बालकाचा रडण्याचा आवाज ऐकू आला. त्यावेळी ठीक दहा वाजून पंचवीस मिनीटे झालेली होती. लगेचच एक सिस्टर एका लहानशा ट्रेमध्ये बालक घेऊन बाहेर आल्या आणि आम्हांस म्हणाल्या ...

तुमच्या बाईंना मुलगा झाला आहे. त्यांचे आतमध्ये सिझरीन चालू आहे. त्यांचीही तब्येत ठीक आहे. तुम्ही ह्या बालकास घेऊन तुमच्या दिलेल्या रूममध्ये जा. त्याची आई थोड्यावेळात आम्ही घेऊन येतोच.

आम्ही सारे आश्चर्य करू लागलो. खरोखरच, साईबाबा, तुमची लीला अगाध आहे. लहान बालक व त्याच्या आईची तब्येत साईकृपेने खरोखरच सुधारत गेली.

ता. २६ रोजी बालकाचा नामविधी ठेवण्याचा कार्यक्रम झाला. त्याचे नाव 'साईप्रसाद' असे ठेवण्यात आले.

अखेर श्री साईचरणी माझी एकच प्रार्थना आहे की, या भारत–भूवर अशा असंख्य भगिनी आहेत की ज्यांचे पोटी पुत्र–प्राप्ती (अपत्यप्राप्ती) नसल्या मुळे दुःखामध्ये जीवन कंठीत असतात. अशा भगिनींनी साईबाबांची भक्ती करावी, त्यांची संजीवनी उदी त्यांनी सकाळ–संध्याकाळ पाण्यातुन प्राशन करावी हे सर्व काहीं केले तर सर्वत्र सौख्याचा फुलबाग फुलल्याशिवाय रहाणार नाहीं. याची मला पूर्णतः खात्री आहे. विश्वास आहे.

माझी श्री साईचरणी श्रद्धा आहे. तेव्हां थोडयाशा सबुरीने कार्य पार पडते म्हणून किंचित देखील आपले मन विचलीत होता कामा नये.

श्री साई चरणी कोटी कोटी प्रणाम !!!

## दर्शन बाबांचे झाले

लावणी सम्राज्ञी **–सौ. आसावरी बायकूळ.**
संगीत विशारद, इ–९–८ बर्वेनगर,
घाटकोपर (पश्चिम) मुंबई ४०० ०८४.

० या वर्षी रामनवमी उत्सवानिमित्त श्री साईबाबा भक्तिगीतांचे माझे कार्यक्रम मुंबईत चालू होते. रामनवमीच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे ११ एप्रिल ८४ रोजी माझा कार्यक्रम शिवाजी मंदिर दादर समोरील 'स्वाती मनोर' येथील श्रीसाईनाथ मित्रमंडळाने आयोजित केला होता. कार्यक्रमाची रंगत क्षणोक्षणी वाढत होती कारण बाबांची गाणी गाताना मी देहभान विसरुन जाते हा माझा नित्याचा अनुभव. कार्यक्रम संपल्यावर मी तृप्त मनाने घरी परतले. बाबांचा आशीर्वाद माझ्या पाठीशी होता असेच म्हणावे लागेल.

बाबांना नमस्कार करुन मी झोपी गेले. अगदी शांत झोप लागली. पहाटे मला स्वप्न पडले. प्रत्यक्ष द्वारकामाई माझ्यासमोर उभी होती. अगदी जशीच्या तशी. अंगात पायघोळ कफनी डोक्यावर शुभ्र रूमाल, कपाळावर रेखीव गंध लावलेले बाबा प्रज्वलित धुनीसमोर बैठकीवर बसले होते. पायाजवळ चिलीम व सटका पडलेला होता. डावा हात कठड्यावर ठेवून बाबा धुनीकडे पहात

होते. मी द्वारकामाईत प्रवेश केला. त्याच क्षणी बाबांचे लक्ष माझ्याकडे गेले. द्वारकामाईत कोणीच नव्हते. फक्त बाबा आणि मी. डोळ्यांनी व मानेने आत येण्यास बाबा मला खुणावित होते. माझ्याकडे पाहून हसत होते. आवो बेटी बाबा म्हणाले. मी त्यांच्या पायाशी जाऊन बसले. हसत हसत बाबांनी माझ्या डोक्यावरून हात फिरवित म्हटले — बेटी, माझी गाणी अशीच गात जा. आयुष्यभर गात जा. अल्ला भला करेगा, अल्ला भला करेगा!

बाबांच्या तोंडून आलेले शब्द ऐकून मला दाटूनच आले. काय बोलावे कळेना. वात्सल्यपूर्ण नजरेने बाबा माझ्याकडे पहात होते. एकाएकी मला हुंदका आला. मला रडू आले. ते अश्रू आनंदाचे होते. लहान मुलाची समजूत घालावी त्याप्रमाणे बाबा मला जवळ घेऊन माझी समजूत काढत होते — 'बेटी रडतेस का? तुला काय पाहिजे?' बराच वेळ झाला तरी मी बाबांना उत्तर देत नव्हते. मलाच मग वरमल्यासारखे झाले. मी म्हणाले, बाबा आम्हांला सुखी ठेवा दुसरं काहीं नको.' बाबा प्रसन्न मुद्रेने माझ्याकडे पाहून हसले. 'अल्ला मालिक, अल्ला मालिक' म्हणत बाबा अंतर्धान पावले. 'बाबा' म्हणून मी ओरडत उठून बसले. मला जाग आली. समोरच्या भिंतीवरील बाबांच्या तसबीरीतून बाबा स्मितहास्य करत होते.

**दर्शनाचे माहात्म्य दाविले । मशिदीचे महत्त्व ठसविले ।**
**निजप्रेम निदर्शना आणिले । सहज लीलेकरून ।।**

असे हे बाबांचे मंगल दर्शन! अशी ही बाबांची द्वारकामाई !

बाबांचे भजन, गायन, चिंतन यापेक्षा दुसऱ्या कोणत्याही गोष्टीला महत्त्व न देता, बाबांची अनन्यसाधारण भक्ती घडली तर त्या भक्तीचे फळ त्याच मापात नव्हे तर सवाई दुप्पटीने भक्तांच्या पदरात पडेल यावर माझा दृढ विश्वास आहे. बाबांनी म्हटलेच आहे —

**मग जो गाई वाडेकोडे । माझे चरित्र माझे पोवाडे ।।**
**तयाचिया मी मागे पुढे । चोहीकडे उभाच ।।**

◆ ◆ ◆

# सर्व साक्षी साईनाथ

—श्री. टी. एन. चव्हाण.
योगीकृपा, २२, मातंग को. हौ.,
सोसायटी, नडियाद.

० तारीख ८ जुलै १९८४ रोजी सकाळच्या गाडीने मी अहमदाबादला नडियादहून साधारणत: ६.३० वाजता जाण्यास निघालो परंतु त्यावेळी येणारी प्रवासी गाडी लेट असल्यामुळे मी गुजराथ मेल मध्ये बसून मणीनगर येथे उतरलो. मणीनगर हा अहमदाबादचा एक भाग आहे आणि पश्चिम रेल्वेवर अहमदाबादच्या आधीचे स्टेशन आहे. घरातून निघताना मी माझ्याबरोबर माझी ऑफिस बॅग आणि एक पिशवी घेतली होती, ती पिशवी मला माझ्या ऑफिस-मधल्या मित्राने अहमदाबाद येथील त्यांच्या मित्राच्या घरी देण्यासाठी दिली होती. त्या पिशवीत साधारणत: ३५० ते ४०० रुपयांचा कॅमेरा आणि थोडे मद्रासहून आणलेले दागिने होते. असा साधारणत: १००० रुपयांचा माल असावा त्यामुळे मी त्या पिशवीस फारच जपत होतो. कारण दुसऱ्याची वस्तु सांगित-लेल्या ठिकाणी पोहचविली म्हणजे बरे असते.

मी नडियादहून ज्यावेळी मणीनगर स्टेशनावर उतरलो त्यावेळी ती पिशवी माझ्याजवळ होती. एका हातामध्ये मी ऑफिस बॅग व दुसऱ्या हातात पिशवी घेतली होती. मला मणीनगरहून माझ्या मित्राच्या घरी जावयाचे असल्यामुळे मी कालूपूर येथे जाण्यास निघालो. त्यावेळी पिशवी आणि बॅग माझ्या जवळ होती, कालूपूरला उतरल्यावर मला अंकूर सोसायटी येथे बसने जावयाचे असल्याने मी बसमध्ये पिशवी आणि बॅग घेऊन चढलो, बसण्यास जागा पुरेशी असल्यामुळे मी माझ्या खिडकीच्या बाजूस ती पिशवी ठेवली आणि पुढ्यात बॅग घेऊन बसलो. साधारणत: ३० मिनीटांचा प्रवास असावा म्हणून त्यावेळी मी शहरातील हालचाली बघण्यात दंग झालो शेवटी शेवटचा स्टॉप आल्यावर मी घाईत उतरलो कारण मला मित्रास भेटून शहरातील इतर कामे आटो-पावयाची होती, त्यामुळे त्या गर्दीत ती कॅमेरा असलेली पिशवी बैठकीवरच विसरलो आणि बॅग घेऊन मित्राच्या घरी येऊन पोहचलो. साधारणत: ९ वाजले असावे. मित्राच्या घरी चहापाणी घेतल्यावर मी गुजराथ युनिव्हर-

सिटीकडे जाण्यास दुसऱ्या बसने निघालो, त्यावेळी मला काहींतरी हरविल्याचा भास झाला बाजूला पाहिले तर कॅमेरा असलेली पिशवी नव्हती. अंगास घाम फुटावयास लागला आणि आठविण्याचा प्रयत्न करू लागलो की पिशवी कुठे हरवली. एक कल्पना आली की मित्राच्या घरी राहिली असावी. म्हणून येणाऱ्या पुढच्या बस स्टॉपवर उतरलो आणि उलट मित्राच्या घरी जाण्यास रिक्शाने निघालो. मनात नाना प्रकारचे विचार येत होते आणि अडचणीच्या दिवसांत आणखी ९०० ते १००० रुपयांचा खर्च येणार असे वाटत होते. मुलांची फी, पुस्तके, कपडे आणखी घ्यावयाचे बाकी होते आणि अशा परिस्थितीत आणखी हा खर्च तो पण दुसऱ्याची वस्तु तिसऱ्याला देण्यासाठी घेतली आणि ती हरवली यासाठी, याउपर आपणांस मूर्खात गणले जाणार याची शक्यता वेगळी. अशा विचारांनी डोक्यात गर्दी व्हावयास लागली व असह्य चिंता वाटू लागली. अशा परिस्थितीत मी अंकूर सोसायटी येथील मित्राच्या घरी येऊन पोहचलो. रिक्शातून येतांना चिंता बरोबर साईंची आठवण तर येतच होती आणि साईंचा नामाचा जप चालूच होता. रिक्शातून घाई घाईने खाली उतरलो आणि सरळ मित्राच्या घरात धावत गेलो. मित्रास विचारल्यावर समजले की मी पिशवी त्यांच्या घरी आणलीच नव्हती. तसेच खाली उतरून त्याच थांबवलेल्या रिक्शात बसून अंकूर बस स्टॅंडवर आलो साईनामाचा जप चालूच होता. बस स्टॅंडवर आल्यावर व्यवस्थापकास विचारले तर समजले की ती बस जाऊन १ तास झाला आणि त्यांना कुठल्याही प्रकारची पिशवी मिळाली नाहीं. त्यामुळे माझी परिस्थिती आणखीनच दयनीय झाली आणि मी विचारात पडलो काय करावे. साईंची आठवण झाली बाबांना शब्द टाकला आणि अंकूर स्टॅंडच्या व्यवस्थापका कडे गेलो त्यांच्याकडून बसचा कोड नंबर, कन्डक्टरचा आणि ड्रायव्हरचा नंबर घेतला व कालूपूर बस स्टॉपकडे जाण्यास रिक्शाने निघालो, बाबांच्या नामाचा जप चालू होताच, रस्त्याने बाबांनी २–३ वेळा दर्शनपण दिले (रस्त्यावरील दुकानात बाबा आशिर्वाद देत आहेत असा फोटो दिसला) अहमदाबाद सारखे मोठे शहर. आणि बसमध्ये इतकी गर्दी असते की कमीत कमी अर्धा तास रांगेत उभ रहावे लागते त्याउपर बस पुन्हां भरून कालूपूरकडे जाण्यास निघाली होती. अशा परिस्थितीत पिशवी मिळणे शक्यच नव्हते आणि पिशवी हरविल्यास आता साधारणतः २ तास व्हावयास आले होते. त्यामुळ मी पिशवीची आशाच सोडली होती. परंतु बाबांवर संपूर्ण श्रद्धा होती आणि सबुरी ठेवली होती. अशा चिंताजनक परिस्थितीत मी कालूपूरच्या स्टॅंडवर येऊन पोहचलो· रिक्शा-वाल्याने ७ रुपयांची मागणी केली मी ते चुकविले आणि व्यवस्थापकाकडे धाव

घतली. त्यास संपूर्ण हकीगत कळविली आणि ड्रायव्हर, कंडक्टर विषयी विचारले त्यांच्याकडून समजले की दोघे लंच घेण्यास गेले आहेत आणि १०–४५ वाजता येतील. कारण त्यावेळी त्यांची दुसरी पाळी सुरू होणार होती. करिता १०–४५ पर्यंत थांबणे आवश्यक होते, मनात नाना विचार यावयाचे आणि स्वभाव चिडचिडा झाला होता. परंतु सर्व सहन करणे भाग होते. मी व्यवस्थापकांच्या कॅबीन मागे वळून पाहिले तर बाबांचा फोटो होता आणि बाबा हसून आशिर्वाद देत होते, आणि बाबांच्या दोहोबाजूस लिहिले होते 'श्रद्धा' आणि 'सबुरी.' मी मनात हसलो बाबांना नमस्कार केला आणि जप चालूच ठेवला. त्यामुळे वेळ काढणे अतिशय सरळ आणि सोपे झाले. १०–४५ वाजता दोघे ड्रायव्हर आणि कन्डक्टर चहापाणी करून आले आणि जास्त विचारपूस न करता मला माझी पिशवी त्यांनी परत केली. मनात अतिशय आनंद झाला. वाटले बाबांनी मनात पाण्याने पणत्या लावल्या तो आनंद शब्दात लिहिणे अशक्य आहे. फक्त मनानेच अनुभव लागतो. पुन्हां बाबांच्या फोटोकडे पाहिले बाबा हसत होते आणि सांगत होते.

**तुम जब भी मुझे याद करोगे ।**
**अपने साईको अपने पासही पावोगे ॥**

यापेक्षा आणखी बाबांचा कोणता पुरावा पाहिजे? साई सर्वत्र आहे याविषयी शंकाच नाहीं. फक्त मनाने त्यास साद द्यावी लागते. नाहींतर अहमदाबाद सारख्या शहरात आणि ते पण बस सारख्या सार्वजनिक वहानात याउपर ते पण साधारणतः तीन तासांनी हरवलेली वस्तु मिळावी हे शक्यच नाही, त्यासाठी साईंची मदत असावी लागते.

**जिंदगी तेरी राहमें क्या खोया और क्या पाया हमने ।**
**खुदको खोया और साईको पाया हमने ॥**

— शहामृग

# असे झाले आईचे ऑपरेशन

—सौ. रोहिणी विजय जाधव.
गोविंद भुवन, लिमये वाडी,
अलिबाग.

० मुंबईला माझ्या माहेरी (श्री. पाटील) माझे वडील, माझी आई, भाऊ, वहिण, आत्या सर्व श्री साईभक्त आहेत. सर्वांचा श्री साईबाबांवर पूर्ण विश्वास.

माझ्या, सौ. आईच्या गर्भाशयाचे ऑपरेशन करावयाचे होते. तसं पाहता माझी आई पूर्ण निरोगी. हाच काय तो एक तिला त्रास होता. तोही ती सहन करायची. शेवटी पूर्ण विचाराअंती ऑपरेशन करायचे ठरवले. ऑपरेशन म्हटले की भीती ही वाटतेच वडिलांनाही काळजी वाटत होती. आमच्या शाळेला मे ची सुटी असल्याने मी थोडे दिवस (मुंबई, दादर) माहेरी आले होते. सोमवार दि. १७ मे १९८२ ला आम्ही पूजा वगैरे करून बाबांची विभूती कपाळाला लावून आम्ही ९॥ वाजता सकाळीच हॉस्पिटलला जाण्यास निघालो. डॉक्टरांची भेटही त्वरीत झाली. डॉक्टर म्हणाले आजच ॲडमिट करा. उद्या मंगळवार आहे. म्हणजे ऑपरेशनचा वार उद्याच ऑपरेशन करू.

डॉक्टर म्हणाले रक्त जरी पेशंटला लागले नाहीं तरीही तुम्ही कमीत कमी एका बाटलीची तयारी करून ठेवा. सध्या आमच्याकडे विकत मिळण्याची शक्यता कमीच आहे. तरी तुमच्या घरच्यांना कोणालाही रक्तदान करायला सांगा. म्हणजे उद्याच ऑपरेशन होईल अजिबात काळजी करू नका. हे ऐकताच आई म्हणाली असं घरच्या मंडळींचे रक्त घेऊन मला मुळीच ऑपरेशन करायचे नाहीं. आपण घरी जाऊन कशीतरी आईची समजूत काढली. आई, तू तर रोज श्री कुलस्वामी, श्री साईबाबा या सर्वांची प्रथम पूजा करतेस मगच अन्न ग्रहण करतेस तर तेच आज तुझ्या हाकेला तुझ्या या वेळेसाठी नक्कीच धावून येतील. काहींतरी मार्ग निघेल बघ. मला अचानक आठवले, की मी इंटरसायन्सला असताना आमच्या कॉलेजमधून रक्तदान केले होते. पण काय! ते कार्ड राहिले अलिबागला. ऑपरेशन आहे मुंबईला आणि ते सुद्धा उद्या सकाळी काय करावे बरं! श्रीबाबांचा धावा केला आणि थेट ब्लड बँकेत गेले. खर पहाता कार्ड प्रथम दाखवावे लागते. त्याशिवाय त्यांना रेकॉर्ड कसा पहाता

येईल? मी रक्तदान १० वर्षांपूर्वी केले होते आणि खरा चमत्कार इथच घडला. माझ्या आईसाठी बाबाच धावून आले. माझ्या वडिलांचीही साई प्रार्थना चालूच होती. मी दुपारी १२॥ च्या सुमाराला के. इ. एम. हॉस्पिटलच्या ब्लड बँकेत गेले. मी रक्तदान केल्याचे काही एक प्रूफ माझ्या जवळ नव्हते. फक्त होते काय तर साईनाम साईकृपा. ब्लडबँकेतील कुलकर्णी क्लार्कला मी थोडक्यात माहिती दिली व अंदाजे दहा वर्षांपूर्वी मी रक्तदान केले आहे. कृपया कार्ड मिळते का पहा व मला त्यानुसार रक्ताची व्यवस्था झाल्याची पावती द्या. कुलकर्णी क्लार्कला काय वाटले कोण जाणे, ती म्हणाली थांबा थोडावेळ आणि ती अनेक कप्पे असलेल्या एका कपाटाकडे वळली व एक ड्रॉवर तिने सहज ओढला आणि जादूगाराने पत्ता काढावा त्याप्रमाणे त्या अनेक कार्डातील एक कार्ड तिने सहज उचलले व म्हणाली, 'रोहिणी पाटील का!' आणि आश्चर्याने माझे डोळे चमकलेच काय बाबांचा चमत्कार, क्लार्कला अनेक ड्रॉवर मधला तोच ड्रॉवर ओढण्याची बुद्धि व्हावी व त्या अनेक कार्डातील माझ्याच नावाचे नेमकेच कार्ड क्षणात हाती पडावे हा चमत्कारच नव्हे काय. १२॥ वाजता मी ब्लडबँकेत गेले होते ती अवघ्या १० ते १२ मिनिटात रक्ताची व्यवस्था झाली आहे अशी पावती घेऊनच बाहेर पडले.

डॉक्टरांनाही आश्चर्य वाटले की ब्लड बँकेतील क्लार्कने इतका त्रास कसा काय घेतला? कारण रक्तदानाचे कार्ड असेल तरच ते रेकॉर्ड पहातात अन्यथा नाहीं. त्यांना काय माहित हा सारा त्रास साईमाऊलीने घेतला तो! आईने बाबांना त्रिवार वंदन केले.

दुसऱ्या दिवशी बाबांच्या कृपेने माझ्या सौ. आईचे ऑपरेशन सुखरूप पार पडले. ऑपरेशन थिएटरच्या बाहेरील दरवाज्यावर बाबांचा आशिर्वादाचा फोटो आहे. ऑपरेशन पार पडेपर्यंत त्याच मूर्तीने आम्हांला दिलासा दिला, विश्वास दिला. रक्त लागले नाहीं. पण त्याची तयारी-आवश्यक होती. नाहींतर आणखी आठ दिवस ऑपरेशन लांबणीवर पडले असते. असे आमचे सर्वांचे कृपाळू बाबा. त्यांच्यामुळेच आम्हांला सर्व सुलभ होते.

कोणतेही काम असो ते कितीही अवघड असो बाबांनी कृपा केली की ते चुटकीसरशी होते माझे बाबा आपले सर्वांचें बाबा.

❋ ❋ ❋

# जेथे जातो तेथे तू माझा संगाती

—श्री. डी. बी. पोतनीस.
२६—७ एच. बी. पिंपरी,
पुणे.

० श्री साईबाबांची लीला फार अघटीत आहे.

**जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ।।** देहान बाबा आज आपल्यात नाहीत परंतु अदृश्य रूपात ते आपल्या भक्तांसाठी धाव घेतात.

गुरुवार दिनांक ५ जुलै १९८४ रोजी माझे गुरुबंधू—भगिनींना पत्र पाठवावित असा विचार आला. मज जवळ फक्त एकवीस रुपये पांच पैसे होते. दहा रुपयाच्या दोन नोटा व एक रुपयाची एक नोट व पांच पैसे. मी पोष्ट ऑफिसमध्ये गेलो व सात पोष्ट कार्ड घेऊन एक रुपया पाच पैसे पोस्ट मास्तर यांना देऊन माझे ऑफिसमध्ये आलो. दुपारी साडे बारा वाजता श्री बाबांना प्रसादासाठी एक डझन केळी घेतली आणि पैसे देण्यासाठी खिशात हात घातला तो पैसे गायब झालेले. मी केळी परत केली आणि पुन्हा ऑफिसमध्ये आलो. माझे टेबलावरील सर्व कागदपत्रे पाहिली परंतु सर्व व्यर्थ. शेवटी श्रीबाबांची उदी मजजवळ सतत असते, ती हातात घेऊन पोष्ट ऑफिसचे रोखाने फुंकली. पोष्ट ऑफिसमध्ये गेलो. पोष्ट मास्तरना विचारले. परंतु उत्तर नकाराचे मिळाले. तिकीट, पोष्ट कार्ड मिळताच तेथे काउंटरखाली पाहिले तोच दहा दहा रुपयांच्या घडी केलेल्या नोटा जशाच्या तशाच पडलेल्या पाहिल्या. मी त्या उचलून खूप वेळ पहात राहिलो कारण जवळ जवळ दोन तासांचे अवधीमध्ये कितीतरी लोक पोष्ट ऑफिसमध्ये येऊन गेली असतील. श्री बाबांनीच माझ्या या नोटांचे रक्षण केले. त्यांनीच त्या सांभाळल्या आहेत ही श्री साईलीला प्रत्यक्षात घडलेली सत्य आहे. हे नमूद करण्यात मला आनंद वाटतो.

**आले देवाजिच्या मना । तेथे कोणाचे चालेना ।।**

शनिवार दिनांक १४ जुलै १९८४ रोजी सकाळी ९ वाजता मी ऑफिसमध्ये जाण्यासाठी निघालो. वाटेत माझ्या मुलीच्या घरी पाच मिनिट थांबून

साडे नऊ वाजता ऑफिसमध्ये पोहचलो. ऑफिसमध्ये साडेबारा वाजेपर्यंत काम करून घरी जेवणासाठी भाड्याची सायकल घेऊन जेवण उरकून परत ऑफिस-मध्ये येताना माझ्या मागून येणाऱ्या एका स्कूटरने धडक मारली. मला काही लागले नाही परंतु सायकलचे पुढील चाक व हँडल वाकडे तिकडे झाले. मी ती सायकल एका रिक्षात घालून सायकल दुकानदारास देण्यासाठी आलो. त्याला झालेली परिस्थिती सांगितली परंतु सायकल दुरुस्तीसाठी खर्च रुपये ५०-६० द्यावे लागतील असे मला त्याने सांगितले. पैसे दिल्याशिवाय सायकल ताब्यात घेत नव्हता परंतु ऑफिसचा पत्ता मी त्याला दिला व पैसे ऑफिस-मध्ये देतो तेथे येऊन घेऊन जा असे सांगितले.

चार वाजता सायकल दुकानदाराचा नोकर ऑफिसमध्ये आला. मी त्याला चाळीस रुपये दिले व ऑफिस सुटल्यानंतर दुकानात मालकांना भेटतो असे सांगितले. मी संध्याकाळी ५.३० वाजता दुकानात गेलो. दुकानाचे मालकाने बसावयास खुर्ची दिली. बोलता बोलता मी सहज बोलून गेलो की, आज मला माझ्या साईबाबांनीच मृत्युच्या दाढेतून बाहेर काढले. नाहीतर स्कूटरखाली सापडून हात पाय तुटला असता त्याने माझे थोडावेळ बोलणे ऐकून घेतले व जुलै ८४ चा श्री साईलीला अंक माझे हातात दिला. मी म्हणालो हा अंक मला आलेला आहे. मी स्वतः मासिकाचा वर्गणीदार, लेखक, कवि आहे. तेव्हां त्याने माझे नाव विचारले. माझे नाव ऐकताच त्याने मोठ्या आदराने मला घरी नेऊन चहा फराळ केला. माझे चाळीस रुपये मला परत केले आणि यापुढे केव्हांही सायकल घेऊन जा दुकान श्री बाबांचे कृपेनेच चालले आहे. तुम्ही माझे गुरुबंधू आहात तुमच्या सारख्या श्री साईभक्तांचे दर्शन घडावे यातच मला आनंद वाटतो. मी भावनावश होऊन त्यांना मिठी मारली आणि रोज येऊन भेटेन असे सांगून त्यांची रजा घेतली.

माझे श्री साईबाबा कोणाची कोठे नाती जोडून देतात हे एक विचित्र कोडेच आहे.

# आम्ही साईभक्त कसे झालो ?

—सौ. भावना दामोदर जेऊरकर.
१०, साईधाम, नाना शंकर शेठ पथ,
गोपी टॉकीज समोर, विष्णू नगर,
डोंबिवली (प.). जि. ठाणे.

० १९७५ सालापासून आतापर्यंत आम्हांला समर्थ श्री साईबाबांच्या चमत्काराचे अनेक अनुभव आले आहेत. तेव्हांपासून आम्हा सर्वांची श्रद्धा साईबाबांवर इतकी बसली आहे की, खाता, पिता, उठता, बसता चालतांना सहजपणे मुखी नाम येते "श्री साई समर्थ" १९७५ पूर्वी शिर्डी गाव व साईबाबा नाव ऐकून होते. मी कधीही शिर्डी क्षेत्री गेले नव्हते. परंतु बाबांच्याच शब्दात सांगावयाचे म्हणजे "साता समुद्रा पलिकडून सुद्धा, मी माझा भक्त पायाला दोर बांधून खेचून आणतो." तसेच आमच्या बाबतीत घडले.

२८ सप्टेंबर १९७५ ची काळरात्र मी कधीही विसरणार नाही. त्या दिवसापासून माझा मुलगा चि. श्रीकांत (वय वर्षे ६ होते) बेशुद्ध पडला. पुढील ५ दिवस तो त्याच अवस्थेत परळच्या के. इ. एम. रुग्णालयात होता. डॉक्टरांनी सर्व तऱ्हेचे प्रयत्न चालू ठेवले होते, परंतु त्याच्यात कोणतीही सुधारणा नव्हती. ४ थ्या दिवशी त्याची प्रकृती अधिकच खालावली. डॉक्टरांनी फक्त १ टक्का आशा आहे असे सांगितले. त्यावेळी आम्हा दोघांची अवस्था काय झाली याचे मी वर्णन करू शकत नाही. मी मन घट्ट केले. शेगावच्या गजानन महाराजांची पोथी घेतली. अंग धुवून रोज एक अध्याय वाचून काढी. त्यावेळी उदबत्ती लावे. संपूर्ण अध्याय वाचून झाला की उदबत्ती जळून झालेली राख गजानन महाराजांचा अंगारा म्हणून त्याच्या अंगाला संबंध दिवस पुरवून चोळून लावत होते. मुखाने गजानन महाराजांचे स्मरण करत होते, विनवित होते – "गजानना माझ्या मुलाला कोणतेही व्यंग न ठेवता बरे कर. त्याला नंतर शेगावला घेऊन यईन व त्याच्या हातून तुझ्यावर अभिषेक करीन". भक्तीभावाने मारलेली हाक देवाला पोहचते व देव त्या भक्ताच्या मदतीला धावत येतो अगदी तसेच झाले.

२ आक्टोबर म्हणजे ५ दिवसांनी पहाटे ५ वाजता माझ्या मुलाने "आ ... ई ..." अशी हाक मारली. माझे डोळे व मन भरून आले. मनोमनी मी गजानन महाराजांचे आभार मानत होते. त्याच दिवशी मोठ्या डॉक्टरांची सकाळची फेरी सुरू झाली. त्यांनी माझ्या मुलाची प्रकृती पाहिली व हसले. आम्ही त्यांचे आभार मानले पण ते म्हणाले "माझे आभार मानू नका, देवाचे माना. तुमच्या मुलाचा पुनर्जन्म झाला आहे." पुढे पाऊण महिना तो हॉस्पीटलमध्ये होता त्याच्या सर्व वैद्यकीय चाचण्या झाल्या व "प्रकृती एकदम ठीक" असा शेरा घेऊन घरी परतलो.

घरी आल्यावर माझ्या स्वप्नात आमच्या दारात गजानन महाराज येऊन उभे राहिले. अंगात भगवी कफनी कमरेला भगवी लुंगी व डोक्यास भगवे वस्त्र बांधलेले. ते माझ्याकडे भिक्षा मागत होते. मी चकित झाले. गजानन महाराज आणि या वेषात! मी त्यांना घरात बोलाविले बसावयास पाट दिला ते मला म्हणाले, "तू काही एक काळजी करू नको. तुझा मुलगा चांगला मोठा होईल तू लघु रुद्र कर". असे म्हणून ते निघून गेले.

त्यानंतर मी या स्वप्नाचा अर्थ एका जाणकार व्यक्तीला विचारला त्यांनी सांगितले की, "गजानन महाराजांनी त्या वेषात येऊन सांगितले की, यापुढे तू साईबाबांची भक्ती कर. ते व मी एकच आहोत". म्हणून आम्ही क्षेत्र शिर्डीला गेलो. बाबांचे दर्शन साश्रूनयनांनी घेतले.

बाबांच्या दर्शनाने आम्हांला अतिशय आनंद झाला. बाबा अंतर्यामी आहेत-त्यांनी आमच्या मनातील सारं काही ओळखले. पहिल्याच भेटीत आम्ही साई-मय होऊन गेलो. बाबांच्या कृपेने माझा मुलगा बरा झाला. डोंबिवलीत सुंदर ब्लॉकही बाबांच्या कृपेने ताबडतोब मिळाला. ह्यांना नवीन जागेत आल्यावर प्रमोशन मिळाले. आम्हां सर्वांची प्रकृती निकोप आहे. अशा तऱ्हेने अनेक अनुभव आम्हांला येत गेले आणि अशा प्रकारे आम्ही साईभक्त बनत गेलो.

# तू दयाळू साई रे

–श्री. गजानन कृष्णराव निरखे.
(बापूसाहेब)
२०, नंदलालपुरा, इंदौर ४५२००४.

• तुम्ही देवपूजेनंतर असे विचारात का पडलाय? कसली चिंता लागलीय तुम्हांला? सौभाग्यवतीने प्रश्न केला.

चिंता नाहीं काही नाही. तुम्ही एवढे मनासारखे देवपूजा साहित्य लावल्यावर कोणता देव चिंता निर्माण करेल?

ते काहीं असो तुमचा चेहराच बोलतोय, चेहरा काही लपत नाही! हे पहा, त्याचं काय आहे, मी म्हणालो, चिंता वगैरे काही नाही, श्री गुरुपौर्णिमा उत्सव जवळ आला आहेना, बाबांची साईबाबांची पूजा सेवा कोणत्या प्रकारे करावी हा विचार मनात घोळत आहे. एक मन बोलतेय शिरडीला जावे दुसरे मन म्हणतेय, साई 'सच्चरित' पारायण करावे. तिसरे मन ...' इतक्यात सौभाग्यवतीचा आवाज मी कशालाही नाही म्हणत नाहीं; पण मला, काय वाटतेय ते तुम्हांला सांगू का? सांगतेच! तुम्ही "साईसच्चरित" पाठ करावा. हेच खरं! ...

अन् दारावरची "कॉलबेल" वाजली. बघ बर कोण आलय?

"पोस्टमन" हा बघ शुभ संकेत शिरडीच्या गुरुपौर्णिमा उत्सवाचे आमंत्रण कार्ड आलय काही विचार ठरवायलाच हवा.

आठवतय तुम्हांला आपण शिरडीला उत्सवासाठी जायचे, आणि मी रात्र रात्र; पहाटे पावेतो जागून साईपूजन अभिषेकाचा पहिला वहिला योग, मान मिळतो का ह्याचा प्रयत्न करायचा, पण व्यर्थ, मुंबईकरांचेच भाग्य थोर! अन् आता तर "सार्वजनिक अभिषेक" कस घडावं मनासारखं? येईल का कधी असा योग, हाच असा विचार मनात, डोक्यात येत आहे.

म्हणूनच म्हणते की तुम्ही आपलं 'साई सच्चरित' पारायण करावे. जे साईबाबांचे मनात असेल तसंच घडेल, तो साईबाबा, महान कनवाळू, मायाळू

व दयाळू आहे. माझा तर, सार, सार साईबाबांच आहे!" अहो पण तुम्हा बायांचा समजूतदारपणा आम्हा पुरुषात नसतोच हेच खरं! आम्हां लोकांचे मन भटकतच रहाते.

असो सदिच्छा बलवत्तर 'साईसच्चरित' पारायण सुरू केले. प्रत्येक दिवशी अध्याय वाचताना, बाबांचे चमत्कारिक अनुभव, दैववाद, गीतेवरील भाष्य बाबांची भक्तांशी बोलण्याची रीत, तऱ्हा, हे वाचताना वाटे आपण तत्समयी असतो तर ...सप्ताह मध्यावर आला, आणि मानसिक आनंद वाटत होता, त्यातच गुरुपौर्णिमेच्या दोन दिवस अगोदर. त्या दिवसाचा पाठ संपताच घरातून आवाज आला बरं का, गुरुवारच्या गुरुपौर्णिमेसाठी साई मंदिराची अभिषेक रसीद काढून आणली आहे. आपणा उभयतांना लौकरात लौकर जाऊन अभिषेकाला बसायचे आहे लक्षात असू द्या! उद्या गुरुपौर्णिमा मंदिरात जायचे साईबाबांना आंघोळ घालायची अभिषेकास बसायचे ह्या तंद्रीत झोप लागली. अन अचानक गुरुवारचे भल्या पहाटे चार साडेचारचा सुमार असेल -- स्वप्नच असेल ते की काय! एका धारदार आवाजात ... तुला अभिषेक करायचा आहे नां? पहिल्या नंबरवर बसायचे ना उठ! उठ चल त्या साईमंदिरात चल लौकर गुरुजी तुझी वाट पहात आहेत. आवाज, स्वप्नात साई माझा साईबाबाच तो उठवित होता. एकदम बिछान्या बाहेर खेचला गेलो.

अन् आवाज दिला अहो, चला, चला साईमंदिरात आटपा आन्हिक, आज अभिषेक करायचा आहे. उभयता स्कूटरवर छत्रीबागेत साईमंदिरात पोहचलो. पुजारीबुवा माझी आमचीच वाट पहात होते. बोलले, 'आओ आओ बापूसाब क्यों देर करते हो, अभी कोई आयाही नहीं है, पुजा को ... लगता है; साईबाबा का स्नान आज प्रथम आपकेही हाथसे और अभिषेकभी आप शुरू कर देंगे लोग आतेही होंगे !!'

लगबगीने सोवळे वस्त्र नेसून साईमूर्तीच्या ओटयावर उभयता चढलो. मनासारखे श्री बाबांना सचैल स्नान पंचामृत स्नान, सुवासिक अत्तर गुलाब स्नान घातले. त्याक्षणी निव्वळ आम्ही तिघेच होतो, गुरुजींसह! कोण विश्वास करेल ह्या प्रसंगावर, अन् गुरुजींचे आवर्तन अभिषेक सुरू झाले, आणि इतर भाविक येऊ लागले.

भाविकहो, सत्य प्रतिज्ञेने सांगतोय, सौभाग्यवतीच्या प्रबळ श्रद्धा' इच्छा भक्तिमुळेच तिच्या दयाळू साईबाबांनी माझा नंबर अभिषेकासाठी स्नानासाठी

पहिला लावला. तिची नजर साईबाबांवर खिळली होती ... काय पहात होती? अन एकदम बोलून गेली ... पहिला, साईसच्चरित पारायण महिमा? झाली इच्छा पूर्ती? काय म्हणते मी? झालं तुमच्या मनाप्रमाणे? शिवाय, शिरडीला तर तुम्ही एकटेच जाणार होता. अन् मग माझं काय? म्हणूनच म्हणते शिरडी साईमंदिर काय किंवा इंदूरचे साईमंदिर काय, साईबाबांनी येथील साईमंदिरात येऊन पहाटे स्वप्न देऊन, आपणा उभयतांचे हातून पहिली पहिल्या नंबरनी अभिषेक पूजा घेतली. मागे बघा कितीतरी लोक भक्त भाविक अभिषेकासाठी रांग लावून उभे आहेत बसले आहेत.

मी काय बोलणार मी तर पूर्णतया गद्गदून गेलो होतो. डोळे पाणावले होते आणि उठून साईबाबांचे चरणावर मस्तक टेकीत एकच वाक्य बोलू शकलो.

तू तुच दयाळू साईरे !!!

88 88 88

# बाबांची अशी कृपा

—हेमलता पारकर.
६२, आराम नगर, पार्ट १,
वर्सोवा, अंधेरी, मुंबई ६१.

**जरी हे शरीर गेलो मी टाकूनी । तरी मी धावेन भक्तांसाठी ।**
**नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धि माझ्या ठायी ।।**

ही बाबांची वचने किती सत्य आहेत त्याचा अनुभव मला नुकताच आला.

साईबाबांची लीला किती अगाध आहे, भक्ताने अगदी मनःपूर्वक मारलेली हाक बाबांच्या कानी पोहचतेच व मग भक्तांच्या हाकेला उभे रहाणे हे बाबांचे आद्य कर्तव्य खरेच स्वतः ते अनुभवल्याशिवाय त्याची गोडी कधी कळत नाहीं.

पूर्वी माझ्याकडे संपूर्ण घरकामाला एक बाई होती. ती बाई महिनाभर कामाला आली की परत १५ दिवस दांडी मारी. शेवटी मी तिला बोलवायला जाईपर्यंत ती येत नसे. मी चार वेळा जाई तेव्हां ती बाई १५–२० दिवसाने परत येई. असे कित्येक वर्षे चालले होते. परत तिला काढून दुसरी बाई ठेवावी तर मिळत पण नाही. म्हणून तिला गोड करून रहावे लागे.

हा प्रकार तर नेहमीचाच होता. नंतर २४ एप्रिलला माझ्या मुलीचे लग्न झाले व २६ एप्रिलपासून तिने जी दांडी मारली ती परत आलीच नाहीं. मी चारवेळा जाऊन आले. माझा मुलगा पण दोनवेळा जाऊन आला दरवेळी उद्या येते म्हणून सांगे मी तर अगदी कंटाळूनच गेले होते व ठरवले आता आपण बोलवायला जायचेच नाहीं. सगळा भार बाबांवरच टाकून काम करायचे.

एक दिवस मी आमच्या बाजूला एक कन्नड कुटुंब रहाते त्यांच्याकडे जाऊन बसले होते. इतक्यात पोष्टमनने हातात आणून साईलीलेचा अंक (मराठी) दिला. आम्हांला नवल वाटले. कारण त्यांच्याकडे साईलीलेचा अंक कधी येत नाही व परत ती लोक कन्नड व अंक तर मराठीत मी तो अंक तिथेच वाचत बसले. वाचता वाचता मी सर्वांचे अनुभव वाचत गेले. एकाने तर लिहिले होते की मला अनुभव आला तर मी साईलीलेत देईन ते वाचल्याबरोबर माझ्या मनात एकदम विचार आला व मी बाबांना म्हटले. मला पण तुम्ही घरकामाला बाई मिळवून द्याल तर मी हा अनुभव अंकात देईन.

दुसऱ्या दिवशी दुपारची वेळ. मी झोपले होते एवढ्यात मला काय बुद्धि झाली म्हणून मी बाहेर आले तर आमच्याच तिकडे राहणारी एक मुलगी की जिला मी पूर्वी ३ वेळा माझे काम करशील का म्हणून विचारले होते व तिने मला नाहीच म्हणून सांगितले होते व त्यावेळी मी मनात ठरवले होते की या मुलीला परत कधी विचारयचे नाहीं. ती मुलगी समोरच जात होती. विचारायचे नाहीं असे मनात म्हणते आहे पण एकदम तिला हाक माझ्या तोंडून मारली गेली. ती घरात आल्यावर तिला मी विचारले अग तू माझे काम करशील का? तर ती लगेच होय म्हणाली व लगेच आत स्वयंपाक खोलीत जाऊन भांडी घासायला पण गेली. मी एवढी चाट होऊन बसले की माझा माझ्या डोळ्यावर विश्वास बसेना. कारण अगोदर जी मुलगी मला ठामपूर्वक नाहीं म्हणून सांगत होती ती एकदम कबूल कशी झाली. दुसऱ्या दिवसापासून अगदी कामाला येऊ लागली. खरेच ही साईबाबांचीच करामत आहे सर्व चमत्कार बाबाच करू शकतात. तो साईलीलेचा अंक माझ्या हातात देतात काय, मी नवस करते काय, व लगेच बाई पण मिळवून दिली. आणि त्या कन्नड लोकांकडे परत कधी साईलीलेचा अंक आलाच नाहीं. मला अनुभव देण्यासाठीच बाबांनी स्वत: तो अंक धाडला होता. माझी नक्कीच खात्री आहे अशीच साईबाबांची कृपादृष्टी राहो ही इच्छा.

# दिव्यत्वाची जेथे प्रचिती तेथे कर माझे जुळती

—श्री. मदन चव्हाण, रत्नागिरी.

० माझ्या मेहुण्यांची "प्रदीप सिने सर्व्हिस" मुंबई असा फिल्म दाखवण्याचा जोड धंदा आहे व तो उत्तम चालत आहे. पण याच वर्षी का कोण जाणे फिल्म व मशिन यांच्यात फारच गडबड व्हायची. फिल्म वेळेवर यावयाची नाहीं किंवा मशिन शो चालू असतांना धोका द्यावयाचे असेच मी १८ मे ला "सौतन" सिनेमा बुक केला व फिल्म मुंबईच्या वितरकांने १४ तारखेला देतो म्हणून सांगितली त्याप्रमाणे मी माझ्या पार्टीच्या लोकांना "सौतन" फिल्म बुक केली आहे असे सांगून टाकले. त्याप्रमाणे त्यांनी सर्व रत्नागिरी शहरात जाहिरात केली. तसेच 'सौतन" सिनेमा रत्नागिरीत न आल्याने लोक तो पाहण्यास उत्सुक होते. आणि शेवटी व्हायचे तेच झाले. वितरकाने चुकीच्या तारखेमुळे फिल्म देण्याचे नाकारले. त्यामुळे माझी पार्टी माझ्यावर खूप नाराज झाली. मी त्यांना सत्य परिस्थिती कथन केली व दुसरी फिल्म दाखवून वेळ मारुन नेली.

नंतर ४ ते ५ दिवसांनी दुसरी पार्टी आली त्यांनी सुद्धा "सौतन" फिल्मचा आग्रह धरला व ती तारीख १९ मे होती. नंतर मी मनुष्य पाठवून फिल्म बुक केली पण लोक सारखे विचारीत की यावेळी "सौतन" फिल्म वेळेवर येईल कां? की मागील प्रमाणेच प्रकार होणार. मी त्यांना धीर देत होतो. पण मनातून मी सुद्धा साशंक होतो. शेवटी १९ मे तारीख उजाडली सकाळी मी फिल्मची वाट पहात होतो. मेव्हणे स्वतः फिल्म घेऊन येणार होते. माझी चलबिचल वाढली मेव्हणे फिल्म घेऊन आले. पण त्यांनी दुसरी फिल्म आणली, व सौतन फिल्म घेऊन दुसरा मनुष्य येत आहे. मी तर हादरलोच काहीं सूचेना मला लगेच साईंची आठवण झाली. मी त्यांच्या फोटो समोर उभा राहून त्यांना म्हटले साई गेल्यावेळी माझी नाचक्की झाली आहे. यावेळी तरी यातून तारा व उदी लावून मी ऑफिसला गेलो. पण काय आश्चर्य १०च मिनिटात मला एका मुलाने येऊन सांगितले की सौतन फिल्म घेऊन मनुष्य मुंबईहून आला. माझा आनंद गगनात मावत नव्हता. माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू आले.

त्यानंतर माझा सिनेमा फारच सुंदर झाला. मी मात्र मनातून साईबाबांचे आभार मानीत होतो.

अशा माझ्या साईनाथाला कोटी कोटी प्रणाम.

# दिव्य साक्षात्कार

कु. उषा कृष्णाजी तावडे.
२, स्नेहदीप, महाराष्ट्र नगर,
भांडुप, मुंबई ७८.

० शुक्रवारी मी व माझे वडील हिंदू महासभा हॉस्पिटलमध्ये गेलो. कारण गेले १५ दिवस माझ्या वडीलांचे पाय रक्तदाबाच्या विकाराने अतिशय जळजळत होते. त्यावर अगदी नाईलाजाने डॉ. कडे गेल्यावर डॉक्टरांनी वडिलांचा रक्तदाब पाहिल्यावर ताबडतोब अॅडमिट व्हायला सांगितले.

म्हणून आम्ही घरी पसे नेण्यास गेलो तर वडिलांनी घरीच विश्रांति घेण्याचे ठरविले. एवढ्यात माझ्या हाती 'साईलीला'चा 'उदी विशेषांक' पडला. आणि त्यातील उदीची उदाहरणे पाहता माझा अगोदरच साईबाबांवर असलेला विश्वास आणखीन दृढ झाला.

तसे आमचे कुटुंब पूर्णतः साईभक्त आहे. आम्ही पूर्वी बऱ्याचवेळा शिर्डीला मुक्काम केला असल्याने आमच्या घरी 'उदी' ही होती. मी लगेचच साईनाम घेऊन वडिलांना औषधाबरोबर उदी दिली.

आणि आश्चर्य म्हणजे त्या दिवसापासून पायातील जळजळ कमी होऊन पाचव्या दिवशी माझे वडील ठणठणीत बरे झाले. आता तर हॉस्पिटलमध्ये जाण्याची आवश्यकतासुद्धा नाहीं.

ही सर्व साईमाऊलीचीच कृपा आहे यात संशय नाहींच. माझे साईमाऊलीला लाख लाख प्रणाम.

# बाबांचे कृपाछत्र

–श्री. एस. एल. रणदिवे
१५, साईवृंद, गोडोली, सातारा.

जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव ॥

० मी १९६६ साली बहिणीच्या लग्नासाठी इंदौर येथे सहकुटुंब गेलो होतो. तेथून शिर्डी येथे बाबांच्या दर्शनाला गेलो. शिर्डीला गेल्यावर बाबांची पोथी विकत घेण्याची मनामध्ये जबरदस्त इच्छा निर्माण झाली. परंतु परतीच्या भाड्याखेरीज पैसे जवळ नव्हते. मनास अतिशय दुःख झाले. समाधी मंदिरात गेलो व त्याप्रमाणे बाबांच्या जवळ प्रार्थना केली. बहीणीच्या दिराकडून रु. १०|– उसने घेतले व बाबांची रु. ८|– देऊन पोथी विकत घेतली. पोथी हातात आल्यावर अतिशय आनंद झाला व त्या आनंदातच सातारा येथे रात्रौ १२॥ वा. घरी आलो. मधल्या दाराची कडी पुष्कळ प्रयत्न करूनही निघना. शेवटी मनातल्या मनात सौ. ने प्रार्थना केली. दाराची कडी पटकन निघाली. आम्ही मधल्या खोलीत गेलो. ते काय आश्चर्य! आमचे टेबल क्लॉक चालू होते. माझ्या हाताच्या घड्याळात जेवढे वाजले होते तेवढे त्या घड्याळात बरोबर वाजले होते. आम्ही सर्वजण आश्चर्यचकित झालो कारण महिनाभर आम्ही घरात नव्हतो तेव्हा ते घड्याळ चालू कसे? घड्याळ चालू होते याचा अर्थच असा की साईबाबा प्रत्यक्ष घरी आले होते. माझा आनंद द्विगुणित झाला.

१९६८ साली सौ. भयंकर आजारी झाली. अनेक डॉक्टरांना दाखविले परंतु त्याचा काहींसुद्धा उपयोग झाला नाहीं. आम्ही उभयतांनी बाबांची प्रार्थना केली त्यानंतर सौ. च्या स्वप्नात बाबा आले व म्हणाले घाबरू नकोस. मीच तीनदा तुझ्या घरात आलो". २१ दिवस बाबांचा जप केला. २१ दिवसाच्या आतच तिला पूर्णपणे बरे वाटले व आजपर्यंत तिला ते दुखणे झाले नाहीं.

एकदा माझ्या मुलीला १०५ अंशापर्यंत ताप चढला. ती अस्वस्थ झाली. ताबडतोब डॉक्टरांना बोलाविण्यात आले. डॉक्टर इंजेक्शन देणार तोच एका

साईभक्तान माझ्या मुलीला उदी लावली उदी लावताच ताप नॉर्मलवर आला. डॉक्टरसुद्धा आश्चर्यचकित झाले व तुमचे बाबा खरोखरच आहेत याची मला सुद्धा प्रचिती आली. त्यांनी इंजेक्शन न देताच साईबाबांना नमस्कार करुन ते निघून गेले.

पू. साईबाबांची पोथी आल्यावर माझी डोळयात भरण्याजोगी प्रगति झाली. १९७६ साली घर बांधले. बंगल्याचे नावसुद्धा 'साईवृंद' ठेवले आहे. त्याचवेळी बाबांच्या कृपेने एल. एल. बी. झालो व लगेच ऑफिसमध्ये सुद्धा मला वरची जागा मिळाली.

नुकताच मला आलेला एक महान चमत्कार पहा – दि. १४–४–८३ रोजी मी बाबांचे पारायण सुरू केले व रामनवमी दिवशी त्याची समाप्ती केली. समाप्तीच्या आदल्या दिवशी ५१ वा अध्याय वाचीत होतो. त्यातील ओवी अशी होती – **तुम्ही तर माझी मुले । तुम्ही जे अर्पण केले । समजा पावले मजला निश्चित** । निश्चित हा शब्द माझ्या मुखामध्येच होता. इतक्यात बाबांना वाहिलेले गुलाबाचे फूल त्यांच्या हारातून एकदम वर आले व आवाज होऊन ते पाटाच्या मधल्या भागावर येऊन पडले. फुलाची गती खाली येण्याची आहे मग ते वरती कसे काय आले? मी सर्वांना हाक मारली. सर्वजण आश्चर्यचकितच झाले. २२–४–८३ रोजी मी ऑफिसमध्ये गेलो तेव्हां वरच्या जागेचे अधिकार मला देण्यात आले होते. पहा बाबांची लीला! बाबांची किमया !

१९४२ सालापासून जे कृपाछत्र आहे ते आजपर्यंत कायम आहे. त्यांचे नामस्मरण सदैव असावे हीच त्यांच्याजवळ प्रार्थना आहे. या धकाधकीच्या जीवनात बाबांशिवाय कोण आहे? ते माझे सर्वस्व आहेत. त्यांचे गुणगान गाण्यासाठी (हे साईनाथा) असेच नरजन्म लाभोत व त्यांचे अखंड नामस्मरण रहावे हीच त्या दीनदयाळू भगवंताजवळ कळकळीची प्रार्थना.



# साईलीला

★★★卐★★★★☆★★★

—श्री. किरणकुमार मनोहर नाईक.
बंगला नं. २२, जेधेनगर,
बिबवेवाडी, पुणे ४११ ०३७.

० या वर्षी मे महिन्यात मी सपत्नीक व मुलांसह शिर्डीस जाण्याचे ठरविले. त्यानुसार पुणे–शिर्डी या एस्. टी. चे अॅडव्हान्स बुकींग करून ठेवले होते. पुणे शिर्डी ही गाडी पुण्याहुन दुपारी १२.३० वाजता सुटणार होती. त्यानुसार आम्ही शिवाजीनगर एस्. टी. स्टॅंडवर १२ चे सुमारास पोहचलो. १२.३० वाजता नेहमीप्रमाणे एस्. टी. येईल या आशेने आम्ही वाट पहात होतो. शिर्डीस जायचे असल्यास आमच्या घरी नेहमी उत्साहाचे वातावरण असते. त्या उत्साहाच्या भरात १२.३० वाजले, एस्. टी. येईल व आपण आता त्वरीत प्रवासास सुरवात करू असे वाटले. परंतु १ वाजला तरी एस्.टी. न आल्याने मी चौकशीसाठी कंट्रोलरकडे गेलो असता समजले की नुकतीच मुंबई–भिवंडी येथे दंगल झाल्याने तेथें पोलीस फोर्स पोहचविण्यास एस्. टी. वापरात आणल्याने पुणे शिर्डी ही एस्. टी. केव्हां सुटेल हे काहीं सांगता येणार नव्हते. परंतु २.३० वाजताचे सुमारास पुणे मालेगाव ही एस्. टी. आल्यास त्या गाडीत सोय करू असे कंट्रोलरने सांगितले. २.३० वाजताचे सुमारास पुणे–मालेगाव ही एस्. टी. आली असता त्यामधील कंडक्टरने शिर्डीच्या प्रवाशांस बसमध्य घेण्यास मनाई केली. त्यामुळे सर्व शिर्डीचे प्रवासी खाली उतरले. आम्ही मात्र मनाचा निश्चय करून तसेच बसलो. गाडी सुरू होताच कंडक्टर तिकीटाच्या निमित्ताने आला असता आम्ही पुणे शिर्डी गाडीचे रिझर्व्हेशन दाखविल्यावर कंडक्टर काहींच बोलला नाही व त्याने प्रवासास संमती दिली, त्यामुळे मनावरील ताण कमी झाला व प्रवासास सुरवात झाली व विशेष म्हणजे गाडीचा वेग जोरात असल्याने २ तास उशीरा निघूनही साडेसात वाजताचे सुमारास शिर्डीस पोहचलो, तेथे काही कालावधीतच आम्हांस गुरुस्थानात रहावयास जागा मिळाली.

हे सर्व केवळ बाबांच्या कृपेने झाले.

शिर्डीहून आल्यानंतर ८ दिवसांनी पुण्यास जबरदस्त अशा पावसाने झोडपले गुरुवारचा दिवस होता. रात्री ७ चे सुमारास मुसळधार पावसास सुरवात

झाली. अर्ध्या तासातच पावसाने उग्र स्वरूप धारण केले त्यावेळी माझी पत्नी बाहेर गेली असता, घरी येताना वाटेत तिला पावसाने गाठले व त्यामुळे ती अडकून पडली. तसेच माझा मुलगाही माझे सासूरवाडीस होता व तो सुद्धा सासूरवाडीच्या मंडळीसोबत बाहेर गेला होता. मी घरी लागलीच बाबांच्या नावाचा धावा सुरू केला. बाबांचा धावा करतेवेळी सुखरूप वृत्त कळावे म्हणून प्रार्थना केली व काही कालावधितच माझ पत्नीस मेटाकुटीने एक शिक्षा मिळाली व ती घरी आली. पत्नी घरी येताक्षणीच सासुरवाडीस फोन केला असता मुलगाही नुकताच घरी आला होता.

बाबांनी आत्तापर्यंतच्या माझ्या आयुष्यातील सर्व प्रकारच्या संकटातून सहीसलामत बाहेर काढले आहे.

◆ ◆ ◆

# विभूतीचा प्रभाव

—सौ. प्रिया प्र. परब.
६।१२ नवजीवन नगर,
विक्रोळी, (पूर्व), मुं. ८३.

**"तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥"**

० या साई वचनाप्रमाणे खरोखर बाबांनी माझ्या ओझ्याचा खूपच भार कमी केला. ठाई, ठाई आलेले अनेक अनुभव या वेळी जरा बाजूला ठेवून नुकताच घडलेला ताजा अनुभव पहा. रात्री झोपतेवेळी दुसऱ्या दिवसाच्या दैनंदिन कार्यक्रमाची आखणी करूनच झोपी गेले. परंतु मध्य रात्रीच्या सुमारास अचानक माझ्या पोटांत दुखायला लागले व वांत्या होऊ लागल्या. अशावेळी डॉक्टर मिळणे मुश्कील. पण केवळ बाबांच्या विभूतीनेच असा आराम पडला की दुखणे हळूहळू कमी होऊन झोप लागली. व सकाळी उठले तर रात्रीच्या आजाराची थोडीसुद्धा निशाणी नव्हती. जणू काही मला झालेच नाहीं. हा सर्व विभूतीचाच प्रभाव!

मध्यरात्र, पहाट आणि सकाळ या मधील अंतर पहा. बाबांच्या कृपेने ती सकाळ नेहमीप्रमाणे शुभ प्रभातच होती. अशीच बाबांनी नेहमी आम्हां सर्वांवर सदासर्वकाळ कृपादृष्टी ठेवावी ही साईचरणी नम्र प्रार्थना.

# जया मनीं जैसा भाव

–सौ. सविता द. जोशी
१४३ गुरुवार पेठ, सातारा
४१५.००२.

० 'जया मनीं जैसा भाव । तया तैसा अनुभव' ह्या ओळीचा मला अनेकवेळा अनुभव आला आहे. कारण आमचे सर्व कुटुंब आज १० वर्षे झाली श्री बाबांचे भक्त बनले आहे, आम्हां सर्वांना साईबाबांनी अनेक संकटातून वाचवून आपल्याकडे खेचूनच घेतले आहे.

माझा आताचा अनुभव म्हणजे मी श्रीसाईलीला मासिक सुरू करून १०–११ महिने झाले असतील. त्यातील प्रत्येकाचे वेगवेगळे अनुभव वाचून वाटायचे आपणही साईलीलेत एक लेख द्यावा. परंतु काय लिहायचे हा पण प्रश्नच होता असेच दोन महिने गेले आणि माझी इ. ५ वी मधील मुलगी अचानक आजारी पडली. सकाळी उठल्यापासून रोज तिचे डोके दुखायचे. शाळेत गेली की चक्कर यायची, असे ८–१५ दिवस झाले. शाळेत बाई तास बुडवून तिला ऑफिसमध्ये झोपवून ठेवायच्या नाहीतर वर्गातल्या मुलींबरोबर घरी पाठवायच्या. तिची परिस्थिती पाहून मला तर रडूच कोसळे. काय करावे काहीं सुचत नव्हते. अभ्यासाचे तर ती नावच काढत नव्हती, वार्षिक परीक्षा महिन्यावर आलेली. पहिली पासून पाचवीच्या सहामाही परीक्षपर्यंत एवढी हुशार नंबरात असणारी मुलगी आता नापास होणार ही कल्पना सुद्धा सहन होईना आता म्हटले आपणास ह्यातून तारणारे एकच आहेत अन् ते म्हणजे माझे दैवत श्री साईबाबा. आम्ही घरी रोजच श्री बाबांची दोन्हीवेळा आरती करतो. एका गुरुवारी बाबांची आरती झाल्यावर बाबांना हात जोडून अश्रूपूर्ण नयनांनी म्हटले, बाबा माझी मुलगी कशी वाया चालली. तिला होत असलेला त्रास तुम्ही पहातच आहात मी तिला आज उदी लावून तुम्हांस प्रार्थना करते की आजपासून तिला येत असलेली चक्कर व डोकेदुखी थांबू दे व ती चांगल्या मार्कांने परीक्षेत पास झाली तरच मी साईलीलेत लेख देईन. आणि खरोखर काय आश्चर्य त्या गुरुवारपासून आजपर्यंत तिला कोणताही त्रास झाला नाहीं व विशेष म्हणजे वार्षिक परीक्षेत ती चांगल्या मार्कांने पास झाली. अशा प्रकारे मी लिहिन लिहिन म्हणत होते तो लेख बाबांनी असा पूर्ण करून घेतला. अशा साईनाथांना माझे कोटी कोटी प्रणाम.

※ ※

# प्रत्यक्ष दर्शन देऊन रोग बरा केला

—श्री. नारायण पाटील.
खंबाला, पो. दाभाड,
ता. भिवंडी, जि. ठाणे.

० आमचे कुटुंब पूर्वीपासून साईभक्तच. कोणत्याही संकटसमई साईबाबांना हाक मारली की ते संकट निवारण करतात असा सर्वांचाच अनुभव.

मे १९८१ पासून माझे अंग अचानक असह्य दुखु लागले. ठाणा येथील डॉ. मोकाशी एम. डी. यांना प्रकृति दाखवून त्यांची ट्रिटमेंट चालु केली. पण पूर्ण शरीराला सूज आली. घरातील माझ्यासह सर्वच माणसे घाबरून गेली. भिवंडी येथील डॉ. बागे यांच्या हॉस्पिटलमध्ये मला 'अॅडमिट' केले. तेथ रक्त, मूत्र, ब्लडशुगर, एक्सरे, इ. सी. जी. करून झालेवर डॉ. नी सांगितले तुम्हांला किडनी, डायबिटिस स्टोन (मुतखडा) व हार्ट ट्रबल आहे मी साई-भक्त आहे म्हणून माझ्या मित्राने भगवान श्री साईबाबांचा आशिर्वाद फोटो माझ्या हॉस्पिटलमधील खोलीत आणून लावला. सूज कमी झाल्याने हॉस्पिटल-मधून घरी आलो. नंतर सर्व सांधे सुजले. उठावयास बसावयास दुसऱ्या माणसांची मदत घ्यावी लागली. वरील चार मोठे आजार ऐकून अधिक घाब-रून गेलो होतो.

मुंबईला जाऊन ऑपेराहाऊसचे डॉ. एस्. एल. बाळसे यांना प्रकृती दाख-विण्याचे ठरविले. मुंबईला जाण्याचे आदलेच दिवशी रात्री श्री साईबाबा माझ्या स्वप्नात येऊन माझ्या पलंगावर बसले माझ्या अंगावरून हात फिरवून म्हणाले "तू घाबरू नकोस तू अर्धा बरा झाला आहेस" सकाळी थोडे हलके झाल्यासारखे वाटले चार माणसांनी उचलून मला टॅक्सीमध्ये ठेवले. घरातून पत्नी मुलांची रडारड होती. माझ्या डोळ्यातून देखील अश्रू येत होते.

आता आपण काही परत येत नाहीं असे वाटत होते. फक्त बाबांचा आधार त्यांच्यावर श्रद्धा ठेऊन पण खिन्न मनाने मुंबईला पोहोचलो. "जेथे जातो तेथे तू माझा सांगाती".

डॉ. बाळसेंच्या कन्सल्टिंग रूममध्ये एक्झामिनेशन टेबलवर मला झोपवले. डॉ. तपासत असताना भिंतीला लावलेल्या आशिर्वाद फोटोमधून साईबाबा आशिर्वाद देताना दिसले. मी तुझ्याबरोबर आहे घाबरू नको असे दर्शवित असल्याचा भास झाला. पूर्ण चांगला होऊन घरी जाईन असे वाटले. तपासून सर्व टेस्ट घेऊन झालेवर डॉ. नी सांगितले तुम्हांला किडणी, स्टोन, हार्टट्रबल डायाबिटिस या पैकी काहीच नमून फक्त संधिवात (न्हूमॅटिक आर्थरायटिस आहे. हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावे लागेल. त्यांच्या सल्ल्याने भायखळा येथील मसिना हॉस्पिटलमध्ये स्पेशल रूममध्ये ॲडमिट झालो.

जवळ असलेला साईबाबांचा फोटो मित्राला समोरच्या भिंतीला लावण्यास सांगितले. तो चिकटवित असतांना डोंबिवलीच्या साईभक्त सिस्टर तेथे आल्या. त्यांनी स्टिकर लावून तो फोटो भिंतीला चिकटवून दिला व सांगितले "घाबरू नका बाबा तुमच्या बरोबर आहेत" तुम्ही लवकर बरे व्हाल" दुसऱ्या दिवशी त्या सिस्टरनी शिर्डीहून आलेली साईबाबांची उदी पुडी बांधून आणून दिली व सांगितले. कालच शिर्डीहून बाबांनी तुमच्यासाठी पाठवून दिली. या प्रसंगी श्री साईसच्चरितमध्ये वर्णन केलेल्या श्री नानासाहेब चांदोरकर यांच्या घरी बाबांनी पाठविलेल्या उदीची आठवण झाली.

हॉस्पिटलमध्ये मी चौथ्या दिवशी स्वतःच्या पायावर उभा राहू शकलो. २०–२२ दिवसांनी पूर्ण बरा झालो. ही केवळ साईकृपा.

मी राजकीय पक्षाचा कार्यकर्ता असल्याने हॉस्पिटलमध्ये भेटायला येणारांची खूपच वर्दळ असायची. हॉस्पिटलमधून घरी जाणेसाठी जिल्हा कार्यालयाने गाडीची व्यवस्था केली. एकदा स्वप्नात, दोनवेळा फोटोच्या रूपाने व एकवेळ उदी अंगाऱ्याच्या रूपाने बाबांनी मला दर्शन दिले व रोगमुक्त केले.

**"कृतांताच्या दाढेतून काढीन मी निज भक्ता ओढून"**

# ही तर श्री बाबांची करणी

–सौ. उषा श्रीकांत चितांबर.
५१४७ वडवे वाडा,
ब्राम्हणगल्ली, माळीवाडा,
अहमदनगर – ४१४ ००१

० माझे सासूबाईंचे वय साधारण सत्तरीचे जवळपास असेल. त्यांचे किडणीचे ऑपरेशन या वयात करावे किंवा नाहीं असे सर्वांचे मनातील नाना शंकांनी बऱ्याच वेळा लांवणीवर पडत गेले. परंतु त्यांचा आजार एवढ्यात जास्तीच बळावल्याने दि. १–६–८४ रोजी ऑपरेशन करण्याचे निश्चित झाले. व ते व्यवस्थित पार पडले सुद्धा. परंतु हे कसे काय? तर ही सर्व बाबांचीच करणी.

मी रोज सकाळी ६ ते ७ चे वेळात त्यांना दवाखान्यात चहा घेऊन जात असे परंतु त्या अगोदर नित्य नियमाने देवपूजा बाबांची पोथी, आरती करून बाबांची उदी लावून जात असे.

आमचे घराण्यावर श्री बाबांची कृपा आहे व आमची श्री. बाबांवर मोठी श्रद्धा आहे. रोज सकाळी घराबाहेर पडण्यापूर्वी बाबांची उदी लावल्या खेरीज कोणीच बाहेर जात नाहीं. याच नित्य नियमाने मी दवाखान्यात चहा घेऊन जात असे व मनांत सासूबाईंची तब्येत ठीक ठणठणीत होऊ दे अशी मनोभावे श्री बाबांना प्रार्थना करीत असे. खरोखरीच श्री बाबांनी ते माझे गाऱ्हाणे ऐकले व सासूबाईंची तब्येत ऑपरेशन व्यवस्थित पार पडून ठीक झाली व सर्वांच्या मनातील भिती बाबांनी दूर केली.

श्री बाबांची आमचेवर असणारी कृपाच कारणीभूत आहे यात शंकाच नाहीं. कठीण प्रसंग मग तो कोणताही असो श्री बाबा लगेच धावून येतात. व भक्तावर असणारे संकट दूर करतात. मग हीच तर श्री बाबांची करणी आहे हे म्हणणे सार्थच नाहीं का!

★

# तुझेच साई सगळे करणे

–सौ. वर्षा विजय हजारे.
सी।६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली पूर्व, मुंबई ४०० ०६६

० मे महिन्याची तीन तारीख होती ती. वार आपल्या बाबांचा गुरुवार! नवापूरचे 'साईसंमेलन' जवळ आले होते. त्या आधीचा गुरुवार म्हणजे साधारण. मे महिन्याची सुरवात. मध्यंतरी काही कारणास्तव गुरुवारच्या उपासात खंड पडलेला. म्हणून आधीच निराश झालेल्या आमच्या ह्यांनी विजयने पुन्हा 'गुरुवार' चालू केले. तो 'तो' दिवस! पुनश्च 'बाबा' आपल्या पाठीशी उभे आहेत, प्रचिती देताहेत फक्त आपण ती जाणत नाही, उमजत नाही, हे त्या दिवशी पुन्हा एकदा सिद्ध झाले कसे ते पहा . . .

नेहमीप्रमाणे ऑफिस सुटल्यावर विजयने मला गाठले. बॉम्बे सेंट्रलवरून आम्ही उलटे चर्चगेटला गेलो. विजयच्या इच्छेप्रमाणे थोडावेळ नरीमन पॉईंटला समुद्राच्या कठड्यावर बसून इकडच्या तिकडच्या गप्पा मारून बोरीवलीला घरी येण्यासाठी चर्चगेटला विरार लोकल पकडली. पुरुषांच्या डब्यात गर्दी असते म्हणून विजयने त्याची बॅग माझ्याकडे दिली. आमच्या लेडीज 'फर्स्ट क्लास'च्या डब्यात तशी म्हणण्यासारखी गर्दी नव्हती. मी पर्समधून कादंबरी काढून वाचनात मग्न झाले. विजयची बॅग वर 'लगेज कॅरीअर'वर ठेवली होती. जेव्हां 'बोरीवली' स्टेशन आले तेव्हा इतर बायकांच्या बोलण्यामुळे माझी वाचनाची एकाग्रता भंग पावली. मी माझी 'पर्स' सांभाळत खाली उतरले. बाजूच्या डब्यातून विजय उतरला. तो त्याच्या ऑफीसमधल्या त्याच्या मित्राशी गप्पा मारीतच. मला पाहताच तो त्याच्या मित्राबद्दलच काहीं तरी सांगू लागला. नंतर अचानक त्याला आपल्या 'पास'ची आठवण झाली. की काय कुणास ठाऊक पण त्याने मला न्याहाळतच ओरडून विचारलं. 'माझी बॅग मला जगायला नको". तेव्हां मला एकदम आठवण झाली की, मी ती वर 'लगेज कॅरिअरवर ठेवली होती ती तेथेच विसरले आम्ही दोघांनी गाडीकडे धाव घेतली पण गाडीने स्पीड घेतला होता. विजयलाही ती पकडता आली नाही. आम्ही दोघही एकदम धामाधूम झालो होतो. माझ्या हातून अशी वस्तु

वगैरे कधीच विसरली गेली नव्हती. कुठे आत्तापर्यंतच्या आयुष्यात पहिल्यांदाच हा विसरभोळेपणा घडला होता हातून म्हणून मला खूपच लागले होते. मी मनोमन बाबांना विनविले की "बॅग मिळू द्या परत म्हणून!" तर विजय बाबांना मनातून साकडे घालून बसला "बाबा बॅग मिळाली नाहीं तर मी समजेन जगात माझे कुणी नाहीं ... कदाचित घर सोडूनही जाईन वगैरे वगैरे .. कारण ... अर्थात मला त्याक्षणी त्यात काय आहे तो काय बोल-तोय त्याचे काहींच आकलन झाले नव्हते..

ताबडतोब आम्ही बोरीवली स्टेशनच्या कंट्रोल रूममध्ये धाव घेतली. स्टेशन मास्तरला विनवून दहिसर, भाईंदर, वसई, विरार येथे फोन फिरवून नुकत्याच येत असलेल्या' विरार लोकलमध्ये आऊन कलरची बॅग राहिली गेली आहे असे कळविले. बाबांवर पूर्ण भरवसा ठेवून त्या नंतरच्या विरारने आम्ही दोघही बोरीवलीच्या पुढे 'विरार'ला निघालो. गाडीत मला माझी नहमीची 'ट्रेन मैत्रिण' 'मिसेस लाला' भेटली. तिने अर्थात मला विचारल्यावर मी तिला 'बॅग' विषयी सांगितले. नेहमी त्या किंवा त्या दरम्यानच्या 'विरार' ने जाणारी ती असल्यामुळे तिला ठराविक चेहरे माहित होते. तिने मला दिलासा दिला. तिच्यासांगण्याप्रमाणे मी 'वसई' स्टेशनला उतरले तर विजय पुढे विरारला चौकशी करण्यास गेला. मी मिसेस लालाबरोबर तिच्या एका मैत्रीणिकडे वसईला गेले. पण निराशा झाली. वसई स्टेशन मास्तरला बोरीवली-वरून फोन मिळाला होता पण बॅग बद्दल काहींच कळले नव्हते. तसेच आम्ही दोघीजणी पुढ नालासोपारा स्टेशनला गेलो. तेथेही नन्नाचा पाढा मी बाबांना खूप विनविले. रडवेली झाले होते मी त्यावेळी. मिसेस लालानीं मला धीर दिला. आणि सोपार ला तिच्या मैत्रीणीकडे नेले. तिथे मात्र बाबांनी मला आशिर्वाद दिला तो त्यांच्या फोटोच्या रूपाने दर्शन देवून आणि नाला-सोपाऱ्याला स्टेशनजवळ राहणाऱ्या मत्रीणीच्या तोंडून 'बॅग सापडलीय' पण ती विरारला राहणाऱ्या एका मुलीने घरी नेलीय" असे सांगूनच! माझा अर्धा जीव भांड्यात पडला. कारण मत्रिणीच्या तोंडून त्या मुलीचे' वर्णन ऐकून लालाला ती मुलगी नेहमी सकाळी ठराविक गाडीने जाते ते आठवले. तसेच आम्ही वसई स्टेशनला परतलो. सोपारा–वसई स्टेशनवर विजयसाठी अनाऊंसमेंट करून जाणाऱ्या गाडीतून त्याला थांबविण्याचा प्रयत्न केला. विरारला स्टेशनमास्तर-कडून नकार मिळाल्यामुळे विजय खूपच निराश झाला होता. थकलाही होता. मी वसईला उतरल्यामुळे येताना त्यांनी दरवाजातून माझा शोध घेतला. आम्ही

उभयता परतलो तेव्हां बॅग सुखरूप आहे हे कळले होते. बाबांनी अर्धी का होईना पण प्रार्थना ऐकली होती ... दुसऱ्या दिवशी मी लवकरच घरून निघाले विरारहून येणाऱ्या दोन एक गाड्या लालासह पाहिल्या. तिसऱ्या गाडीत ती मुलगी मिळाली. तिने बॅग बद्दल सांगितले. ती म्हणजे वैजयंती माला आणि तिचा भाऊ राजू. हे साईभक्त' निघाले हे विशेष. बॅगमध्ये त्यांना विजयची कागदपत्रे, पाकीट–पैसे, बाबांचे फोटो विशेष म्हणजे नवापूर संमेलनाचे वर्गणी गोळा केलेले पावती पुस्तक होते. ते महत्वाचे त्यामुळेच विजय अतिशय अस्वस्थ झाला होता – ते सारे मिळाले होते. विजयच्या कार्डावरून ती बहिणभावंड दुसऱ्या दिवशी त्याला किंवा मला फोन करणार होती. मुख्य म्हणजे मालाच्या भावाचा – राजूचा – त्याची स्वतःची मौल्यवान कागदपत्रे व हजारो रुपये (कॅश) असलेली बॅग अशीच गाडीत विसरून हरवल्याचा कटू अनुभव होताच. त्याबाबतीत तो आणि विजय हे दोघेही 'सहप्रवासी' साईबंधू ठरले. मालाच्या सांगण्याप्रमाणे मी त्यांच्या ग्रँटरोडच्या वर्कशॉपमध्ये गेले. राजूने माझेही एका भावाप्रमाणे – दिराप्रमाणे स्वागत केले. बॅग सुखरूप आहे काळजी नको भाभी – "भाईसाहबको कल भेजना" असे सांगून मला चहापाणी देऊन निरोप दिला. शनिवारी विजया राजूला भेटला. बॅग मिळाली. त्यातल्या लहानसहान वस्तूसह सुद्धा पैशाच्या १० पैशाच्या नाण्यासह! त्याहून अधिक म्हणजे माला आणि राजू सारखे सिंधी अनोळखी साईभगिनीबंधू मिळाले. अगदी पुण्यपुण्याई फळाला यावी तसे, त्याच साई-पंथातले, माणुसकीचे आणि माणसांचे भुकेले असे. स्नेहासाठी मत्रीसाठी प्रेमासाठी हपापलेले! त्यांनी बक्षिस वगैरे घेण्याएवजी विजयलाच संमेलनासाठी २१ रुपयाची पावती फाडून सहाय्य केले. स्वतःहून – स्वखुषीने! बाबांची लीला अतर्क्य म्हणतात तेच खरे. नाहीतर बॅग विसरली जावी काय? मालानी ती घरी न्यावी काय? राजूला दाखवावी काय आणि त्यायोगे त्यांचे आमचे अचानक ह्रदसंबंध जुळावेत ते काय ... म्हणूनच विजयच्या शब्दात माझ्या मनातले म्हणणे प्रांजळपणे कबूल करायचे त्या साईराया' पुढे तर ...

**"तुझेच साई सगळे करणे, घडणारे जे ते ते घडणे**
**उचित अथवा वाईट बरवे, तुलाच सारे सारे ठावे"**

⁂

# दैवी चमत्कार

—श्री· पंढरीनाथ वा· परब.
रुषभ नगर, ९० क्रॉस रोड,
मुलुंड (पूर्व), मुंबई नं. ८१.

० श्री. साईबाबा व शिरडी या विषयी आम्ही बरेच ऐकून होतो. परंतु परिस्थितीमुळे म्हणा किंवा इतरही काहीं कारणांमुळे म्हणा आम्हांला शिरडीला जाण्याचा योगच येत नव्हता. माझे मित्र श्री. गांगुर्डे हे तसे साईभक्त व त्यांच्या आग्रहामुळे किंवा योग जुळून आल्यामुळ मी त्यांच्या बरोबर प्रथम शिरडीला गेलो, त्याला जवळ जवळ १५ वर्षे झालीत. त्यानंतर आम्ही मुलां-सह एकदा शिरडीस जाऊन आलो व त्यानंतर इच्छा असूनही शिरडीस जाणे होतच नव्हते. पण घरी बाबांचे पुजापाठ सतत चालूच असे व बाबांच्या कृपेने तसे आमचे ठीक चालले आहे.

प्रपंचात काही वाईट गोष्टी घडत असतात. परंतु त्यामुळे काहीं चांगल्या गोष्टीही योगायोगाने घडून येतात त्याचीच ही कथा.

१९८३ च्या मे महिन्यात माझ्या धाकट्या मेव्हण्याचे म्हणजेच पत्नीच्या धाकट्या भावाचे बडोद्याला आकस्मिक निधन झाले. अर्थात त्याचे आमच्याकडे नेहमी येणे जाण चालू असे व बहुतेक प्रत्येक दिवाळीत तो मुंबईस भाऊ-बिजेच्या निमित्ताने येत असे. त्यामुळे मुलांचे व माझ्या पत्नीचे त्यांच्यावर प्रेम होते तसेच त्याचे पण आमच्यावर फारच प्रेम होते. आम्ही सर्वजण दुःखा-तच असल्याने आम्ही या वर्षी दिवाळीत घरी न रहाता शिर्डीस जायचे ठरविले कारण दिवाळीत कोणी ना कोणी तरी येतच रहाणार व दुःखास उजाळा मिळणार त्यापेक्षा बाबांच्या दर्शनास गेलेले बरे व म्हणून आम्ही सर्वजण तसेच पत्नीचा मोठा भाऊ त्याची मुले व बायको तसेच लहान भावाची पत्नी व मुले अशी सर्व आम्ही शिरडीस गाडी करून दिनांक ६–११–८३ ला निघालो. साईबाबांचे दर्शन आरती व पूजा वगैरे सर्व झाल्यावर आम्ही इतरही काहीं तीर्थक्षेत्रे करून तिसऱ्या दिवशी म्हणजे ९–११–८३ रोजी रविवारी मुंबईस येण्यास निघालो. कारण आमचे मेव्हण व मुलांना रविवारीच ९–११–

८३ ला रात्री बडोद्यास निघायचे होते. कारण सोमवारी १०–११–८३ ला त्यांच्या एका मुलाचा पेपर होता व बडोद्यास पोहचणे जरूरीचे होते.

आम्ही खंडाळा घाटात साधारण ७ च्या दरम्यान आलो व आमची गाडी बिघडली व ती काहीं केल्या चालू होईना. आम्ही फारच काळजीत पडलो. सभोवताली दाट अंधार व खाली आल्याशिवाय गाडी दुरुस्तीचे एकही गॅरेज नाहीं. शिवाय बडोदा कंपनी १० वाजता बॉम्बे सेंट्रलला पोहचणे फारच आवश्यक होते. अन्यथा ती मंडळी बडोद्यास पोहचू शकत नव्हती व मुलाचा पेपर चुकला असता व वर्ष फुकट गेले असते. एवढ्यात एक गाडी अचानक आमच्यासमोर येऊन उभी राहिली व गाडीच्या मालकाने काय झाले असे विचारून काही मदत करू काय असा प्रश्न केला. त्यांनी वरील परिस्थिती समजावून सांगितल्यावर त्याने बडोद्याच्या माणसांना आपण मुंबईस घेऊन जाण्याची तयारी दर्शविली व घेऊनही गेले व त्याप्रमाणे ती माणसे योग्यवेळी मुंबईस पोहचून बडोद्यास रवाना झाली.

नंतर मी व माझे कुटुंबिय व ड्रायव्हर वगैरे गाडी कशी चालू होईल याच विचारात काळोखात उभे होतो. घनदाट जंगल, सभोवताली काळोख, गाडी चालू होण्याचेही चिन्ह दिसत नव्हते. अशा परिस्थितीत आम्ही साईबाबांवर विश्वास ठेवून उभे होतो. एवढ्यात वरून एक दिवा लुकलुकत येताना दिसला व समोर एक स्कूटर येऊन उभी राहिली. त्यावर २४–२५ वर्षांची दोन मुले होती. त्यांनी हिंदीत मला विचारले की, गाडीला काय झाले आहे व आम्ही आपणास मदत करावी काय, कारण आम्ही मेकॅनिक आहोत. दुसरा मार्गच नसल्याने आम्ही त्यास मदतीची विनंती केली व त्यांच्यावर नजर ठेवून काय करतात ते बघत बसलो. एव्हढ्यात त्यांनी गिअरबॉक्सला नुसता हात लावला व म्हणाले गाडी ठीक झाली आत बसा व चालू करा. आमचा ड्रायव्हर म्हणाला की, आम्ही पानावगैरे घेऊन गाडी ठीक केली तरी गाडी चालू होत नव्हती व तुम्ही नुसता हात लावून गाडी नीट कशी काय होईल त्यावर त्यांनी सांगितले की गाडीस मुंबईपर्यंत काहीं होणार नाहीं. तुम्ही बसा व गाडी चालू करा काय झाले तर आम्ही तुमच्या पाठोपाठ स्कूटर वरून येत आहोत. आम्ही भितभीतच गाडीत बसलो पण खरोखरच गाडी नीट चालत होती. स्कूटरवालेपण आमच्या पाठोपाठ खाली येत असल्याचे सर्वांनी पाहिले

पण थोड्याचवेळात ते अदृष्य झाले. गाडी मात्र नीट पायथ्याशी येऊन सरळ मार्गाला लागली. पण त्या स्कूटरवाल्यांचा पत्ता नव्हता. आम्हांला वाटले ते मोबदला घेण्यासाठी जरूर येतील पण बराच वेळ गेला तरी ते आले नाहींत. एवढ्यात तीच स्कूटर अचानक आमच्यासमोर भरवेगात आली व ती साईबाबांच्या आशिर्वादासारखा हात दाखवित भर वेगात निघून गेली व पुन्हां अदृश्य झाली. त्यानंतर आमची गाडी नीट चालत मुंबईस रात्री ११.३० च्या दरम्यान आम्हांस घेऊन आली.

यावरून नंतर आम्हां सर्वांचीच खात्री झाली की हा चमत्कार फक्त साईबाबाच करू शकतात व त्यांनीच आम्हांला येऊन मदत केली व आमची काळजी घेतली.

पूर्वी आम्ही साईचरित्रात असे प्रकार वाचत होतो किंवा लोकांच्या तोंडून ऐकत होतो पण इथेतर प्रत्यक्ष आम्हांलाच असा सुखद अनुभव आला व आम्ही मुलाबाळांसहित सर्व भारावून गेलो.

हा अनुभव मी माझ्या मित्रपरिवार व साईभक्तांस कथन केला व त्यांचे पण मत असेच पडले कि प्रत्यक्ष श्री. साईबाबाच प्रसन्न होऊन मदत करून गेले. श्रद्धा व भक्ति असल्यास कोणताही श्री साईबाबा टाकणार नाहीत हें आपण लाखो भक्तांच्या तोंडून एकत आलो आहोत त्याची ही प्रचितीच होय.

# साईबाबांनी मला टीव्ही दिला

—लीलाताई शं. गोलतकर.
ताईचे साईबाबा मंदिर,
परेल व्हीलेज, मुंबई. १२.

० वरील मजकूराचे शिर्षक वाचून बंधु—भगिनींना आश्चर्य वाटेल. पण खरच सत्य घटना सांगते. बाबांनी म्हटलच आहे की, मागे जे जे त्यास ते ते लाभे" त्याप्रमाणे बाबांकडे माझं मागणं होतं की, मला टी. व्ही. द्या. मला काही हवं झालं की मी बाबांकड मागत असते, आणि काहीं वेळा न मागताच बाबा मला देत असतात. असं आमचं बहिण भावाचं नातं आहे ...

एक साईभक्त मुलगा शिर्डीला जाण्यासाठी म्हणून माझ्या इथे साईबाबांच दर्शन घेण्यास आला. मला म्हणाला ताई, मी उद्या ना शिर्डीला जातोय, मी म्हणाले, वा फारच छान बाबांना माझा नमस्कार सांग आणि त्यांना म्हणावं २३ तारखेला मंगळवारी नारळीपौर्णिमा आहे तेव्हा रक्षाबंधनाला या ... आणि येतेवेळी माझ्यासाठी टी. व्ही. आणा. माझा निरोप ऐकुन त्याला आश्चर्य वाटलं, तो पहातच राहिला. माझ्याकडे बघत विचारात पडला. पण मीच त्याला हसून म्हणाले अरे, सांग तर खरं मग बघ! आणि तो निघून गेला

मंगळवार २३ तारीख, रक्षाबंधन आज बाबा येणार म्हणून लवकरच उठले, कारण पूजा वगैरे आटपायची होती. ९ वाजता सकाळी पूजा झाली. आणि बाबांना राखी बांधणार तेवढ्यात बॅकेमधले माझे भाऊ माझ्याकडे राखी बांधून घ्यायला आले. त्यांना बसा म्हटलं आणि माझ्या बाबांना राखी वगैरे बांधली, आणि त्यांच्याकडे राखी बांधायला वळले तोच त्यांनी आपल्या मुलीबद्दल विषय काढला ताई, ——— माझं लग्न जमल ना की मी टी. व्ही. साठी पैसे काढीन. आम्हांला मिळतात पैसे, मी बाबांकडं पाहिलं. मला हसू आलं. बाबांनी मला अशा तऱ्हेनं सांगण केलं ... मला आनंद वाटला. बाबांचं बोलणच मुळी असं असायच की, दुसऱ्याला बोलायचे पण ते आपल्यालाच असायच ... काही दिवसांनी एक साईभक्त श्री. रामदास कुलकर्णी माझ्याकडे साईबाबांच्या दर्शनाला आले, मला म्हणाले ताई, माझा संकल्प

पुरा झाला की, मी तुम्हांला टी. व्ही. देईन बाबांचीच लीला होती ती, बाबांनी मला पुन्हा एकदा सांगितलं.

आणि १३ एप्रिल १९८४ सोमवारी, कुलकर्णी यांचा संकल्प पुरा झाला. ते माझ्याकडे सकाळी ९ वाजता आले टी. व्ही. ची रक्कम बाबांच्या पुढ्यात ठेवली आणि क्षणाचाही विलंब न लागता साई व्रताची पोथी बाबांच्या फोटो-सहित तसेच भालचंद्र मासिक नाशिकवरून त्यावर राम, सीता, लक्ष्मण, फोटो-सहित, पोस्टमन घऊन आला. लगेच एक मुलगा लग्नपत्रिका त्यावर गणपतीचा फोटो घेऊन आला. हे एवढ सर्व पाहिल्यानंतर मला गहिवरून आलं. बहिणीसाठी केवढा हा खटाटोप पुराव्यासहित ... पहिल्या प्रथम आपण आले पोथीच्या रूपाने रत्नागिरीवरून. दुसरं म्हणजे रामरूपात. "प्राण जाय पण वचन न जाय" तिसरं म्हणजे लग्न जुळल्यावर पैसे मिळतील म्हणजे लग्नपत्रिका आली एवढी सर्व लीला आपल्या बहिणीसाठी त्यांनी केली केवढ त्यांचं प्रेम आपल्या बहिणी वर ...

आणि नंतर गुरुवारी तारीख १९ एप्रिल रोजी सायंकाळी ७ च्या सुमारास साईभक्त श्री. अर्जुन पाटकर यांच्या पसंतीने बाबांनी टी. व्ही. दिला. मग केवढा आनंद वाटला असेल ह्याची आपणच कल्पना करावी ...

आणि तो टी. व्ही. सुद्धा अशारीतीने ठेवला की, माझ्या साईबाबांना तो समोरून पहाता यावा. कारण बाबासुद्धा शिर्डीत असतेवेळी द्वारकामाईत बसून कठड्यावर हात ठेवून कौतुकाने हसत खेळ पहात असायचे. तसेच ते आज माझ्याकडे पहात आहेत आणि ते पहात असतांना त्यांच्या चेहऱ्यावरचे हावभाव लगेच जाणवतात आनंद होतो त्यांना ...

त्यांनी म्हटलंच आहे मुळी –

**नित्य मी जीवंत जाणा हेचि सत्य ।**
**नित्य घ्या प्रचित अनुभवे**
**माझा जो जहाला काया, वाचा मनी**
**तयाचा मी ऋणी सर्वकाळ ॥**

※ ★ ※

# पतींची प्रकृती सुधारली

—सौ. सिंधु फडणीस.
खासगी गोठ, लष्कर ग्वालियर.

० मला जेव्हा प्रेरणा झाली, तेव्हां मी पण "श्री साईलीला" मागवू लागले. फेब्रुवारी १९८४ पासून आमच्याकडे "श्री साईलीला" येऊ लागले, आणि तेव्हां पासून मी मनापासून त्यातले अनुभव वाचू लागले. जेव्हां जेव्हां मी ते अनुभव वाचू लागले तेव्हां तेव्हां मलाही वाटू लागले की आपणही लिहावे पण कसे लिहावें हेच कळत नव्हते शेवटी गुरुवार २५–७–८४ ला सकाळी श्री साईचरित्र वाचतांना विचार केला आणि साईबाबांस प्रार्थना करून लिहिण्यास बसले.

मे चा महिना होता आमच्या शाळेच्या सुट्या सुरू झाल्या. आमच्या येथे माझ्या पतीला खाजेमुळे बरे नव्हते. वाढता वाढता खाज फारच वाढून गेली इतकी की तिचे रूपांतर एक्झीमावर गेले. त्यामुळे भयंकर त्रास झाला. दिनांक १०–५–८४ ला त्यांची प्रकृती जास्त झाली आणि त्यांना हॉस्पिटलमध्ये ११–५–८४ ला सकाळी ११ वाजता भर्ती करण्यात आले. त्या दोन दिवसात रात्रंदिवस माझा श्री साई समर्थ हा जप चालू होता, रात्री झोप तर नव्हतीच पण रात्रीसुद्धा सारखा मनात जप चालू होता. माझ्यावर जेव्हां काहीं संकटे येतात तेव्हां मी श्री साई समर्थ हाच जप चालू ठेवते त्यामुळे त्यांच्या (श्री साईंच्या) कृपेने संकटे दूर होतात, हॉस्पिटलमध्ये जातांना "त्यांना" श्री साईंची उदी लावली आणि प्रार्थना केली की लौकर बरे वाटून घरी येऊ दे मी साईबाबांच्या फोटोला नमस्कार करून आम्ही हॉस्पिटलमध्ये गेलो आणि बाबांच्या कृपेने काहीं त्रास न होता लवकरच त्यांना भर्ती करून त्यांचेवर उपचार सुरू झाले. तेथे त्यांना तीन दिवसात पुष्कळच फरक पडला व हळू हळू प्रकृती सुधारत गेली व ते बावीस दिवसात घरी परत आले. हॉस्पिटलमध्ये असताना मी म्हटले होते की बाबा हे चांगले बरे होऊन घरी आले की मी तुमचे ५३ अध्यायांचे" श्री साईसच्चरित्राचे एक पारायण करेन. आता बाबांच्या कृपेने माझ्या पतीची प्रकृती पूर्णतः चांगली आहे. ते घरी आल्यावर मी काहीं दिवसांनी श्री साई चरित्र वाचावयास सुरूवात केली. मीही एकदा अशीच आजारी झाले होते पण बाबांचे "श्री साईचरित्र" वाचून व उदीमुळे मला बरे वाटले.

अशीच बाबांची कृपा आम्हांवर राहो हीच श्री साईबाबांच्या चरणाशी प्रार्थना करते.

# श्री साईबाबांची प्रचिती

—सौ. वसुंधरा रामराव चोरे.
८०३ सी, लक्ष्मी भुवन,
डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई १४.

० काही दिवसापूर्वी माझ्या यजमानांचे मित्र आपल्या पत्नीसह आमचेकडे आले असतांना त्यांनी आम्हाला श्री साईबाबांच्या प्रचितीचा जो अनुभव सांगितला तो मी त्यांच्याच शब्दात सांगत आहे. आमचे हे मित्र अत्यंत साईभक्त असून एकदा मित्र व त्यांच्या कुटुंबातील इतर मंडळी शिर्डीस गेले असतांना बाबांचे दर्शन, आरती, प्रसाद वगैरे घेऊन साधारण संध्याकाळच्या सुमारास मुंबईस यण्याकरिता निघाले. मध्यरात्रीची वेळ आणि त्यात अमावास्येची रात्र असतांना मधेच एकाएकी त्यांची गाडी बंद पडली. रस्त्यात अत्यंत शुकशुकाट व चिटपाखरू सुद्धा दिसत नव्हते. अशावेळी बायका मुले बरोबर असल्यामुळे आता पुढे काय करावे असा प्रश्न त्यांचे पुढे उभा राहिला. आजूबाजूला कुठेच मोटर दुरुस्तीचे ग्यॅरेज अथवा निवाऱ्याची जागा त्यांना दिसेना. अशा संकटात ते असतांना अचानकपणे एक सद्‌गृहस्थ त्यांचे जवळ आला व मी आपल्याला काही मदत करू शकतो का असे त्याने विचारताच मनातील शंकेची पाल झटकून व बाबांवर पूर्ण विश्वास ठेवून त्यांनी आपली अडचण त्या गृहस्थापुढे कथन केली. त्यांचे सर्व बोलणे ऐकून घेतल्यावर आपण काही काळजी करू नका इथे जवळच काहीं अंतरावर डाक बंगला आहे. तिथे तुम्ही आपले कुटुंब ठेवा व त्यांच्या सोबत कुणीतरी एक पुरुष राहू दे व एकजण माझ्याबरोबर गाडी घेऊन ग्यॅरेजवर चला असे सांगितले. त्याच्या सांगण्यावरून कुटुंबातील इतर मंडळींना डाक बंगल्यावर ठेवून मित्र गाडी घेऊन त्या गृहस्थाबरोबर ग्यॅरिजवर गेले व गाडी दुरुस्त करून परत त्याच गृहस्थाबरोबर डाक बंगल्यावर आले. लगेच मुंबईला निघण्याची तयारी करून व त्या गृहस्थाचे अत्यंत मनापासून आभार मानून तसेच त्याच्या गिरगावातील रहात्या घराचा पूर्ण नाव पत्ता घेऊन. परत लौकरच मुंबईला भेटण्याचे आश्वासन देऊन व परत परत त्याचे आभार मानून परतीच्या प्रवासास लागले. पण मागे वळून पहातात तर काय तो गृहस्थ दिसेनासा झाला. कदाचित काळोखामुळे तो आपल्याला दिसला नसेल अशी त्यांनी मनाची समजूत करून घेतली

पुढे लौकरच असा योग घडून आला कि काही कामा निमित्त मित्र गिरगावात गेले असतांना शिर्डीच्या वाटेवर ज्यांनी आपल्याला मदत केली त्या गृहस्थाला पुन्हां भेटण्याची तीव्र इच्छा मित्राच्या मनात आली व त्यांनीं दिलेला पत्ता लगेच शोधून काढला. परंतु आश्चर्याची गोष्ट म्हणजे तिथे आजूबाजूला बरीच चौकशी केल्यावर असे समजले की घराचा पत्ता व नंबर अगदी बरोबर आहे. परंतु त्या गृहस्थानी जे स्वतःचे नाव दिले होते अशा नावाची कुणी व्यक्ती तिथे रहात नाहीं असे चौकशीअंती समजले. मग मात्र मित्राच्या मनाची चलबिचल झाली व चटकन लक्षात आले की तो गृहस्थ दुसरा तिसरा कुणी नसून ते स्वतः साईबाबाच होते व त्यांनी मनुष्याच्या रूपाने आपल्याला मदत केली व प्रत्यक्ष दर्शन दिल्याची खात्री झाली. त्याचवेळी चटकन त्यांना बाबांचे बोल आठवले **जो जो मजसी जैसा जैसा भजे । तैसा तैसा मीही त्यासी पावे ।** हे बाबांचे तत्व मित्राच्या बाबतीत अगदी तंतोतंत खरे ठरले.

## साई निकेतन मधील विजयादशमी

श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या दादर येथील कार्यालयात श्री साईबाबांचा ६६ वा पुण्यतिथी महोत्सव दि. ४–१०–८४ रोजी थाटात साजरा झाला. यंदा दसरा व पुण्यतिथी गुरुवारीच आल्यामुळे उत्सवास भक्तांची भरपूर गर्दी झाली होती. दुपारी १२ वा. श्री बाबांची आरती झाली त्यावेळी शेकडो भक्त मंडळी हजर होती. आरती नंतर प्रसाद वाटपही झाले. या उत्सवात आरतीपूर्वी श्री. विजय हजारे संपादित 'साईप्रसाद' या दीपावली वार्षिक अंकाचे प्रकाशन श्रीसाईलीला इंग्रजी आवृत्तीचे संपादक डॉ. श्री. दि. परचुरे यांनी केले. सौ. वर्षा हजारे यांनी उपस्थितांचे स्वागत केले; तर साईभक्त श्री. प्रभाकर कोळणकर यांनी सर्वांचे आभार मानले. श्री. हजारे गेली चार वर्षे हा वार्षिक अंक प्रकाशित करीत आहेत. या समारंभ प्रसंगी श्री. दत्ताराम बारस्कर उपसंपादक 'दैनिक नवाकाळ' व श्री. सुधाकर सामंत संपादक 'भक्तिसंगम' हे पण हजर होते.

# मुलगा घरी आला

—श्री. महादेव भिवा सुर्वे.
५।११२१ म्यु' कॉलनी, मार्वे रोड,
मालाड (प.) मुंबई नं. ९५

० मी एक सामान्य माणसाप्रमाणे अदृश्य शक्तिवर विश्वास ठेवणारा माणूस, नेहमीच ईश्वराचे स्मरण ध्यानात बाळगून होईल तेवढे चांगले कर्म करतो. सद्‌गुरु साईनाथांवरील माझी श्रद्धा गेल्या तीन वर्षात वाढीला लागली. त्यापूर्वी ती फारच कमी किंवा नव्हतीच म्हणा. ती कशी वाढीला लागली पहा श्री साईनाथ आपल्या भक्तांना किती व कसे सहाय्य करतात याचा एक ताजा अनुभव मी खाली दिला आहे.

लहान सहान गोष्टीसाठी सद्‌गुरुंना साकड घालणं मला आवडत नाही. परंतु कधी न घडलेला एक प्रसंग माझ्या डोळ्यासमोर घेऊन घडकला. तो दिवस बुधवार दि. १३–९–८४ होता. संध्याकाळी पाच साडेपाचच्या सुमारास घरातील सर्व मंडळी आपापल्या कामावर असता घरात कुणीच नव्हते. अशा-वेळी माझा मोठा मुलगा जो आता बारावीला शिकत आहे. हा एकाएकी कुणालाहि काहीं न सांगता घरातून निघून गेला. जाताना ब्रीफकेसमध्ये आपले कपडे टॉवेल आणि घरातील पन्नास रुपये घेऊन गेला. घरात कोणीही त्याच्या मनाला लागेल असे बोललेले नव्हते. सर्व काहीं ठीक असता एकाएकी ह्या मुलाच्या डोक्यातही लहर कां यावी? मला काहींच समजेना. रात्री बारा-वाजपर्यंत परतण्याची वाट पाहिली. त्या विभागातील त्याच्या सर्व जागा पाहिल्या कुठेही दिसला नाहीं. रात्रौ पावसाने तर थैमान घातले होते. त्याही परिस्थितीत शोध केला पण व्यर्थ. माझ्या सौ. च्या मनावरील ताबा सुटला ती भडाभड रडू लागली. शेवटी किती झाले तरी ते मातृहृदय होते. तिच्या मनात आणि माझ्याही मनामध्ये बरे वाईट विचार येण्यास सुरूवात झाली. तिला धीर दिला. घरातून बाहेर न पडण्यास सांगून मी रात्री एकच्या नंतर दोन वाजपर्यंत पुन्हा शोध केला पण उपयोग झाला नाहीं. नतर मी दोन तास झोप घेतली असेन पण ही जागीच होती·

सकाळी उठल्यावर सर्व नातेवाईकांकडे शोध घेतला. तोपर्यंत संध्याकाळचे पाच वाजले होते. शोध करताना साईनाथांवर भार वाहून फिरत होतो. कुठेही शोध लागेना. तेव्हां माझ्या सदगुरुनां माझ्या मदतीला धावण्यास करुणा भाकू लागलो. तो दिवस गुरुवार होता. संकष्टी चतुर्दशीचा दिवस असल्यामुळे पत्नीचा उपवास होता. सकाळी साईचरित्राचा अध्याय वाचावयाचा राहिला होता. संध्याकाळी वाचता येईल कि नाही याची खात्री नव्हती. परंतु आमच्या शेजारी रहाणारे श्री. नाझीरकर गुरुजी (जे परमेश्वरावर नितांत श्रद्धा ठेऊन प्रपंच करतात) त्यांनी पंचाग वगैरे पाहून मला दिलासा दिला. मुलगा सुखरुप आहे. त्याच्या मनात घरी जाऊ की नको असे विचार येत आहेत. उद्यापर्यंत येईल. एवढ्या दिलाशावर मी श्री गणेशाच्या व साईनाथांच्या फोटोची पूजा करुन हार घातले. सद्गुरुंच्या कपाळी गंध लावले. गंधावर दोन पाकळ्या चिकटून राहिल्या होत्या. त्यांच्यासमोर कळकळीने विनंती केली हे सद्गुरुनाथा आपले वचन पूर्ण करा. माझ्या कुलदेवतेला जागृत करा आणि माझ्या मुलाला सुबुद्धि देऊन घरापर्यंत ओढत आणा. तुमच्या वचनाचा महिमा पटवून द्या. त्याला चोविस तासाच्या आत घरी आणा. डोळ्यात पाणी आले असता विचारले, आणणार नां? आणि त्याचक्षणी त्यांच्या गंधावरील पाकळी खाली आली. होकाराची खुणा समजली. तरीही मन साशंकित होते. त्यानंतर मी साईसच्चरित्र उघडून बाबांच्या निर्वाणाचा एक अध्याय वाचला. अकरा वचने वाचली, आणि पुन्हां बाबांची विनवणी करुन मी सर्व आवरुन बाबांच्या तसबिरीखाली खुर्चीत बसून मुलांशी बोलत बसलो आणि सुमारे साडे आठच्या सुमारास चिरंजीवांची स्वारी ब्रिफकेससह घरात आली. बाबांनी आपल्या वचनाची सत्यता पटविली आणि माझ्या डोळ्यातून कधी न येणारे अश्रू घळाघळा ओघळले. त्या स्थितीत मी मूक भाषेतच बाबांशी बोलत होतो.

हे सर्व रामायण काहीं कारण नसता घडले. मुलाने पैसे हरवले त्यामुळे हे सर्व निमित्त होते. त्याला अधिक काहीं प्रश्न विचारले नाहींत. त्यामुळे तोही समाधानी आहे. परंतु या सर्व प्रकारामुळे माझे डोळे आठवणीक्षणी पाणावतात. या अवधीमध्ये माझा बाबांवरील विश्वास जराही ढळू दिला नव्हता. त्यांच्यावरच सर्व भार ठेवून होतो. श्री साईनाथ अतर्क्य तुमची लीला, तुमचा महिमा, अतर्क्य आहे. सदगुरु साईनाथांना आणि माझ्या लाडक्या साईभक्तांना मी मनःपूर्वक वंदन करुन माझा अनुभव पूर्ण करतो.

# श्री साईनाथाय नमः


—सौ. अश्विनी अ. चौपकर.
न्यू बी. डी. चाळ नं. १०।४८.
नायगाव, मुंबई ४०० ०१४


० मी श्रीसाईबाबांची एक साधारण भक्त आहे. मला वेळोवेळी साई-माऊलीने उदार अंतःकरणाने सहाय्य केले आहे. त्यावेळी मी ते अनुभव साईचरणी पाठवलेले आहेत. पण ते प्रसिद्ध झाले नाहीत ही त्यांचीच इच्छा! तरीही हा अनुभव पाठवण्याचे धाडस मी करीत आहे. तो मान्य करणे न करणे हे साईंच्यांच हातात आहे.

माझ्या लग्नाला आता ३ रे वर्ष चालू आहे व मला पावणेदोन वर्षांचा अतुल नावाचा मुलगा आहे. त्याच्या वेळेस साईमाऊलीच माझ्या मदतीला धावून आली व तिनेच माझी निर्विघ्नपणे सुटका केली. तेव्हा साई अगदी माझ्याजवळ होते, कुठे माहित आहे? माझ्या हातातल्या हिरव्या बांगडीतील लॉकेटमध्ये. गळ्यातल्या मंगळसूत्रात ते नेहमी असत. पण बाळंतपणाच्या वेळेस मंगळसूत्र काढायला लावले. त्यामुळे मी ते बांगडीत बांधून ठेवले होते. त्यांच्या कृपेमुळे मला कसल्याच वेदना जाणवल्या नाहीत, व मुख्य म्हणजे मी बेशुद्धही झालेले नव्हते.

बाळ सव्वा महिन्याचा झाल्यानंतर मुलाचे बारसे केले. पण त्या आधी-पासून त्याला जुलाब होत होते. ते बारशा नंतरही न थांबल्यामळे आम्ही घाबरून त्याला वाडीया हॉस्पिटलमध्ये ॲडमीट केले. तेथे जाण्यापूर्वी तो सुद्धा मलूल पडला होता व त्याची सर्व हालचाल पूर्णपणे मंदावली होती. तिकडे ॲडमिट झालेल्याच वेळी मी माझ्या गळ्यातले तेच (वर उल्लेख केलेले) लॉकेट त्याच्या हातातल्या काळ्या दोऱ्यात बांधले आणि काय आश्चर्य! लगेच त्याची हालचाल सुरू झाली. तो हातपाय हलवून इकडे तिकडे बघायला लागला. थोड्या वेळानंतर डॉक्टर आले व त्याची चौकशी करू लागले. मी सांगताच ते म्हणाले, अहो तो पहा चांगला हसत खेळत आहे व तुम्ही म्हणता तो हालचाल करत नाही.

त्यानंतर ४ च दिवसात तो पूर्णपणे बरा झाला. आत्तापर्यंत त्याला किरकोळ आजार होत असत व वेळोवेळी साईंनी त्याचे रक्षण केले आहे. पण अलिकडच्याच पंधरा दिवसांपूर्वी तो खेळताना मसाला वाटण्याच्या रगड्या-वर पडला व त्याचा खालचा ओठ जखमी झाला. तो बुधवार व अमावस्येचा दिवस होता. त्या दिवसांपासून त्याला ताप यायला लागला. शनिवारपर्यंत

तसाच ताप येत जात राहिला व डॉक्टरांच्या औषधानेही जावयाचे लक्षण दिसेना. तेव्हां पुन्हां त्याला वाडीयात न्यायचे ठरले.

सोमवारी आम्ही त्याला वाडीयात नेले. त्याचे वय पावणेदोन वर्षे आहे. पण वजन मात्र फक्त ९ किलोच होते. तेव्हां डॉक्टरांनी त्याला टी. बी. च्या टेस्टचे इंजेक्शन देऊन आणण्यास सांगितले. तेव्हां हेच इंजेक्शन आम्ही आधी त्याला दिल्याचे डॉक्टरांना सांगितले. पण डॉक्टर म्हणाले, पुन्हा द्या. मग आम्ही तेथेच ते इंजेक्शन त्याला पुन्हां दिले. त्यानंतर त्याला गुरुवारी आणायला सांगितले होते. पण बुधवारीच त्याला न्यायला लागले. कारण मंगळवारी त्याला खूपच ताप आला व इंजेक्शन दिलेल्या ठिकाणी हाताला खूपच सूज आली व त्यावर बारीक घामोळ्या सारखे फोड उठले होते. मी तर फारच घाबरले. "मन चिंती ते वैरी न चिंती" मनात नाना कुशंका यायला लागल्या. म्हणून बुधवारीच त्याला परत नेले. पण डॉक्टर न भेटल्यामुळे परत आलो.

मी साईमाऊलीला हाक मारत होते. गुरुवारी नेले असता डॉक्टरांनी एक्सरे काढायला सांगितले. तेव्हां तर माझी खात्रीच झाली की त्याला काहीं-तरी झालेलेच आहे. सर्वजण मला धीर देत होते. मीही साईमाऊलीला विनवत होते. त्याचा रिपोर्ट सोमवारी मिळणार होता. मी मनातच साईंना म्हटले, अतुलचा रिपोर्ट क्लिअर येऊ दे, मी तुझ्या घरात असलेल्या मोठ्या कॅलें-डरची फरेम बनवून आणेन व गुरुवारी त्याची हार घालून पेढे वाहून पुजा करेन." हे कॅलेंडर मी मुद्दाम फरेम करण्यासाठीच विकत घेतले होते. पण ते तसेच पडून होते. असो, सोमवार उगवला, व आम्हांला त्याचा रिपोर्ट मिळाला, आणि आश्चर्य व आनंदाची गोष्ट म्हणजे तो अगदीच क्लिअर होता. त्याला फक्त एकच टॉनिकची बाटली आणण्यास सांगितले. मी एवढी आनंदित झाले म्हणता, लगेच दुसऱ्या दिवशी त्या कॅलेंडरची फरेम बनवूनही आणली व उद्या गुरुवारी हार-फुले वाहून त्याची पूजा केली.

卐

**श्रीसाईलीलाबद्दल–**

साईलीला अंकातील संपादकीय व अन्य लेख वाचून आध्यात्म ज्ञान वाढते तर अनेक भक्तांना आलेल्या अनुभवाचे लेख वाचून हृदयास प्रेमाचा पाझर फुटतो व डोळ्यातून, आनंदाश्रू वाहू लागतात या कारणे साईचरणी जडलेली भक्ती व श्रद्धा वृद्धींगत होत रहाते".

**–श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार**

# श्री साईनाथाय नमः

—सौ. अश्विनी अ. चीपकर.
न्यू बी. डी. चाळ नं. १०।४८.
नायगाव, मुंबई ४०० ०१४

० मी श्रीसाईबाबांची एक साधारण भक्त आहे. मला वेळोवेळी साई-माऊलीने उदार अंतःकरणाने सहाय्य केले आहे. त्यावेळी मी ते अनुभव साईचरणी पाठवलेले आहेत. पण ते प्रसिद्ध झाले नाहीत ही त्यांचीच इच्छा! तरीही हा अनुभव पाठवण्याचे धाडस मी करीत आहे. तो मान्य करणे न करणे हे साईंच्याच हातात आहे.

माझ्या लग्नाला आता ३ रे वर्ष चालू आहे व मला पावणेदोन वर्षाचा अतुल नावाचा मुलगा आहे. त्याच्या वेळेस साईमाऊलीच माझ्या मदतीला धावून आली व तिनेच माझी निर्विघ्नपणे सुटका केली. तेव्हा साई अगदी माझ्याजवळ होते, कुठे माहित आहे? माझ्या हातातल्या हिरव्या बांगडीतील लॉकेटमध्ये. गळ्यातल्या मंगळसूत्रात ते नेहमी असत. पण बाळंतपणाच्या वेळेस मंगळसूत्र काढायला लावले. त्यामुळे मी ते बांगडीत बांधून ठेवले होते. त्यांच्या कृपेमुळे मला कसल्याच वेदना जाणवल्या नाहीत, व मुख्य म्हणजे मी बेशुद्धही झालेले नव्हते.

बाळ सव्वा महिन्याचा झाल्यानंतर मुलाचे बारसे केले. पण त्या आधी-पासून त्याला जुलाब होत होते. ते बारशा नंतरही न थांबल्यामळे आम्ही घाबरून त्याला वाडीया हॉस्पिटलमध्ये ॲडमीट केले. तेथे जाण्यापूर्वी तो खूपच मलूल पडला होता व त्याची सर्व हालचाल पूर्णपणे मंदावली होती. तिकडे ॲडमिट झालेल्याच वेळी मी माझ्या गळ्यातले तेच (वर उल्लेख केलेले) लॉकेट त्याच्या हातातल्या काळ्या दोऱ्यात बांधले आणि काय आश्चर्य! लगेच त्याची हालचाल सुरू झाली. तो हातपाय हलवून इकडे तिकडे बघायला लागला. थोड्या वेळानंतर डॉक्टर आले व त्याची चौकशी करू लागले. मी सांगताच ते म्हणाले, अहो तो पहा चांगला हसत खेळत आहे व तुम्ही म्हणता तो हालचाल करत नाही.

त्यानंतर ४ च दिवसात तो पूर्णपणे बरा झाला. आत्तापर्यंत त्याला किरकोळ आजार होत असत व वेळोवेळी साईंनी त्याचे रक्षण केले आहे. पण अलिकडच्याच पंधरा दिवसांपूर्वी तो खेळताना मसाला वाटण्याच्या रगड्या-वर पडला व त्याचा खालचा ओठ जखमी झाला. तो बुधवार व अमावस्येचा दिवस होता. त्या दिवसापासून त्याला ताप यायला लागला. शनिवारपर्यंत

तसाच ताप येत जात राहिला व डॉक्टरांच्या औषधानेही जावयाचे लक्षण दिसेना. तेव्हां पुन्हां त्याला वाडीयात न्यायचे ठरले.

सोमवारी आम्ही त्याला वाडीयात नेले. त्याचे वय पावणेदोन वर्षे आहे. पण वजन मात्र फक्त ९ किलोच होते. तेव्हां डॉक्टरांनी त्याला टी. बी. च्या टेस्टचे इंजेक्शन देऊन आणण्यास सांगितले. तेव्हां हेच इंजेक्शन आम्ही आधी त्याला दिल्याचे डॉक्टरांना सांगितले. पण डॉक्टर म्हणाले, पुन्हा द्या. मग आम्ही तेथेच ते इंजेक्शन त्याला पुन्हां दिले. त्यानंतर त्याला गुरुवारी आणायला सांगितले होते. पण बुधवारीच त्याला न्यायला लागले. कारण मंगळवारी त्याला खूपच ताप आला व इंजेक्शन दिलेल्या ठिकाणी हाताला खूपच सूज आली व त्यावर बारीक बामोळ्या सारखे फोड उठले होते. मी तर फारच घाबरले. "मन चिंती ते वैरी न चिंती" मनात नाना कुशंका यायला लागल्या. म्हणून बुधवारीच त्याला परत नेले. पण डॉक्टर न भेटल्यामुळे परत आलो.

मी साईमाऊलीला हाक मारत होते. गुरुवारी नेले असता डॉक्टरांनी एक्सरे काढायला सांगितले. तेव्हां तर माझी खात्रीच झाली की त्याला काहींतरी झालेलेच आहे. सर्वजण मला धीर देत होते. मीही साईमाऊलीला विनवत होते. त्याचा रिपोर्ट सोमवारी मिळणार होता. मी मनातच साईंना म्हटले, अतुलचा रिपोर्ट क्लिअर येऊ दे, मी तुझ्या घरात असलेल्या मोठ्या कॅलेंडरची फ्रेम बनवून आणेन व गुरुवारी त्याची हार घालून पेढे वाहून पुजा करेन." हे कॅलेंडर मी मुद्दाम फ्रेम करण्यासाठीच विकत घेतले होते. पण ते तसेच पडून होते. असो, सोमवार उगवला, व आम्हांला त्याचा रिपोर्ट मिळाला, आणि आश्चर्य व आनंदाची गोष्ट म्हणजे तो अगदीच क्लिअर होता. त्याला फक्त एकच टॉनिकची बाटली आणण्यास सांगितले मी एवढी आनंदित झाले म्हणता, लगेच दुसऱ्या दिवशी त्या कॅलेंडरची फ्रेम बनवूनही आणली व उद्या गुरुवारी हार-फुले वाहून त्याची पूजा केली.

卐

---

**श्रीसाईलीलाबद्दल—**

साईलीला अंकातील संपादकीय व अन्य लेख वाचून आध्यात्म ज्ञान वाढते तर अनेक भक्तांना आलेल्या अनुभवाचे लेख वाचून हृदयास प्रेमाचा पाझर फुटतो व डोळ्यातून, आनंदाश्रू वाहू लागतात या कारणे साईचरणी जडलेली भक्ती व श्रद्धा वृद्धींगत होत रहाते".

—श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार.

# अघटीत घटना

—श्री. भा. ह. मुरांजन
"शांतप्रभा" सोसायटी ए।३, गोरेगाव
पूर्व, आर रोड, मुंबई ४०० ०६३.

० १९६४ सालची गोष्ट. मी शिरडीला साईबाबांच्या दर्शनाकरिता गेलो होतो. खरं सांगायच म्हणजे मी खरोखरच एवढा साईभक्त नव्हतो. केवळ दर्शनाकरिता आणि दूरच्या प्रवासाचा आनंद मिळविण्यासाठी मी गेलो होतो.

श्री साईबाबा समाधिसमोर किंवा लिंबाच्या झाडाखालील मूर्तिसमोर नमस्कार करीत असता माझ्या मनात सहज आले कि माझे वडील जे दम्याने कासाविस झालेले, अंथरूणाला खिळलेले, न झोपेने त्रस्त झालेले, एकाएकी बरे होऊन त्यांनी आमच्या गच्चीत फेऱ्या मारताना, बोळातून घरात शिरताना मला पहावयास मिळावे.

खूप औषधे घेऊनही, चांगल्या डॉक्टरांकडून तपासणी करूनही त्यांना आराम मिळत नव्हता. तेव्हां बरे होऊन चालणे हे अशक्य कोटीतीलच.

दोन दिवसांनी मी घरी परतण्यास निघालो. बोळांतून घराच्या गच्चीवर पाहातो तो काय आश्चर्य आमचे वडील (दादाजी) गच्चीत फेऱ्या मारीत असताना मला दिसले. डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. मन हेलावून गले. अगदी मनात साईबाबांपुढे रेखाटलेले दृश्य मला पहावयास मिळाले. खरी श्रद्धा नसतानाहीं परमेश्वराची अगाध लीला—सामर्थ्य, त्यांनी मला दाखविले. धन्य धन्य साईनाथ त्यांच्या चरणी सतत लीन होण्याची बुद्धि आणि सदाचरण ठेवण्याची बुद्धि दयाघन साईंनी मला द्यावी हीच भिक्षा.

---

### मनोगत

"साईलीला" हा अंक अतिशय चांगला निघतो. वाचून फार बरं वाटतं. आजच्या या धावपळीच्या युगात "श्रीसाईलीला" लोकांच्या मनात जनजागृतीचे व श्रध्देचे स्थान उत्तमरित्या निर्माण करू शकेल हे अंक वाचल्यावर कळते. आपला "गुरुपौर्णिमा" अंक फारच आकर्षक निघाला आहे.

—प्रविण पाटील, बरोर.

# फिटस बंदच झाल्या हो

—सौ. तेजल परितोष देशपांडे
१२, साई अपार्टमेंट, शिवाजी नगर, नौपाडा,
'बी' केबिन, रोड, ठाणे पश्चिम' ४०००६२

० तसे म्हटले तर मी काही मोठी साईभक्त नाही आणि यापूर्वी माझा यावर विश्वासही नव्हता. मला नेहमीच असे वाटायचे कि लोक हे गुरु का व कशासाठी करतात आणि बुवाबाजीच्या का मागे लागतात?

पण म्हणतात ना, आले देवाजीच्या मना, तेथे कोणाचे काही चालेना, कदाचित् मला आपल्याकडे खेचून घेऊन आपल्या सामर्थ्याची बाबांनी ओळख करुन दिली तर नसेल?

माझे लग्न होऊन ३ वर्षे झाली. आमच्या घरी म्हणजे सासरी सर्वच साईभक्त. अगदी माझे पति जे कोणत्याही देवापुढे हात जोडत नाहीत परंतु बाबांच्या पुढे मात्र नतमस्तक होतात. माझ्या सासूबाई अगदी साईभक्त आहेत. कोणालाही बाहेर जाताना उदी लावल्याशिवाय बाहेर पडून देत नाही. अगदी माझा २ वर्षाचा मुलगा, अलोक तोसुध्दा आजीकडून उदी सकाळ—संध्याकाळ लावून घेतो.

एकदा अलोकला साधारणसा ताप आला होता. ताप तसा नॉर्मल होता. परंतु एक दिड तासात ताप वाढून त्याला फीट आली आणि डोळसुद्धा फिरवले. तावडतोब माझ्या पतीने व दिराने त्याला दवाखान्यात नेले. परंतु दवाखान्यात जातानासुद्धा सासूबाईंनी घाईघाईने त्याच्या कपाळावर उदी लावली. मला धीर दिला. आणि काय आश्चर्य! दवाखान्यात नेत असतानाच वाटेतच तो शुद्धिवर येऊन रडू लागला. त्यानंतर लगेच त्याला हॉस्पिटलमध्ये हलविला. व डॉक्टरांनी त्याला काहींही झालेले नसून घाबरण्याचे कारण नाही फक्त ताप वाढू देऊ नका असेही सांगितले. अलोकने डोळे फिरवल्यानंतर उदी लावल्या नंतर केवळ २।३ मिनिटातच तो शध्दिवर यावा ही बाबांची लीला नाहीं काय? त्यानंतर त्याला आजपर्यंत कधी फीट आलेली नाहीं. तोसुद्धा साईभक्तच आहे. सकाळ—संध्याकाळ बाबांची उदी स्वत: लावून आम्हां सर्वांना पण लावतो.

असाच मलाही उदीचा महिमा जाणवला. त्याचे काय झाले? अलोकच्या जन्मानंतर माझा उजवा खांदा अतिशय दुखत असे. औषधे झाली, मलमे झाली, पण काहीच उपयोग झाला नाहीं एवढच काय रोज गरम गरम पाण्याने शेकूनही खांदा दुखायचाच. तेव्हां मी एकदा बाबांच्या फोटोसमोर उभी राहून म्हटले, 'बाबा ही तुमची उदी तुमच्यासमोरच मी खांद्याला लावते माझी खांदेदुखी बरी झाली पाहिजे. तीन दिवस लागोपाठ उदी लावल्यामुळे खांदेदुखी थांबली. नुसती थांबलीच नाहीं तर आजपर्यंत गेल्या ६ महिन्यात परत त्रास झाला नाहीं.

बाबांची अशीच कृपादृष्टी सर्वांवर असावी हीच त्यांच्या चरणी विनंती.

श्रीसाईलीला मासिक लहान असले तरी त्याची छपाई, मुखपृष्ठ, बाबांचे फोटो व इतर लेख व काव्येही फारच उद्‌बोधक व भावपूर्ण असतात. काही काव्यांना तर मी चाली लावून आमच्या येथील साईनाथ भजनी मंडळात स्त्रियांना ती गाण्यास सांगतो. मासिकातील संपादकीय अग्रलेख सुरेखच असतो. ते वाचल्यापासून मला सुध्दा आलेले अनुभव व दृष्टांत' पूर्वीचे व सध्या येत असलेले, मासिकात पाठविणेची उपरती झाली आहे. सध्याच्या काळात एवढे मासिक फक्त वा. वर्गणी १० रुपयामध्ये कोठेच मिळणे शक्य नाहीं. शिरडी संस्थानातील सर्वच परिस्थिती व कार्यक्रम भक्तांना या मासिका द्वारे समजतात असे हे सर्व साईभक्तांना प्रोत्साहन देणारे व मार्गदर्शन करणारे मासिक आहे. यात शंकाच नाहीं.

—श्री. व्ही. ए. किरपेकर. (फोटोग्राफर)
४०५, सोमवार, पेठ, मु. कराड.
जि. सातारा.

# काखेतील गळू बरे झाले

—श्री. सुनिल वामनराव मोहिले.
१/१५, अहमद उमर बिल्डिंग,
डॉ. डिसिल्वा रोड, दादर,
मुंबई – ४०० ०२८.

० माझी पत्नी सौ. शीला हिस गणपतीच्या सुमारास काखेत एक गळू झाले व खूप दुखू लागले. नंतर औषधोपचार चालू ठेवल्यावर अनंतचतुर्दशीच्या दिवशी ते फुटले व त्यातून पाणी व पू येऊ लागले. दुखण्याचे प्रमाण खूप वाढले. आठ दिवस झाले तरी जखम ओली राहून पाणी येणे चालूच राहिले व खूपच दुखू लागले.

त्यापूर्वीच आम्ही श्री केदार ट्रॅव्हल्स गोरेगाव' या संस्थेतर्फे "श्री अष्ट विनायक" यात्रेस जाण्यासाठी २१ सप्टेंबर, १९८४ रोजीचे बुकिंग केले होते. त्यामुळे २१ तारखेपूर्वी जखम बरी व्हावी व प्रवास सुखरूप पार पडावा. म्हणून श्री साईबाबांची प्रार्थना केली, आणि आश्चर्याची गोष्ट म्हणजे चारच दिवसात दुखण्याचे प्रमाण खूपच कमी झाले व जखम बरी होत आली. नंतर २१ ते २३ सप्टेंबर १९८४ पर्यंत आम्ही श्री अष्टविनायक यात्रेस गेलो आणि काहीही त्रास न होता आमचा प्रवास श्री साईबाबांच्या कृपेने सुखरूप पार पडला. ही श्री साईलीला आहे. असा अनुभव आम्हास आला आहे.

अशीच कृपादृष्टी ठेवावी हीच श्री साईबाबांच्या चरणी प्रार्थना. ☆

---

श्री साईलीला अंकाची बांधणी, आकार व मुखपृष्ठ पहाताच मन भारावून जाते. पहिल्याच पानावरील "श्रीसाईवाक्सुधा व सुविचार" हे अंकाचे खास वैशिष्ट्य आहे. अंकातील संपादकीय भक्तांचे अनुभव लेख कविता व "शिरडीवृत्त" अशा स्वरूपाने उत्कृष्ट गुंफण असून मांडणी सुबोध व वाचकांच्या अंतःकरणाला भिडेल अशी आहे. भक्तिरसाने ओथंबलेला हा अंक साईमय बनला आहे. या अंकाचे उपक्रमाने लहानापासून ते थोरापर्यंत भक्तिचे बिज लावून सतत साई सहवास लाभतो. हीच मानवसेवा होय.

—श्री. चिंतामणि ग. मुजुमदार.
(महसूल खाते)
कर्जत – जि: रायगड.

---

# साई विभूती तथा नाम साक्षात्कार

–सौ. सीता कुलकर्णी, एम. ए.
अनंत बंगला, १३५३ शुक्रवार,
नातूबाग, पुणे ४११ ००२.

० नुकतीच ताजी घटना घडलेली आहे ही. वर्तमान पत्रातही सचित्र छापून आलेली आहे.

श्री. गणेश विश्वनाथ वैद्य ह्या गृहस्थांनी स्वतः स्वमुखाने सांगितलेली सदर घटना आहे. श्री. वैद्य सांप्रत पुण्यातील स्टेट बँकेत मॅनेजर आहेत ते आपल्या स्वतःच्या काहीं महत्वाच्या कामाकरिता साताऱ्यास गेले होते. त्यांचे मुख्य वैशिष्ठ्य म्हणजे अखंड चिंतन व खिशात नेहमी विभूती ठेवणे. हे होय. संतश्रेष्ठ पूज्य तराणेकर महाराजांचा त्यांच्यावर कृपाप्रसाद झालेला आहे. शिर्डीची वारी वारंवार करतात. शिरडीच्या साईवर त्यांची फार श्रद्धा आहे. त्याच बरोबर इतर कोणत्याही साधूसंतांबद्दल त्यांना अनादर नाहीं. देवतांबद्दलही अनादर नाहीं.

त्यांना आलेला मजेशीर अनुभव –

साताऱ्यातील काम उरकून ते साताऱ्याच्या बस स्थानकावर आले. त्यांना पुण्यास यावयाचे होते. स्थानकावर एका मागोमाग सुटणाऱ्या व पुण्याकडे येणाऱ्या दोन गाड्या उभ्या होत्या. त्यापैकी प्रथम सुटणाऱ्या गाडीमध्ये ते चढले. इतक्यात त्यांना लघुशंका जाणवली व ते खाली उतरले. कंडक्टरला त्यांनी सांगितलेही की, मी पाच मिनिटात येतो कंडक्टर कामाच्या व्यग्रतेत वैद्यांचे कथन विसरून गेला. बेल दिली व गाडी सुटली मार्गस्थ झाली.

इकड वैद्य लघुशंका करून परत येतात तो गाडी गेलेली. मग ते दुसऱ्या गाडीत बसले. गाडी सुरू झाली. पहिली गाडी एक तास आधी पोहोचली असती लवकर घरी जाऊन आपल्या उद्योगास वेळवर उपस्थित राहाणे हाच त्यांचा हेतू होता. सदर कल्पना एक दोनवेळा त्यांना स्पर्श करूनही गेली. या विचार तंद्रित त्यांची गाडी शिरवळ जवळ येऊन पोहोचली तो काय?

तो त्यांना एक विचित्र व दुःखद दृष्य पहावे लागले. त्यांनी प्रथम शिरडीश साईंना मनोमन नमस्कार केला व म्हणाले बाबा म्हणून तुम्ही मला लघुशंकेस जाण्याची बुद्धि दिलीत का?'

पहिली गाडी आपल्या नियमित वेगाने जात होती. विरुद्ध बाजूने डंपर आला व तो गाडीस बरोबर मध्यावर कापून गेला. गाडी कोसळली. जो भाग कापला गेला. त्या भागात बसलेली सारी माणसे मृत झाली होती. गाडी कलंडली. कलंडल्यामुळ सुरक्षित भागातील माणसे कोसळली· जखमी झाली, बेशुद्ध झाली. त्यांना काढण्याकरिता मागावून आलेली गाडी थांबली माणसे खाली उतरली त्यात श्री वैद्यही उतरले. आता त्यांच्या अंतरात नेहमीपेक्षा अधिक वेगाने "साईराम" मंत्र पुनरावृत्त होत होता. बाबांचे अनंत आभार मानले व त्यांचेच नाव घेऊन त्यांनी अपघातात सापडलेल्या गाडीतील बेशुद्ध असलेल्या उतारूंना काढण्यास सुरवात केली.

मनात ते म्हणत होते बाबांच्या कृपेने मी आज वाचलो आहे· लघुशंका हे निमित्त झाले. अन्यथा मी आज ह्याच ठिकाणी कदाचित रक्ताच्या थारोळ्यात पडून कायमचीच चिरनिद्रा घेत पडलो असतो. जय शिरडीश, जय साईराम हा जयघोष त्यांना नकळतच होत होता.

---

## मी म्हणतो

श्री साईलीलाच्या अंकावर वाचकांच्या प्रतिक्रिया या संबंधीचे एक नवीन सदर सप्टेंबर ८४ या अंकापासून नियमितपणे सुरू होत आहे. ही फार आनंदाची गोष्ट आहे. त्याबद्दल आपले हार्दिक अभिनंदन.

ऑगस्ट १९८४ च्या अंकातील सर्व कविता फारच आवडल्या. एकंदर अंक फार गोड वाटला.

—श्री. आनंद सातर्डेकर.
साईकृपा, ड्रायव्हर हिल,
वास्को – द–गामा (गोवा)

# अगाध लीला साईंची

–श्री. सुर्यकांत गोपाळ चंचे.
म. पो. – नेरळ (पाडा),
ता. कर्जत, जि. रायगड.

० माझ्या शेजारी राहणाऱ्या सौ. इंदूताई चतुर ह्या एक निस्सीम साई-भक्त आहेत. सन १९७६ साली दत्त जयंतीच्या दिवशी त्यांनी श्री बाबांच्या पोथीचे चक्री पारायण सुरू केले होते. त्या दिवशी मी एक अध्यायाचे वाचन केले व तेव्हां पासूनच मी श्री साईंचा भक्त बनलो. तोपर्यंत मला बाबांबद्दल काही एक माहिती नव्हती. सौ. ताईकडूनच मला बाबांच्या उदीचे महात्म्यही समजले.

सन १९७७ साली मला नेमका दत्त जयंतीच्या दिवशी नरळ रेल्वे स्टशन-वर काहीं गुन्हा नसतांना रेल्वे पोलीसांनी पकडले, व माझी कर्जत लॉकअपला रवानगी केली. परंतु दुपारी २–०० वाजता श्री बाबांची कृपा माझ्यावर होती म्हणूनच मला जामिनावर सोडण्यात आले व दोन दिवसांनी पुण्याला कोर्टात हजर होण्यास सांगितले गेले.

दोन दिवसानंतर कोर्टात काय होणार ह्या एकाच विचाराने मी पार हादरूनच गेलो होतो. कर्जतहून घरी आल्यानंतर प्रथम सौ. ताईंचे घर गाठले व ताईंनी लावलेल्या बाबांच्या पोथीतील एक अध्याय वाचून काढला. दोन दिवसानंतर मी कर्जतला गेलो व प्रथम पोलीस स्टेशनला जाऊन चौकशी केली. तेव्हां आरोपी न्यायला श्री बाबांच्या कृपेने नेमका ओळखीचा पोलीस होता. त्याने मला घरी जाण्यास सांगितले व पुढे काय होईल ते मी बघून घेईन. असे सांगुन मला घरी पाठविले. हे सर्व श्री साईनाथांच्याच कृपेने घडले व मी जवळ जवळ निर्दोषच सुटलो. खरोखरच श्रीसाईंची लीला अगाध आहे.

सध्या मी कर्जत (रायगड) येथे सा. बां. उप–विभागात मस्टर कारकून म्हणून काम करतो आहे. माझ्याकडे काम करणाऱ्या मजुरांपैकी एक मजूर पोट दुखीच्या आजाराने आजारी झाला. एक ते दीड महिना सर्व प्रकारे औष-धोपचार करूनही त्याला काहीं बरे वाटले नाहीं. तेव्हां मी त्यास उदी दिली व रोज श्रद्धेने पाण्याबरोबर घेण्यास सांगितले. आठ दहा दिवसांतच तो मजूर

पूर्ण बरा होऊन कामावर हजर झाला. खरोखरच बाबांची उदी म्हणजे सजीवास मिळालेली देणगीच नव्हे काय? फक्त तिच्याठायी श्रद्धा आणि सबुरी हवी. म्हणजे इच्छित काम झालेच असे समजावे.

ज्याप्रमाणे आत्तापर्यंत श्रीसाई आमच्या हाकेला धावून आले तसेच ह्यापुढेही श्री साईंची कृपा आम्हां सर्वांवर रहावी ही श्री साईचरणी अनन्यभावे प्रार्थना.

※ ※ ※

# श्रीसाईबद्दल निरंतर श्रद्धा वाढो

–सौ. सुनीता निरखे.
२, एयर बस सोसायटी
अंधेरी (पूर्व) मुंबई ४०००६९.

० श्री साईबाबा संकटाच्यासमई सत्वर धावून येतात आणि "नित्य मी जिवंत, नित्य घ्या प्रचीती अनुभवे" ह्या त्यांच्याच वचनावर श्रद्धा ठेऊन प्रत्येक बाबतीत जीवन सुखकर होते.

दरवर्षी श्री शिर्डी येथे जाण्याचा आमचा निश्चय श्री साईकृपेने जमून येतो. मनाला तेथे गेल्या नंतर आनंद वाटतो.

श्री साईबाबांना भक्तांच्या दुःखाबद्दल इच्छेबद्दल अंतर्ज्ञानाने सर्व काही समजते आणि त्याप्रमाणे भक्तांच्या मनोकामना पूण होतात. ह्या प्रकारचा अनुभव मला बरेचदा आलेला आहे

मध्यंतरी एका लहान ऑपरेशन बद्दल माझ्या मनात भिती होती थोडीफार घाबरले होते आणि मनात श्री साईबाबांना आळविले कुठल्याही प्रकारचा त्रास न होता ऑपरेशन पार पडले आणि आता श्री साईकृपेने प्रकृती उत्तम आहे.

श्री साईलीला अंकात आपण एक अनुभव लिहून पाठवावा असे नेहमी मनात येत असे. त्याप्रमाणे श्री साईचरणी निरंतर श्रध्दा वाढत राहो ह्या भावनेने वरील अनुभव लिहून पाठवित आहे. ❀

# साईबाबांनी मुलीवरचे संकट स्वतःवर घेतले

–श्री. रमेश धोंडोबा शेलार.
स. नं. ८, नवी खडकी, यशवंत नगर,
येरवडा, पुणे –६.

० आमची मुलगी जयश्री ही २ वर्षाची आहे. बालपणा पासून आम्ही तिला साईबाबां बद्दल शिकवण देतो. त्यामुळे तिचा बाबांशी परिचय आहे. १० जुलै ८४ रोजी ती पलंगावर एकटी खेळत होती. खेळतांना एकाएकी ती पलंगावरून उजव्या हातावर जोरात पडली, व रडावयास सुरुवात केली. ते पाहून पत्नीने गडबडीत तिला उचलले व साईबाबांच्या फोटोकडे हातास उदी लावण्यासाठी घेऊन गेली. तर आश्चर्यकारक घटना घडलेली आढळली. मुलगी पलंगावरून खाली पडली अगदी त्याचवेळी बाबांचा फोटो खाली पडलेला होता. मुलीचे हातास उदी लावल्यानंतर डॉक्टरांकडे घेऊन गेलो तेव्हां हाडास किंचित मार लागल्याचे सांगितले. नंतर आम्ही हातास प्लॅस्टर करून घेतले.

प्लॅस्टर केल्यानंतर अनेक लोक सांगत होते की प्लॅस्टरमध्ये जंतू होतात, खाज येते, कातडी जाते इ. आम्हांला भिती वाटत होती. परंतु जेव्हां प्लॅस्टर सोडले त्यावेळी हाताची कातडी गेलेली नव्हती किंवा प्लॅस्टर केले होते की नाही याचे चिन्हसुद्धा दिसत नव्हते. ही सर्व बाबांचीच किमया होती. म्हणजे मुलगी पडल्यानंतर हाताचे हाड मोडले असते इतक्या जोरात पडली होती अशावेळी बाबांनी स्वतःवर संकट घेतले व तिला मोठ्या संकटातून वाचविले.

**जेथे भक्ति प्रेमाचा जिव्हाळा । जेथे जीवासी बाबांचा लळा तेथेचि प्रकटे खरा कळवळा ॥**

# आमची आई वाचली हो

'निर्मल' एम. ए., बी. एड्.
बि. आय. टी., ब्लॉक नं. १ रूम नं. २
प्रिन्सेस स्ट्रीट, मुं ४००००२

**जरी हे शरीर गेलो मी टाकून तरी मी धावेन भक्तांसाठी.**

० खरच, बाबांचे हे व इतर वचने सार्थ आहेत व त्याचा प्रत्येक साई-भक्ताला अनुभव येतोच. असाच एक अविस्मरणीय अनुभव मला आला.

डिसेंबर १९८३ मधील गुरुवारची एक रात्र. आई गंभीर आजारी. अर्धांग वायूचा तिसरा झटका आलेला. त्यात वय ८३ वर्षे. तीन दिवस बेशुद्धावस्थेत. अन्नपाणी काहीच नाहीं. शरीर लाकडासारखं ताठ झालेले. कसलीच हालचाल

नाहीं. जिवंतपणाचे लक्षण म्हणून नुसता श्वासोच्छ्वास चालू होता. रात्री १० वाजता डॉक्टर आले. त्यांनी आईला तपासले. आणि – पहिल्या दोन झटक्याच्यावेळी शंभर टक्के खात्री देणारे डॉ. परंतु ह्या वेळस मात्र त्यांची चर्या पालटली. त्यांनी सांगितले. रात्रभर बसून रहा. (जागे रहा) तेव्हांपासूनच सर्वांची हळू हळू रडण्याची सुरूवात झाली. सर्वजण – बहिणी, भाऊ, भावंडे बसून राहिलो – रडतच. १२–१२।। नंतर मी सर्वांना झोपण्यास पाठविले. फक्त आम्ही दोघी बहिणीच आईजवळ राहिलो. एक वाजला माई (बहिण) म्हणाली अग, आता आपली आई जाणार. आपण पोरके होणार. कधी का होईना, पण "आई" म्हणून म्हणायला आपल्याला आई होती. ती रडायला लागली मलाही रडू आवरेना. त्याच अवस्थेत अगदी विनंतीपूर्वक ती मला म्हणाली, दीदी, एक शेवटचा व खात्रीचा उपाय म्हणून तू तुझ्या बाबांची उदी लाव. मी निराशेनेच म्हटले आता काय उपयोग! मरण हे अटळ आहे. ते कुणालाच चुकलेले नाहीं. असं बाबाच म्हणायचे. तरीही तिने अट्टाहास धरला. मग मी बाबांची उदी घेतली, कपाळाला लावली तोंडात घातली, परंतु ती ओठावरच राहिली बेशुद्धावस्थेमुळे मनातून तीव्र इच्छा उदी तोंडात जाण्याची. नंतर १०/१५ मिनिटे उदी चोळत राहिले. मनात बाबांचे नामस्मरण नव्हे धावा सुरूच होता. घरातील वातावरण नुसत भेडसावणार होत. २५ च्या बल्बचा सौम्य प्रकाश आणि काय आश्चर्य वीजेचा झटका यावा तद्‌वतच एक चमत्कार घडला. आईने एकदम गुडघे वर उचलले व नेहमीच्या सवयीप्रमाणे तसेच उभे ठवले. माई धावतच माझ्याजवळ आली. परंतु आमच्या दोघींच्याही तोंडून शब्दच बाहेर पडेना. नंतर मी थोडी उदी घेतली व आईजवळ गेले आणि म्हटले 'आई आ कर', तो काय चमत्कार! आईने 'आ' केले. मी उदी तोंडात टाकली. माझी इच्छाही त्या बरोबर पूर्ण झाली. केव ! हा बाबांचा – त्यांच्या उदीचा प्रभाव.

त्यानंतर २–४ दिवसांनी ओळखीचे एक चांगले वैद्य भेटले. ते रोज चोळायला येऊ लागले. आठ दिवसातच आई उभे राहून पावल टाकू लागली. (धरून धरून) तसेच त्यांनी सांगितलेल्या एका औषधाने वाचा गेलेली (दोन महिने) आई बोलू लागली. आता ती एवढ्या वयातही दोन वेळच खाण–पिण चहा–पाणी घेऊन व्यवस्थित आहे. मात्र सर्वांना सांगते 'मला साईबाबांनीच' बर केले.

ही सर्व बाबांचीच कृपा व त्यांच्या उदीचा प्रभाव नव्हे का?

अशा ह्या ब्रम्हांड नायकांना माझा प्रणाम.

# शिरडी वृत्त–माहे ऑगस्ट १९८४

या महिन्यात श्रींच्या दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी नेहमीप्रमाणे होती. काहीं कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली. ती खालील प्रमाणे :—

**कीर्तन :—**

१) ह. भ. प. श्री. मधुकर गणेश सूर्यवंशी. संस्थान गवई कीर्तनकार प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्वाचे दिवशी झाली.

२) ह. भ. प. शांताराम रंगनाथ मिराणे, शिरडी.

३) ह. भ. प. वासुदेवशास्त्री धर्माधिकारी, अकोला.

**प्रवचन :—**

१) प. पु. गुरुदेव काटेस्वामी, पांचगणी.
२) ह. भ. प. विश्वनाथ महाराज, सुराळे.
३) ह. भ. प. काशीनाथबुवा भालेराव, त्र्यंबकेश्वर.
४) ह. भ. प. प्रभाकरपंत देशमुख, पैठण. !

**भजन, गायन, वादन, नृत्य वगैरे :—** १) श्री. भास्कर दगडू काळे, देहरे, २) श्री. [भास्करन, आं. प्र. ३) श्री. इमानअली शहा, बऱ्हाणपूर. ४) कि. मा. रामस्वी, बंगलोर. ५) सौ. व्ही. कमला, विशाखापटट्णम. ६) श्री साईनाथ भजनी मंडळ, शिर्डी. ७) श्री. मोसमी चक्रवर्ती, दिल्ली. ८) श्री. गिरी महाराज, पैठण. ९) भजनी मंडळ पैठण. १०) के. विजयकुमार, हैद्राबाद. ११) श्री. नितीन शांताराम मिराणे, शिरडी. १२) श्री. टी. संभय्याचार्य, कुरी दर्शी. १३) श्रीराम व्ही. सातर्डेकर, परेल. १४) डॉ. एम. के. कीर्तीकर, दादर. १५) श्री. शिवाजी तुकाराम धुमाळ, शिरडी. १६) श्री. मधुकर वामन पाटील, गणेशपुरी. १७) जादुगार किरणकुमार, मुंबई. १८) के. विश्वनाथ जादुगार, कोपरगाव. १९) श्री. बाळू बोरावके, कोपरगाव. २०) श्री. नंदू बोरावके, कोपरगाव. २१) श्री. राजेंद्र पांडरे, कोपरगाव. २२) श्री. दत्तात्रय पवार, कोपरगाव. २३) सौ. उमा विश्वनाथ, कोपरगाव. २४) श्री. हरीओम शरन, सांताक्रुझ. २५) नंदिनी शरन. २६) कमल नथानी. २७) श्री. परेरा. २८) श्री. रामलाल, २९) ह. भ. प. श्री. सोने भजनी मंडळ, सोनगाव. बारामती.

**स्वराज्य प्राप्ती दिन** – बुधवार १५ ऑगस्ट १९८४ रोजी स्वातंत्र्यदिना निमित्त श्री साईबाबा संस्थान शिरडी तर्फे मा. कोर्ट रिसीवर श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे शुभ हस्ते प्रतिवर्षा प्रमाणे ध्वजवंदनाचा कार्यक्रम झाला. कार्यक्रमास संस्थान कर्मचारी, श्री साईनाथ हायस्कूल बँडपथक, शिक्षक, विद्यार्थी विद्यार्थीनी, होमगार्डस, पोलीस, प्रतिष्ठित ग्रामस्थ मंडळी, साईभक्त, पाहुणे उपस्थित होते. कार्यक्रम संपल्यावर सर्वांना चहापान देण्यात आले व मुलांना खाऊ वाटणत आला. रात्रौ समाधी मंदिर व श्रींचे कळसावर रोषणाई करणेत आली होती.

**श्रीकृष्ण जयंती कार्यक्रम** :– रविवार दि. १८–८–८४ रोजी नित्याचे कार्यक्रम झाल्यावर रात्रौ ९ ते १०–०० कलाकारांचा कार्यक्रम झाला. रात्रौ १० ते १२–०० पर्यंत ह. भ. प. वासुदेवशास्त्री धर्माधिकारी, अकोले यांचे कृष्णजन्मावर कीर्तन झाले. त्यानंतर शेजारती झाली व सर्वांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ समाधी मंदिर व श्रींचे कळसावर विद्युत रोषणाई करण्यात आली होती. दुसरे दिवशी गोपाळकाला कीतन व दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर रात्री श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून फिरून आली. त्यानंतर शेजारती झाली.

**हवापाणी** – शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काहीं नाही. पावसाचे प्रमाण कमी आहे.

☆

---

**अभिप्राय –**

श्रीसाईलीला' ऑगस्ट १९८४ अंक फार आवडला. त्यात श्री बाळासाहेब नाडकर्णी यांची 'अमुची राजधानी' ही कविता फार आवडली.

**–श्री. राजेश गणपतराव खुस्तले.**
साळीवाडा, मु. पो. ता. पैठण,
जिल्हा औरंगाबाद.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२-०० | [illegible] |
| २) | ,, | इंग्रजी | १३-५० | ४-०० |
| ३) | ,, | हिंदी | १२-०० | ४-०० |
| ४) | ,, | गुजराथी | १३-०० | ४-०० |
| ५) | ,, | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ६) | ,, | तेलगू | १३-०० | ४-०० |
| ७) | ,, | तामीळ | १२-०० | ४-६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७-५० | ३-०० |
| ९) | ,, | हिंदी | ६-०० | ३-५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४-२५ | ३-०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४-०० | ३-०० |
| १२) | [illegible] | मराठी | ०-३५ | ३-०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०-३० | ३-०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०-५० | ३-०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०-५० | ३-०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५-०० | ३-०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०-३५ | ३-०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४-०० | ३-०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४-५० | ३-०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १-७५ | ३-०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १-७५ | ३-०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १-५० | ३-०० |
| २६) | ,, | हिंदी | १-७५ | ३-०० |

Regd. No. MH/BYE
LICENCE No. 1.
Licence To Post Without Pre
At Dadar Head Office, Bom

(कव्हर पृष्ठ ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०–५० | |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | [illegible] | १–० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १–५० | ३–० |
| ३०) | ,, | मराठी | १–५० | ३–० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १–५० | ३–० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालु | |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०–९० | |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षि
१०–०० प्रत्येकी प्रत
(व्ही. पी. ची प

| अ. क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०" | १–६५ | ३ |
| २) | ,, | १०"×१४" | १–१० | ३ |
| ३) | ,, | ७"×१०" | ०–५५ | ३ |
| ४) | ,, | ४"×५" | ०–२० | |
| ५) | ,, | २"×३" | ०–१५ | |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १–६५ | |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १–६५ | |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २–७५ | |
| ९) | ,, | १३"×१८" | १–०० | ३– |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १–१० | ३–० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०"×१४" | ०–८५ | ३–० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो | ९"×१२" | १–१० | ३–० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२" | १–६० | ३–० |
| १४) | शिळा | ९×१३ | ०–७५ | ३–० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६–०० | ८–० |

मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१. संपादक व प्रकाशक : श्री. रा. द. वझे, साई निकेत, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४. बी. दादर मुंबई